
को/१३८



महाराष्ट्राचे जिल्हे

५११

३०८
व.भा.

को/१३८

महाराष्ट्राचे जिल्हे

भंडारा

किंमत २५ नवे पैसे

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि खात्याचें प्रकाशन

J-130—1-B.

भंडारा जिल्ह्याचें अंतरंग

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिचय

भंडारा जिल्हा परिचय

१ : सर्वसाधारण माहिती व स्वाभाविक विभाग

स्थानिक

भंडारा जिल्हा, नागपूर कमिशनरीतील आठ जिल्ह्यांपैकी एक जिल्हा आहे. हा उत्तर अक्षांश २०°.४०° तें २१°.४७° व पूर्व रेखांश ७९°.२७° ते ८०°.४०° ह्यामध्यें असून नागपूर विभागाच्या सपाट मैदानावर पूर्वेकडील भागांत आहे. हा जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम-पूर्व शेवटच्या टोकावर आहे. उत्तर-दक्षिण असलेल्या सातपुडाच्या पर्वत-श्रेणींनीं, जंगलें आणि इतर पहाडांनीं पूर्वेकडील छत्तिसगडच्या प्रदेशापासून विभागला गेला आहे. भंडारा हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण होय. भंडाऱ्यापासून नागपूर ४० मैल व मुंबई ५६० मैलांवर असून मुंबई-कलकत्ता ह्या रेल्वेमार्गावर आहे. तसेंच तें नॅशनल हाय वे नं. ६ मुंबई-कलकत्ता मार्गावर वसलेलें आहे.

आकार व विस्तार

ह्या जिल्ह्याचा आकार कांहींसा कासवाच्या आकारासारखा आहे. ह्या जिल्ह्याच्या उत्तरेस मध्यप्रदेशांतील बालाघाट आणि शिवनी जिल्हे, दक्षिणेस चांदा जिल्हा, पश्चिमेस नागपूर जिल्हा व पूर्वेस द्रुग जिल्हा आहे. हा जिल्हा मध्यप्रदेशाच्या सीमेवर आहे. जिल्ह्याचें क्षेत्रफळ ३,६२३ चौरस मैल असून जास्तीत जास्त लांबी ७५ मैल व रुंदी जवळ जवळ तितकीच आहे. तें विदर्भाच्या क्षेत्रफळाच्या शेंकडा ९.८ इतके आहे. विदर्भाच्या बाकी जिल्ह्यांच्या मानानें ह्या जिल्ह्याचा लोकवस्तीच्या बाबतींत दुसरा क्रमांक आहे आणि लोकसंख्येचें प्रमाण शेंकडा १४.८ इतकें आहे.

भंडारा शहराचें प्राचीन नांव भाणारा असें आहे. रतनपूर येथील हैहय वंशीय राजाचा मांडलिक राजा बाराव्या शतकांत भाणारा येथें राहत असे, असा उल्लेख एका शिलालेखांत सांपडतो. 'भाण' हा शब्द भांड्याच्या अर्थानें उपयोगांत आणला असावा. भंडारा हें गांव पितळेच्या भांड्याकरितां पूर्वीपासूनच प्रसिद्ध आहे. त्यामुळें भाणारा असें नांव पडलें असावें असाहि एक समज आहे. ह्या शब्दाचा अपभ्रंश भंडारा असा झाला आहे व गांवाच्या नांवावरून आणि जिल्ह्याचें मुख्य ठिकाण म्हणून जिल्ह्याला भंडारा असें संबोधण्यांत येते.

स्वाभाविक विभाग

भंडारा जिल्ह्यांतील मुख्य नदी वैनगंगा ही ईशान्य कोपऱ्यांतून वाहत जाऊन थेट नैऋत्य दिशेकडे भंडारा शहरांतून वाहते. गायमुखचा व प्रतापगडचा डोंगराळ भाग खरीजकरून ह्या जिल्ह्याच्या जमिनीचा उतार उत्तरेकडून दक्षिणेकडे आहे. त्यामुळें ह्या जिल्ह्याचे दोन स्वाभाविक विभाग पडतात—(१) गायखुरीचा व प्रतापगडचा डोंगराळ प्रदेश, (२) वैनगंगा नदीच्या कांठचा सपाट प्रदेश. ह्या जिल्ह्यांत सातपुडा पर्वतश्रेणीचे फाटे पसरलेले आहेत. त्यांपैकीं आंबागड, कोका चांदपूर, चोरखमारा, गंगेझरी, दरेकसा, प्रतापगड, अर्जुनी, चिचगड, भीमसेन, गायमुख, गायखुरी, इत्यादि प्रमुख आहेत. भंडारा

जिल्ह्यांतील मुख्य नदी वैनगंगा होय. बावनथडी, चुलबन, बाघ, कन्हान, मन्हू, गाढवी, सूर, ह्या वैनगंगेच्या उप-नद्या ह्या जिल्ह्यांतून वाहतात. वैनगंगा व बाघ ह्या नद्यांच्या खोऱ्यांत उपलब्ध असे लहान मोठे १५,००० तलाव आहेत. म्हणूनच ह्यास नागपूर विभागांतील तलावाचा भाग असे म्हणतात.

वैनगंगा नदी— ही नदी सातपुडयाच्या पहाडावरील सिवनी जिल्ह्यांत प्रतापपूर येथून उगम पावली आहे. मंडला-बालाघाट जिल्ह्यांतून वाहत भंडारा जिल्ह्यांत येते व पुढें चांदा जिल्ह्यांतून वाहत जाऊन सिवनी गांवाजवळ वर्धा नदीस मिळते. वर्धा व वैनगंगेचा संगम झाल्यानंतर ह्या संयुक्त नदीस प्राणहिता हें नांव पडलें. वैनगंगेचें पात्र दूरपर्यंत अरुंद असून पुढें बरेच रुंद झाले आहे. वैनगंगा नदीच्या उगमापासून ती वर्धा नदीस मिळेपर्यंत एकंदर लांबी ३६० मैल आहे. ह्या जिल्ह्यांत तिची लांबी सुमारे १५० मैल आहे.

चंदन नदी— ही नदी बालाघाट जिल्ह्यांतून निघून वारासिवनी व रामपायली जवळून वाहत जाऊन सावनरी जवळ महालगांव येथें वैनगंगेस मिळते.

बावनथडी नदी— ही नदी सिवनी जिल्ह्यांत सातपुडयाच्या पहाडांतून निघून भंडारा येथें चांदपूरच्या दक्षिणेस मोवाड व बपेरा ह्या गांवांच्या मध्यें वैनगंगेस मिळते.

सूर नदी— ही नदी नागपूर जिल्ह्यांतील रामटेक तहसिलींत उगम पावून भंडारा येथें एका मैलावर वैनगंगेस मिळते व १५ मैलपर्यंत ह्या जिल्ह्यांतून वाहते.

चुलबन नदी— ही नदी गोंदियाच्या दक्षिणेस २० मैलांवर गायमुखीच्या पहाडांतून निघून दक्षिणेकडे वाहत जाऊन वैनगंगेस आवळी गांवाजवळ मिळते. तिची लांबी ७१ मैल असून सावंगी गांवाजवळ पूल बांधला आहे. हिच्या काठी दिघोरी, लाखांदूर, बोथली, कुंभली, इत्यादि गांवें आहेत.

बाघ नदी— ही चिचगड जमिनदारीमध्यें कोट जांबोरा गांवाजवळून निघून दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहत जाऊन बोरींदाजवळील रेल्वेपुलाजवळील बेनी गांवाजवळ वैनगंगेस मिळते. बाघ नदीची लांबी १०३ मैल आहे. हिला कवडस व पांगोली, देव, घिसारी आणि सोन नद्या मिळतात. बाघ नदीच्या कांठीं लोहारा, बिरसोला, बुराडा, नयाटोला, मुकाटोला, आमगांव, इत्यादि गांवें आहेत. ह्या नदीचें पाणी अडवून एक मातीचें विशाल धरण बांधण्याची योजना सुरू झाली आहे.

कन्हान नदी— छिंदवाडा जिल्ह्यांतून उगम पावून वैनगंगेस पिपरी येथें मिळते.

मन्हू नदी— मन्हू नदीचा उगम नागपूर जिल्ह्यांतून असून वैनगंगेस ह्या जिल्ह्यांत घाटउमरी ह्या गांवाजवळ मिळते.

गाढवी नदी— ही नदी साकोली तहसिलींत चिचगड जमिनदारींत उगम पावून आग्नेय भागांतून वाहत जावून चांदा जिल्ह्यांत वैनगंगेस मिळते. हिची लांबी ६० मैल आहे, पैकी ३६ मैलांपर्यंत ह्या जिल्ह्यांतून वाहते. ह्या नदीस इटियाडोह असेहि म्हणतात. ह्या नदीचें पाणी गोठणगांवाजवळ अडवून एक मातीचें मोठें धरण बांधण्याची योजना आहे आणि त्याचें काम सुरू आहे.

पांगोली नदी— ही नदी तुमसरजवळ उगम पावून बाघ नदीस कामठा येथे मिळते.

भंडारा जिल्ह्यांतील सपाट प्रदेश समुद्रसपाटीपासून ९०० ते १,२०० फूट उंचीवर आहे.

खनिज पदार्थ— ह्या जिल्ह्यांत अभ्रक, गेरू, लोखंड, दगड, मँगनीझच्या खाणी पुष्कळ ठिकाणीं आहेत.

जंगल व त्याचें उत्पन्न

साकोली तहसिलींत सानगडी परगण्यांत, प्रतापगड परगण्यांत व चिचगड येथें आणि भंडारा तहसिलींत भंडारा परगण्यांत दाट जंगलें आहेत. गोंदिया तहसिलींत कांहीं ठिकाणीं जंगलें आहेत. साग, बिबला, हळदा, बांस, वगैरे इमारती लांकूड या जंगलांत उत्पन्न विपूल प्रमाणांत होतें. येथील जंगलांतून हिरडा, मध, डींक, मेण, कोसा, मोह, नागेली, लाख, तेंदूचीं पानें वगैरे निघते.

ह्या जिल्ह्यांत जंगलें पुष्कळ असल्यामुळें वाघ, अस्वल, सांबर, मृग, मोर, रानम्हशी, चित्ते वगैरे जंगलीं जनावरें येथील जंगलांत आढळतात व निरनिराळ्या प्रकारचे पक्षींहि सांपडतात. नवेगांव, प्रतापगड, चिचगड, गायमुख, इत्यादि ठिकाणें शिकारीकरितां प्रसिद्ध आहेत.

भंडारा जिल्हचाचें हवामान नागपूरपेक्षां थंड आहे. पावसाळचांत हवा थंड व आल्हादकारक असते. इतर कांहीं जिल्हयांच्या मानानें हा जिल्हा रोगट नाहीं. परंतु, कांहीं भागांत विशेषकरून साकोली वगैरे ठिकाणीं हिंवतापाची सांथ मधून मधून येत असल्यामुळें येथील हवापाणी रोगट असते. साकोली तहसिलींत जिल्हचाच्या मानाने जास्त पाऊस पडतो व सर्वत्र जंगल पसरल्यामुळें तेथील हवामान वर्षांतून कांहीं दिवस रोगट असणें सहाजिकच आहे.

हवामान

वैनगंगा नदीच्या पश्चिमेकडील सपाट भाग निरोगी असतो. जिल्हचाचीं पाऊस नोंदणीची व्यवस्था भंडारा, गोंदिया, साकोली, तुमसर, तिरोडा, पवनी, देवरी, इत्यादि ठिकाणीं आहे. साधारणतः जूनच्या पहिल्या आठवडचांत पाऊस सुरू होतो व आक्टोबरपर्यंत पडतो. वर्षांतील दुसऱ्या मोसमांत तुरळक असा पाऊस पडत असतो. ह्या जिल्हयांत पावसाचें प्रमाण जास्तच म्हणावें लागेल. पावसाचें सरासरी प्रमाण ५०" ते ५५" इतके आहे किंवा १६० किलोमिटर्स इतके आहे.

२ : ऐतिहासिक पार्श्वभूमि

भंडारा जिल्ह्याचा प्राचीन इतिहास उपलब्ध नाहीं. फार पूर्वी ह्या भागांत गवळ्यांचें राज्य असावें. त्या राज्याची साक्ष म्हणून भंडारा येथील किल्ला--जेथें आतां तुरुंग आहे--तो आणि खांब तलावांतील खांब ह्या दोन गोष्टी सांगण्यांत येतात.

इसवी सनाच्या सातव्या शतकापासून मात्र ह्या जिल्ह्यांतील कांहीं भागावर हैहय वंशीय रजपूत राजांचें अधिराज्य असावें असें दिसून येतें. बिलासपूर जिल्ह्यांतील रतनपूर येथें एक शिलालेख सांपडला, त्यांत असा उल्लेख आहे कीं, भनारा येथील प्रमुखानें हैहय वंशीय जाजलादेव नांवाच्या राजांचे गुणगान केलें व त्याला उपाहार अर्पण केले. हा शिलालेख इ. स. ११८४ चा आहे. ह्यावेळीं ह्या राजांची राजधानी नागपूर जिल्ह्यांतील नगरधन येथें होती असें आढळतें.

पुन्हा बाराव्या शतकापासून ते सोळाव्या शतकापर्यंतचा इतिहास उपलब्ध नाहीं. पण असें वाटतें कीं, ह्या काळांत ह्या भागांतील रजपूत राजांची सत्ता हळूहळू लोप पावली आणि गोंडांची सत्ता प्रस्थापित झाली.

इसवी सनाच्या सतराव्या शतकांत छिंदवाडा जिल्ह्यांतील देवगड येथें बख्तबुलंदशहाची राजधानी होती. ह्या राजानें आपला राजखान नांवाचा सरदार भंडारा विभागांत पाठवून सानगडी नि प्रतापगड-पर्यंतचा मुलुख आपल्या राज्यास जोडला. अंबागडपासून तिरोडापर्यंतचा प्रदेशहि त्याच्याच अधिपत्या-खाली होता. लांजी, कामठा हे प्रदेश मात्र गढमंडला गोंड राजाच्या कबजांत होते आणि पवनी व नवरगांव हे भाग चांदा येथील राजांच्या अंमलाखाली होते.

बख्तबुलंदचा ह्या प्रदेशावर राज्यकारभार चालू असतां ह्या प्रदेशाची बरीच प्रगति झाली असें आढळून येतें. ह्या काळांत ह्या भागाला गोंडवन असें अभिधान प्राप्त झालें होतें. बख्तबुलंदनंतर त्याचा मुलगा चांद सुलतान गादीवर आला. त्यानें आपली राजधानी बदलून नागपूरला आणली. इ. स. १७३९ मध्यें तो मरण पावला, तेव्हां त्याची गादी वलीशहा नांवाच्या बख्तबुलंदच्या अनौरस मुलानें बळकावली, म्हणून चांद सुलतानाच्या विधवेनें बुऱ्हाणशहा आणि अकबरशहा नांवाच्या आपल्या मुलाच्या मदतीकरितां रघुजी भोसल्यांना वऱ्हाडांतून बोलाविलें. त्यांनीं वलीशहाच्या सैन्याचा पराभव करून त्याला ठार केलें. ह्या कामगिरीबद्दल भोसल्यांना ११ लाख रुपये व वैनगंगा प्रगणें मिळालें, ते वऱ्हाडांत वापस गेले, पण नंतर भावाभावांत भांडणें सुरू झाल्यामुळें पुन्हा १७४३ मध्यें ते नागपूरला आले व त्यांच्या-मधील भांडणें मिटवून ते नागपूरलाच राहूं लागले. ह्यावेळीं सानगडी, प्रतापगड भागांत राजखानाचा मुलगा महंमदखान हा कारभार करीत होता. त्याला रघुजीनें शिवनीला दिवाण म्हणून पाठविले आणि हा विभाग आपल्या खास अधिकारांत समाविष्ट करून घेतला. वैनगंगेच्या आजुबाजूला पसरलेला हा भाग भोसल्यांच्या कागदपत्रांत प्रांत वैनगंगा म्हणून दर्ज आहे. राजे रघुजी भोसल्यांचा कारभार व्यवस्थित होता. त्यांनीं या प्रांताची चोख व्यवस्था ठेवली. भंडारा, पवनी, सानगडी, कामठा, लांजी, तिरोडा ह्या ठिकाणीं त्यांनीं आपले कारभारी नेमले होते.

त्यांना कमाविसदार म्हणत आणि त्यांच्या हाताखाली असलेल्या मुलखाला प्रगणें म्हणत. ह्या कमाविसदाराच्यामार्फत त्यांनीं शेती व इतर उद्योगधंद्यांना उत्तेजन दिलें आणि वैनगंगा प्रांताची उत्तम भरभराट केली. मध्यंतरी पेंढाऱ्यांचा जनतेला त्रास होऊं लागला म्हणून त्यांनीं पवनी, सानगडी, कामठा, लांजी ह्या ठिकाणीं गढ्या बांधून शिबंदीची व्यवस्था केली. राजे रघुजींच्या कारकिर्दीत प्रजा सुखी व सम्पन्न होती, अशी नोंद कागदपत्रीं आढळते.

पण लवकरच महाराष्ट्रांत इंग्रजांची धाड आली. त्यांनीं ठिकठिकाणीं मराठ्यांचा पराभव केला भोसल्यांना देखील त्यांना शरण जावे लागले आणि नागपूर येथें इंग्रज रेसिडेन्टाची नेमणूक झाली याचाच अर्थ त्यांची सत्ता त्यांना मान्य करावी लागली.

रघुजी भोसल्यानंतर नागपूरच्या गादीवर आप्पासाहेब भोसले आले. त्यांना इंग्रजांची सत्ता मान्य नव्हती. ही सत्ता झुगारून देण्याकरितां त्यांनीं आपल्या कमाविसदारांशीं गुप्त मसलती केल्या. त्यांनीं सन्य वाढविलें आणि इंग्रजांशीं लढाई देण्याचा निश्चय केला. नागपूरच्या नागपूरांतच लढाई होणें अर्थात्च शक्य नव्हते म्हणून कामठ्याला लढाईची सर्व सिद्धता करण्यांत आली. कामठ्याला त्यावेळीं चिमणा पटेल नांवाचा कमाविसदार होता, त्याच्यावर इंग्रजाविरुद्ध लढा करण्याची कामगिरी आप्पासाहेबांनीं सोंपविली.

कॅप्टन गॉर्डन आणि आप्पासाहेबांच्या सैन्याशीं चकमक भंडारा येथेंच वैनगंगेच्या तीरावर झाली. आप्पासाहेबांच्या सैन्यानीं माघार घेऊन नवरगांवचा आश्रय केला. येथें गॉर्डनच्या सैन्यानें अप्पासाहेबांच्या बेशिस्त सैन्याचा धुव्वा उडविला (जुलै १८१७).

त्यानंतर गॉर्डनसाहेबांचें सैन्य कामठ्याच्या रोखाने जाऊं लागलें तेव्हां चांदपूर, रामपायली, सानगडी येथेंहि उठाव झाल्याचें कळतांच त्याहि बाजूला थोडे थोडे सैन्य पाठविलें, स्वतः हा मात्र कामठ्यावरच चालून गेला (सप्टेंबर १८१७). कामठ्याला लहानशी गढी होती आणि गांवांभोवती भिंत असून कांहीं खंदक होते. गॉर्डनसाहेबांनीं आपल्याजवळील सैन्याचे तीन विभाग केले आणि तोफा-बंदुकांच्या साहयानें त्यानें आप्पासाहेबांच्या सैन्याशीं लढत देऊन कामठ्याची गढी काबीज केली. चिमणा पटेल याला कैद करून कामठा येथील किल्ल्यांत कैद केलें. कांहीं दिवसांनीं त्याच्याकडे बालाघाट जिल्हयांतील किरणापूरची जमिनदारी देण्यांत आली.

लगेच कांहीं दिवसानंतर मेजर विलसन यास पवनी शहर काबीज करण्यास पाठविण्यांत आलें. त्यानें एका दिवसांतच पवनीचा कबजा घेतला.

अशा प्रकारे बहुतेक सर्व वैनगंगा प्रांत इंग्रजांचे अधिसत्तेखाली आला. त्यांनीं लगेच आप्पासाहेबांना नागपूरच्या गादीवरून पद्च्युत केलें आणि दुसऱ्या रघूजी भोसल्याच्या एका अज्ञान नातवास गादीवर बसविले.

इ. स. १८१८ पासून १८४३ पर्यंत नागपूरला सर रिचर्ड जेंकिन्स हे रिजेन्ट होते व त्यांच्याच अधिकारांत वैनगंगा प्रांत होता. हया प्रांताचा कारभार सर पी. विल्कीनसन् यांच्याकडे सोंपविण्यांत आला होता. त्याच्या कारभाराचें मुख्य ठिकाण १८२१ पर्यंत कामठ्यालाच होते व त्याच्याकडे लांजी, हट्टा, कामठा हयाच ठिकाणांचा कारभार मुख्यतः होता. पुढें वैनगंगेचा पूर्व-पश्चिम भागाचाहि कारभार त्याच्याचकडे देण्यांत आल्यामुळे कारभाराच्या सोयीकरितां त्यानें कारभाराचें मुख्य ठिकाण भंडारा केलें. तेव्हांपासून वैनगंगा प्रांत भंडारा जिल्हा म्हणून ओळखण्यांत येऊं लागला.

प्राचीन शिल्पकारांचीं कामें

या जिल्हयांत प्राचीन शिल्पकलेचें अवशेष सिलोटी या गांवाजवळ सांपडतात. दोन सरळ दगडी चटाणी उभ्या करून त्यावर एक आडवी चटाण ठेवलेली आहे. अशाच प्रकारचीं कामें चांदा जिल्हयांत चामोर्शी आणि केळसर व सिवनी जिल्हयांत सांपडतात. ही जुन्या काळच्या कुरमवार अथवा तेलगू धनगर लोकांनीं बांधलेली असावीत. कुरमवार लोकांनीं दगड कोरून बांधलेलीं मंदिरें गायमुख, पवनीजवळील कोरंबी, दरेकसा, इत्यादि ठिकाणीं आहेत. हेमाडपंथी देवळें अड्याळ, चाकाहेटी, कोरंबी, पिंगलाई हया ठिकाणीं आहेत. हीं कामें चुन्याशिवाय केलेलीं आहेत. पुष्कळ ठिकाणीं पुरातन किल्ले आहेत. त्यांत आंबागड, चांदपूर, भंडारा, सानगडी, प्रतापगड, पवनी वगैरे ठिकाणचे किल्ले प्रसिद्ध आहेत.

३ : लोक आणि चालीरीति

विदर्भांतील सर्व जिल्ह्यांपेक्षां लोकसंख्येच्या मानानें भंडारा जिल्ह्याचा क्रमांक नागपूरनंतर दुसरा येतो. नागपूर जिल्ह्याची लोकसंख्या १९५१ च्या शिरगणतीनुसार १,२३४,५५६ आहे आणि भंडाऱ्याची लोकसंख्या १,०७१,६५७ इतकी आहे. म्हणजेच लोकसंख्येचें प्रमाण विदर्भाच्या १४.८ शेंकडा आहे. जिल्ह्याची लोकसंख्या १९६१ च्या शिरगणतीनुसार १,२४८,५१९ इतकी आहे. म्हणजेच १० वर्षांत लोकसंख्येचें प्रमाण १६·५ नीं वाढलें आहे. ह्या जिल्ह्याच्या ३,६२३ चौरस मैलांत १,४९५ गांवांत हे लोक राहतात. लोकसंख्येचें प्रमाण १९०१ पासून सारखे वाढत आहे. तें प्रमाण आतां शेंकडा ८२.३ आहे.

जिल्ह्यांतील पुरुष आणि स्त्रियां यांचें प्रमाण १९५१ च्या शिरगणतीनुसार प्रत्येक तालुक्यांत येणेप्रमाणें आहे––भंडारा तालुक्यांत ३४१,३१८ इतके राहत असून त्यांपैकीं खेडे गांवांत २०८,०३९ लोक व शहरांत ५५,२७९ लोक राहतात. त्यांपैकी १७०,६०६ पुरुष असून १७०,७१२ स्त्रियां आहेत आणि प्रत्येक चौरस मैलांत ३५३ लोक राहतात. गोंदिया तालुक्याची ४३१,९७० लोकवस्ती असून ३९५,२६४ लोक खेड्यांत व ३६,६८६ लोक मोठ्या शहरांत राहतात. त्यांपैकी २१६,२१७ पुरुष असून २१५,७८३ स्त्रिया आहेत. दर चौरस मैलांत ३९० लोक राहतात.

साकोली तहसिलींत एकंदर लोकसंख्या २९८,३६९ असून सर्व लोक ग्रामीण विभागांत राहतात. ह्या तहसिलींत शहरीं विभाग म्हणून अजून एकहि मोठे गांव नाहीं. ग्रामीण विभागांत १४७,७६६ पुरुष असून बाकीच्या १५०,६०३ स्त्रियां आहेत आणि दर चौरस मैलांत १९२ लोक राहतात. वरील आंकड्यांवरून आपणास कळून येईल कीं, गोंदिया तहसिलींत दर चौरस मैलांत सर्वांत जास्त लोक राहतात आणि सर्वांत कमी म्हणजे साकोली तहसिलींत. यावरून गोंदिया तहसिलींत औद्योगिक क्षेत्रांत वाढ झाल्यामुळें जास्त प्रमाण आहे व साकोलींत जंगलें पसरल्यामुळें लोकवस्ती विरळ आहे.

लाखनी हें खेड आतां झपाट्याने वाढत असून त्याचें मोठ्या गांवांमध्ये रूपांतर होत आहे. भंडारा जिल्ह्यांतील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. त्यामुळें लोकसंख्येचें मोठें प्रमाण खेड्यांत राहते, म्हणजेच, शेंकडा ९१.४ लोक १,४९१ खेड्यांत राहतात. ह्या जिल्ह्यांतील प्रत्येक खेड्यांतील सरासरी लोकसंख्येचें प्रमाण ७१८ इतके येतें. हें प्रमाण जुन्या महाराष्ट्रांतील इतर खेड्यांतील लोकसंख्यांच्या प्रमाणापेक्षां जास्त आहे. जुन्या महाराष्ट्रांतील प्रत्येक खेड्यांतील सरासरी लोकसंख्येचें प्रमाण ६३७ आहे. ५,००० किंवा त्यापेक्षां जास्त लोकसंख्या असलेला भाग शहरीं विभाग समजण्यांत येतो. ह्या जिल्ह्यांत शेंकडा ८.६ लोक शहरीं विभागांत राहतात. बाकीचे सर्व लोक ग्रामीण विभागांत राहतात. भंडारा तालुक्यांत पवनी, तुमसर, भंडारा हीं तीन मोठीं शहरें आहेत. गोंदिया तालुक्यांतील गोंदिया व तिरोडा हीं मोठीं शहरें आहेत. ह्या जिल्ह्यांतील शहरीं व ग्रामीण लोकसंख्येचें प्रमाण १ : ९८ आहे. जिल्ह्यांत १९५१ च्या शिरगणतीनुसार ५३४,५८९ पुरुष व ५३७,०६८ स्त्रियां आहेत. एकंदर लोकसंख्येच्या मानानें पुरुषांचें प्रमाण ४९.८ व स्त्रियांचें प्रमाण ५०.२ इतके आहे. ह्यावरून आपल्याला कळून येईल कीं, स्त्रियांची संख्या एकंदर लोकसंख्येच्या मानानें पुरुषांपेक्षां थोडी जास्त आहे. १९६१ च्या शिरगणतीनुसार भंडारा जिल्ह्याची लोकसंख्या १,२४८,५१९ इतकी आहे म्हणजच, गेल्या १० वर्षांमध्यें शेंकडा १५·३४ नी लोकसंख्येची वाढ झाली आहे. पैकी गोंदिया तहसिलींत ४९५,०१६, भंडारा तहसिलींत, ३९४,०१७ व साकोली तहसिलींत ३५९,४८६ इतकी लोकसंख्या आहे. ६२४,९९८ पुरुष वर्गांपैकी २५१,२९५ पुरुष साक्षर आहेत व ६२३,५२१ स्त्रियांपैकीं ५१,०१३ स्त्रियां साक्षर आहेत.

लोकांचें वर्गीकरण प्रामुख्यानें शेतकी व बिगरशेतकी वर्ग असे करण्यांत आलें आहे. येथील लोक ग्रामीण विभागांत जास्त संख्येनें राहत असल्यामुळें लोकांचा उदरनिर्वाह मुख्यतः शेतीवर अवलंबून आहे.

शेती करणारे लोक	एकंदर संख्या	ग्रामीण	शहरीं
(१)	(२)	(३)	(४)
(अ) कास्तकार, स्वतःच्या जमिनीवर कास्तकारी करणारे व त्यांच्यावर अवलंबून असणारे.	५५४,५६४	५४७,१९८	७,३६६
(ब) कास्तकार, ज्याच्यां स्वतःच्या जमिनी नाहीत पण दुसऱ्यांची जमीन कसणारे व त्यांच्यावर अवलंबून असणारे लोक.	२६,०९०	२५,६२४	४६६
(क) शेतमजूर आणि त्यांच्यावर अवलंबून असणारे.	१५०,७४२	१४७,९११	२,८३१
(ड) जमीन स्वतः न कसणारे जमिनीचे मालक. शेती ठेक्यानें लावणारे.	२९,३४९	२८,३११	१,०३६
एकूण ...	७६०,७४५	७४९,०४६	११,६९९

शेतीवर अवलंबून नसलेले लोक खालीलप्रमाणें आहेत:--

शेतीशिवाय दुसऱ्या साधनाद्वारें उत्पादन करणारे	एकंदर संख्या	ग्रामीण	शहरीं
(१)	(२)	(३)	(४)
उद्योग व व्यापार	२०४,४७३	१७०,९७१	३३,५०२
वाहतूक	४१,६२६	२१,८५९	१९,७६७
इतर नोकरवर्ग	१२,४०६	५,६२९	६,७७९
संकीर्ण उपजीविकेचें साधन ...	५२,४०५	३२,१६७	२०,२१८
	३१०,९१२	२३०,६४६	८०,२६६
एकूण ...	१,०७१,६५७	९७९,६१२	९१,९६५

वरील तक्त्यावरून आपणास असें दिसून येईल कीं शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचें शेंकडा प्रमाण ७०.९ आहे. शेंकडा ७०.९ पैकी खेडे विभागांत शेतीवर उदरनिर्वाह करणाऱ्याचें प्रमाण ६४.३ टक्के आहे आणि बाकीचें शेकडा ६.६० लोक शहरीं विभागांतील शेतीवर उदरनिर्वाह करतात. ५१.८ टक्के लोक स्वतःची जमीन कसतात. शेंकडा २.४ लोक दुसऱ्यांच्या जमिनीवर बटाईनें शेती करतात. ज्यांची स्वतःची जमीन नाहीं असे शेंकडा १४.० लोक शेतमजूर म्हणून आपला उदरनिर्वाह करतात. शेंकडा २.७० लोक शेती न करणारे जमिनीचे मालक आहेत.

शेतीशिवाय इतर साधनाद्वारे उदरनिर्वाह करणारे लोक शेंकडा ३०.१० आहेत. त्यांपैकी शेंकडा १९ लोक शेती उत्पादनाशिवाय इतर उद्योगधंदे करून आपला उदरनिर्वाह करतात. उदाहरणार्थ, बिडी तयार करणें, लहान मोठे उद्योगधंदे. शेंकडा ३.६ लोक व्यापारी आहेत. शेंकडा १.१ ने-आण करून उपजीविका करणारे, शेंकडा ६.४ इतर नोकरवर्ग, शेती न करणारे पण खेड्यांत राहणारे शेंकडा २१.५ आहेत, आणि शेती न करणारे व शहरांत राहणारे लोक शेंकडा ८.६ आहेत. एकंदर शेतीवर उपजीविका करणारे, स्वतः शेती करणारे, शेंकडा २८.२ आहेत. यावरून शेती ह्या व्यवसायावर जास्त प्रमाणांत लोक अवलंबून आहेत, हें दिसून येईल.

भाषा

ह्या जिल्ह्याची सर्वसाधारण भाषा मराठी आहे. तिला प्रादेशिक महत्त्व असून आता सरकारी कामकाज याच भाषेंत होत आहे. ७१५,१५८ म्हणजेच शेकडा ७२ टक्के लोक मराठी भाषा बोलतात याशिवाय हिंदी, उर्दू, गोंडी, पोवारी, कोष्टी, सिंधी, इत्यादि भाषा बोलणारे लोक ह्या जिल्ह्यांत आहेत.

जिल्ह्यांतील धर्म व जाती

ह्या जिल्ह्यांत अनेक धर्मांच्या लोकांचें वास्तव्य आहे. उदाहरणार्थ, हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, जैन, गोंड, बुद्ध. त्यांपैकीं शेकडा ८५ लोक हिंदु धर्माचे आहेत.

कोष्टी लोक बारीक रेशमी सूत आणून हातमागावर कापड विणतात. ह्याशिवाय गांडली, ढिवर, कुणबी, गोंड, माळी, हलबी, तेली, महार, कोहळी, कलार, धोबी, लोहार, सोनार, सुतार, अहीर, इत्यादि अनेक लोकांची वस्ती ह्या जिल्ह्यांत आहे.

खेड्यांतील देव

मारोती अथवा हनुमंताचें देऊळ प्रत्येक गांवीं आढळतें. प्रत्येक गोठाणावर गुंथिया नांवाच्या देवाची स्थापना करतात. गोवारी लोक दिवाळीच्या दिवशीं या देवळांजवळ गुरें उभी करून ढोल वाजवून नाचतात व गाणी वगैरे गातात. शेताच्या सरहद्दीवर सेवाऱ्या नांवाचा देव स्थापन करतात व शेतांतील माल काढतेवेळीं या देवाला बोकड किंवा कोंबडी बळी देतात. भिमसेन हा गोंड लोकांचा देव आहे. परंतु, हिंदु लोकहि ह्या देवाची पूजा करतात. संकट व रोगराई निवारणार्थ भीमसेनास डुकरें किंवा इतर जनावरें बळी देतात व दारूचा नैवेद्य दाखवितात. धुलादेव घरोघरीं असतो. घराचे मथालीस एक मातीचे मडके अडकावून त्यांत या देवास ठेवतात. वर्षांतून एकदाच या देवाची पूजा करतात व त्यावेळेस पुरुषच हजर असतात, बायकांना हजर राहण्याची मनाई आहे. अशी एक दंतकथा आहे कीं, एकेकाळीं या देवाच्या पूजेच्या वेळीं एक स्त्री हजर राहली. त्यामुळें तात्काळ धुलादेव गुप्त झाला. परंतु, प्रार्थना, पूजा व बलीदान केल्यामुळें पुन्हा तो देव प्रगट झाला. ढिवर लोकांचा बेल समुद्रराजा नांवाचा देव नदी व नाला उतरण्याच्या ठिकाणावर किंवा घाटावर असतो.

खेड्यांतील पुरोहित

जोशी, गारपगारी, भूमक, भगत हे खेड्यांतील मुख्य पुरोहित होत.

ह्या जिल्ह्यांत पूर्वी पुष्कळ जमिनदाऱ्या होत्या. कांहीं जमीनदार राजगोंड असून कांहीं हलबा, लोधी, पोवार व माना जातीचे आहे. इतर जातीचे पण जमीनदार होते.

मागासलेल्या जमाती

ह्या जिल्ह्यांत मागासलेल्या जमातींत मुख्यतः वर्गीकृत जमाती व वर्गीकृत जाती आणि इतर गैरवर्गीकृत जातींचा समावेश होतो. १९५१ च्या शिरगणतीनुसार जिल्ह्याच्या एकंदर लोकसंख्येपैकी २११,५०८ लोक हरिजन आहेत. त्यांचें प्रमाण शेंकडा २० टक्के इतके आहे. ह्यांपैकी शेंकडा ९.८ पुरुष आहेत आणि स्त्रियांची संख्या शेंकडा १० इतकी आहे.

लोकांचें सण आणि लोकनृत्य

जवळजवळ सर्वच सण येथील लोक मोठ्या उत्साहानें साजरे करतात, मग ते कोणत्याहि जातीचे किंवा पंथाचे असो. ह्या सणांपैकी होळी, दसरा, दिवाळी, गणेशचतुर्थी, जन्माष्टमी, पोळा, नागपंचमी हे सर्व सण उत्साहानें पार पाडतात. मुसलमान ईद, मोहरम, इत्यादि मुख्य सण पाळतात.

त्याचप्रमाणे ख्रिश्चन, पारसी, इत्यादि लोक आपआपले सण साजरे करतात. ह्या जिल्ह्यांत धानाचें पीक जास्त प्रमाणांत होत असल्यामुळें धानाचीं रोवणीं संपल्यानंतर त्या दिवशीं सर्व शेतमजूर वाजतगाजत शेतांतून मिरवणुकी काढतात व गाणी गात शेतमालकाकडे जाऊन त्यांच्या घरीं जेवण करतात. हा दिवस आनंदाचा मानला जातो. महिनाभर सारखें काम केल्यानंतर मजूरांना आराम मिळतो व पुन्हा धान कापणीच्या व चुरण्याच्या वेळीं यांना कामावर बोलावण्यांत येते.

या भागांत व विशेषत: ग्रामीण भागांत लावणी व पोवाडे फार लोकप्रिय आहेत. त्याशिवाय तमाशाला सुद्धा महत्त्वाचें स्थान आहे. गोंधळ आणि दंढार हे करमणुकीचे प्रकार ह्या विभागांत जास्त प्रमाणांत आढळतात.

४ : राज्यव्यवस्था

राज्यव्यवस्थेच्या सोयीच्या दृष्टीनें भंडारा जिल्हा नागपूर विभागीय कमिशनरींत जोडला आहे. विदर्भांतील आठ जिल्ह्यांपैकी हा एक जिल्हा आहे. जिल्ह्यामध्यें तीन तहसिली आहेत. त्या भंडारा साकोली व गोंदिया ह्या होत. ह्या तहसिलींत १,४९१ गांवें आहेत. जिल्ह्यांत एकंदर १३ राजस्व गट पाडण्यांत आले असून प्रत्येक गटांत एक राजस्व-निरीक्षक व त्याच्या हाताखाली पटवारी व पाटील काम करतात.

भंडारा तालुक्याचा विस्तार ९६७ वर्ग मैल असून त्यांत ४८४ खेडीं व ३ शहरांचा समावेश होतो. गोंदिया तालुक्याचा विस्तार १,१०५ वर्ग मैल असून त्यांत ४४१ खेडीं व एक शहर आहे. साकोली तालुक्याचें क्षेत्रफळ १,५५१ वर्ग मैल असून त्यांत ५६६ खेडीं समाविष्ट केलीं आहेत. साकोली तालुका सर्वांत मोठा आहे.

भंडारा शहर हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असून जिल्ह्याचें ठिकाण असल्याने इतर निरनिराळ्या विभागाची कार्यालयें भंडारा येथें आहेत. त्याशिवाय जिल्हाध्यक्षाचें मुख्य कार्यालय भंडारा येथेंच आहे. कलेक्टर ह्यांच्या मदतीकरितां ८ डेप्युटी कलेक्टर, ३ तहसीलदार व प्रत्येक तहसिलींत तहसीलदाराच्या मदतीकरितां नायब-तहसीलदार असतात. प्रत्येक उपविभागाला प्रत्येकी एक उपविभागीय अधिकाऱ्याचें कार्यालय आहे. हें सर्व मुलकी व राज्याच्या इतर कार्यांत जिल्हाध्यक्षास मदत करतात. ह्यांच्या कामावर देखरेख ठेवण्याकरितां कलेक्टर प्रत्येक ठिकाणीं जाऊन निरीक्षण करतात व लोकांच्या अडचणी व गैरसोयी दूर करतात. कलेक्टर यांना रेव्हिन्यु व फौजदारी असे दोन्ही प्रकारचे अधिकार आहेत व वरील अधिकाऱ्यांच्या मदतीनें ही सर्व कामें जिल्हाध्यक्ष करतात. कलेक्टरला जिल्हा मॅजिस्ट्रेटचे अधिकार देण्यांत आले आहेत. कलेक्टर हा जिल्ह्यांतील सर्वांत मोठा व मुख्य अधिकारी समजल्या जातो.

दिवाणी कोर्ट

भंडारा येथें दिवाणी खटल्याचा निकाल लावण्यासाठीं डिस्ट्रीक्ट आणि सेशन्स न्यायाधीशाचें कोर्ट उघडण्यांत आलें आहे. मुख्य न्यायाधीशाला मदत करण्यासाठीं जिल्ह्याच्या ठिकाणीं तीन सिव्हिल जज्ज काम पाहतात आणि तहसिलीच्या ठिकाणीं एक एक सिव्हिल जज्ज काम पाहतो. हे सर्व न्यायाधीश हायकोर्टाच्या अंमलाखाली आहेत. सरकारतर्फे काम करण्याकरितां दोन सरकारी वकीलाची नेमणूक केली आहे.

महाराष्ट्राच्या विधानसभेंत ह्या जिल्ह्यांतून ९ प्रतिनिधी निवडून गेलेले आहेत. हे प्रतिनिधी भंडारा, तुमसर, तिरोडा, गोंदिया, गोरेगांव, आमगांव, साकोली, पवनी ह्या विभागाचें प्रतिनिधीत्व करतात. लोकसभेकरितां दोन प्रतिनिधी आहेत. त्यापैकी एक कायद्याचे उपमंत्री आहेत. हे सर्व लोकनियुक्त प्रतिनिधी कायदे करण्याव्यतिरिक्त शासनाच्या दैनंदिन कार्यांत मदत करीत असतात व लोकहिताच्या कार्यांत सरकारला सल्ला देतात.

शासकीय कार्याचें विकेंद्रीकरण

शासकीय सत्ता एके ठिकाणीं न ठेवतां त्याचें विकेंद्रीकरण करण्याचें शासनानें ठरविलें असून अगदी खालच्या पातळीवर म्हणजे ग्रामपंचायतीपासून तर कलेक्टरपर्यंत सत्तेचें विकेंद्रीकरण होत आहे. ह्यांना जास्तीत जास्त अधिकार देण्याचा उपक्रम सुरू आहे. जेणेकरून लवकरांत लवकर कोणत्याहि मुद्याचा निकाल लागला पाहिजे. ज्याप्रमाणें जिल्ह्याच्या ठिकाणीं जास्त अधिकार देण्यांत आले, तद्वत्च कमिश्नरीच्या पातळीवर आणखी जास्त अधिकार देण्यांत आले. लोकांना आपल्या कामासाठीं राज्याच्या मुख्य ठिकाणीं जाण्याची आतां आवश्यकता राहणार नाहीं व त्यांचे सर्व प्रकारचे कामकाज जिल्हा किंवा विभागीय कार्यालयांतून पूर्ण होऊं शकेल इतके अधिकार देण्यांत आले आहेत.

समाजाच्या समाजवादी धर्तीच्या रचनेवर जास्त भर देण्यांत येत आहे. आपण देशाची आर्थिक व सामाजिक पुनर्रचना करण्यांत मग्न आहोंत. त्याकरितां देशांत पंचवार्षिक योजना सुरू करण्यांत आल्या. पहिली पंचवार्षिक योजना १९५१ ते १९५६ पर्यंत पूर्ण करण्यांत आली. दुसरी पंचवार्षिक योजना १९५७ ते १९६२ पर्यंत पूर्ण होईल. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार झाला आहे.

लोकांचा सक्रिय पाठिंबा असलेल्या योजना जास्त परिणामकारक रीतीनें पार पडतात, ही वस्तुस्थिति लक्षांत घेऊन त्यांना प्रतिनिधीत्व देण्यांत येत आहे. त्यामुळें आतां ही जबाबदारी लोकांवरच येऊन पडते. शासकीय यंत्रणा फक्त ह्या मंडळांना योग्य सल्ला व मार्गदर्शन करून कार्यक्रम आखून देत असते. पण त्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी लोकांकडे आहे. म्हणूनच निरनिराळ्या गैरसरकारी समित्या स्थापण्यांत आलेल्या आहेत. स्थानिक संस्था, ग्रामपंचायती, जनपद सभा, नगरपालिका व ग्रामीण उद्योग मंडळ, समाज सेवा मंडळ, भारत सेवक समाज आणि इतर संस्थातर्फे पंचवार्षिक योजनांचा कार्यक्रम पार पाडण्यांत येत आहे.

भंडारा जिल्हा विकास मंडळ

मुंबई राज्याच्या कृषि तथा वन विभागाच्या ११-९-५७ च्या प्रस्तावानुसार या जिल्ह्यांत जिल्हा विकास मंडळ प्रस्थापित होऊन मंडळानें आपली पहिली सभा दि. २६-१०-५७ ला घेऊन आपल्या कार्यास सुरवात केली. ह्या मंडळावर सरकारी सभासदाशिवाय जिल्ह्यांतील सर्व भागांतून प्रतिनिधित्व देऊन सभासद नेमले असून त्यांत २५ गैरसरकारी व १५ सरकारी सभासद आहेत. ह्या मंडळाच्या एकंदर बारा उपसमित्या असून संबंधित सर्व विभागांची ह्या उपसमितींत वांटणी करण्यांत आली आहे. सर्वसाधारण सभा वर्षांतून दोन वेळ भरत असते. उपसमित्यांची बैठक आवश्यकतेनुसार बोलावण्यांत येते व सरकारला जिल्ह्याच्या विकासासंबंधी सल्ला देण्यांत येतो.

जिल्ह्यांतील कलेक्टर हा मंडळाचा पदसिद्ध अध्यक्ष असतो व सरकारनें नियुक्त केलेला एक बिनसरकारी सदस्य ह्या मंडळाचा उपाध्यक्ष असतो. ज्या उपसमित्या नेमण्यांत आल्या त्या उपाध्यक्षाच्या अध्यक्षतेखाली भरत असतात. तसेंच मंडळाचा चिटणीस असतो. तो सरकारकडून नेमलेला असतो. हा चिटणीस मंडळाच्या कामकाजाकरितां जिल्ह्यांत दौरा करीत असतो. जिल्हा विकास मंडळाच्या उपसमित्या असतात. निरनिराळ्या खात्यांनीं वेळोवेळी जो सल्ला दिला (जिल्ह्याच्या प्रगतीच्या दृष्टीनें) त्याची अंमलबजावणी सरकारी यंत्रणेकडून करवून घेण्याचें श्रेय जिल्हा विकास मंडळास मिळते. याप्रमाणें विकासाचें काम यशस्वीरीत्या पार पाडण्यांत येते.

१९५२ च्या ऑक्टोबरपासून देशांत सर्वत्र ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमावर भर देण्यांत आला व समाज विकास योजना सुरू करण्यांत आली. नंतर ह्या कार्यक्रमाचा विस्तार राष्ट्रीय विकास योजनेंद्वारें करण्यांत आला. दोन्ही कार्यक्रमाचा दृष्टिकोन एकच होता आणि तो म्हणजे लोकांच्या सामाजिक जीवनांत आमूलाग्र बदल घडवून आणणें व लोकांना स्वतःच्या उत्कर्षासाठीं विकासविषयक कामें करण्यास प्रवृत्त करणें हा होय.

समाज विकास योजना

ह्या योजनेंत भंडारा जिल्हा १३ विकास गटांत विभागला गेला आहे; त्यापैकी भंडारा तहसिलींत चार, साकोली तहसिलींत चार व गोंदिया तहसिलींत पांच असे विभाजन केलेले आहे. भंडारा जिल्ह्यामध्यें सध्या सर्व विकास गट सुरू झालेले आहे. जिल्ह्यांतील सर्व खेडीं विकास गट क्षेत्रांत आणली

गेलीं आहेत. जिल्हयाचे एकंदर १,०७१,६७५ लोक सध्या विकास गटाच्या क्षेत्रांत आहेत. जिल्हया-मध्यें आजपर्यंत चार पूर्व विस्तार गट, सहा प्रथमावस्था गट आहेत व तीन सामुदायिक विकास गट आहेत.

गटाचें नांव	सुरू झाल्याची तारीख	संपल्याची तारीख
(१)	(२)	(३)
प्रथमावस्था		
भंडारा	१-४-५८	२-१०-६१
साकोली	१-४-५८	२-१०-६१
सालेकसा	१-४-५८	१-४-६३
पवनी	२-१०-५९	१-४-६४
आमगांव	२-१०-५९	१-४-६४
लाखांदूर	२-१०-५९	१-४-६४
समाज विकास गट		
तुमसर	१-४-५९	१-४-६४
तिरोडा	३०-६-५९	३०-६-६४
अर्जुनी-मोरगांव	१-४-५७	३१-३-६०
पूर्व विस्तार गट		
गोंदिया	२-१०-६०	
देवरी	२-१०-५९	
मोहाडी	२-१०-५९	
गोरेगांव	१-४-६०	


१९५८-५९ साली सर्व विकास गटांत ९,९६६ मण बी-बियाणी वांटण्यांत आलीं. ५१,४९७ मण सेंदरी खत व अमोनियम सल्फेट, सुपर फास्फेट ही रासायनिक खतें वांटण्यांत आलीं. यामुळें अन्न उत्पादनांत मागील वर्षापेक्षां जास्त प्रमाणांत वाढ झाली. तसेंच १३ कच्च्या विहिरीं व ११७ पक्क्या विहिरीं बांधण्यांत आल्या. ६८ लहान तलाव बांधण्यांत आले व ७३ तलावांची दुरुस्ती करण्यांत आली. ह्यावर्षी ९६० एकर जमीन लागवडीयोग्य करण्यांत आली. १९५८ मध्यें तिरोडा येथें एक प्राथमिक हेल्थ सेंटर उघडण्यांत आलें व जिल्हयांतील ७७१ विहिरींत जंतुनाशक द्रवें टाकण्यांत आलीं. तसेंच २७७ ग्रामपंचायती, २४ महिला मंडळें, १७ बालवाड्या सुरू करण्यांत आल्या.

दळणवळणाच्या दृष्टींनें जिल्हयांत ४०७ फर्लांग कच्चे रस्ते बांधण्यांत आले. १४१ फर्लांगाचे कच्चे रस्ते दुरुस्त करण्यांत आले. रस्त्यावर २५ लहान पूल बांधण्यांत आले. १९५८ मध्यें सरकारी संस्थांची संख्या ११२ पर्यंत होती.

भंडारा विकास गट

हा गट २ ऑक्टोबर १९५६ मध्यें सुरू करण्यात आला. ह्या गटांत १५१ गांवांचा समावेश करण्यांत आला. गटांतील ग्रामीण विभागाची एकूण जनसंख्या ८४,२३३ आहे. लोकांचे मुख्य धंदे शेती व बिड्या तयार करणें हे होत.

भंडारा जिल्हा
विकास खंड



शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठीं ९२५ मण सुधारलेल्या धान्याचें बी वांटण्यांत आलें. १८४ मण गहूं व ६५४ मण रबी ज्वारी शेतकऱ्यांना वांटण्यांत आली. दर वर्षी रासायनिक खतांच्या विक्रीची मोहीम हातीं घेण्यांत येतें. त्यानुसार ६८७ मण अमोनियम सल्फेट, ४,४३१ मण सुपर फास्फेट वांटण्यांत आलें. जवळजवळ ३,००० कास्तकारांना, जापानी पद्धतीनें शेती करण्यास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीनें प्रात्यक्षिकें दाखविण्यांत आलीं.

एक ट्रॅक्टर स्टेशन बेला येथें १९५८ पासून सुरू करण्यांत आलें. त्याचबरोबर कृषि केंद्र पहेला येथें उघडण्यांत आलें. ह्यामुळें कास्तकारांना उत्तम प्रकारचे बि-बियाणें उपलब्ध होईल व चांगल्या धान्याची लागवड करतां येईल. कंपोस्ट खताची योजना लोकप्रिय करण्यासाठीं ५५० शोष खड्डे तयार करण्यांत आले.

पशुपालन

पशुंची सुधारणा करण्याकरितां एक कृत्रिम रेतन केंद्र भंडारा येथें सुरू करण्यांत आलें आहे व सुधारलेल्या जातींचे वळू प्रत्येक ग्रामसेवक मंडळांत देण्यांत आले. एक पशुचिकित्सालय बांधण्याचें काम सुरू आहे.

जमिनीला पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशानें जुन्या मालगुजारी तलावांची उपयुक्तता लक्षांत घेऊन ५५ सरकारी तलावांची, व १५ जुन्या विहिरींची दुरुस्ती करण्यांत आली. तसेच २७ नवीन तलाव व कांही खासगी तलावांची दुरुस्ती करण्यांत आली. शिक्षणाच्या दृष्टीनें ह्या गटानें एकंदर ३५ शाळा सुरू केलेल्या आहेत. ह्या शाळांपैकी १९ शाळांना स्वतःच्या इमारती नसल्यामुळें ७ इमारतीचें बांधकाम १९५७ मध्यें सुरू करण्यांत आलें. एका मिडलस्कूलच्या इमारतीचें काम पूर्ण झालें आहे.

तुमसर विकास गट

तुमसर विकास गटाचें १९५५ पासून समाज विकास गटांत रूपांतर करण्यांत आलें. ह्या गटांत १३९ गांवें आहेत. गटामध्यें १३४,७३७ एकर जमीन असून ११०,९७५ लोक राहतात. हें क्षेत्र मुख्यतः तांदूळ उत्पादन करणारे असून ६९,४३६ एकर जमीन लागवडीखाली आहे. सुमारें १०,३२० एकर जमीन झुडपी जंगलानें व्यापलेली आहे. खाणकाम व बिडचा बांधणें हे दोन प्रमुख व्यवसाय ह्या विभागांत चालतात.

येथील हवामान मुख्यतः तांदुळाच्या पिकाला पोषक आहे. त्याशिवाय तूर, ज्वारी, गहूं, जवस, इत्यादि पिकें काढण्यांत येतात. जुन्या रोवणीच्या पद्धतीची जागा आतां नव्या व सुधारलेल्या जापानी पद्धतीनें घेतलेली आहे. अस्तित्वांत असलेल्या १,१३३ तलावांपैकी १,०७६ तलावांपासून शेतकऱ्यांना पाणीपुरवठा होत आहे. चांदपुरी सरकारी तलावाचा ह्या गटाला बराच लाभ होत आहे.

पशुसंवर्धनाचें ह्या विकास गटांत दोन दवाखाने अस्तित्वांत आहेत. त्यापैकीं एक तुमसर व दुसरा सिहोरा येथें आहे. ह्या विभागांत मत्स्यपालन लोकप्रिय असून १५ गांवांतील तलावांत मत्स्यबीज सोडण्यांत आलें.

सहकार

शेतकरीवर्गानें सहकार समितींत सामील व्हावे याकरितां प्रत्येक ग्रामसेवक मंडळांत सहकारी ग्रामविकास सभेची स्थापना करण्यांत आली.

शिक्षण

गट चालू होण्यापूर्वी येथें तीन माध्यमिक शाळा, दोन पूर्व माध्यमिक शाळा आणि ३० प्राथमिक शाळा होत्या. १९५७-५८ मध्यें ह्या गटांत ६६ प्राथमिक शाळा, तीन माध्यमिक शाळा व चार पूर्व माध्यमिक शाळा होत्या. ह्यापैकीं ६ प्रायमरी शाळांचें बेसिक शाळांमध्यें रूपांतर करण्यांत आलें ; ३० शाळांचें बुनियादी शाळांमध्ये रूपांतर करण्यांत आलें. ह्या वर्षी ३३ शाळांच्या इमारती बांधून पूर्ण झाल्या आहेत. तुमसर येथील दवाखान्याचें प्राथमिक स्वास्थ्य केंद्रांत रूपांतर करण्यांत आलें असून ह्या स्वास्थ्य केंद्राचीं तीन उपकेंद्रें, सिहोरा, बघेडा व गोबरवाई येथें उघडण्यांत आलीं आहेत. सूतिकागृहें नाकाडोंगरी, तुमसर, सिहोरा, येथें सुरू करण्यांत आलीं आहेत.

J-130—2—A.

महाराष्ट्र प्रकाशक संस्था ...

अर्जुनी-मोरगांव

ह्या गटांतील लोकांचा प्रमुख धंदा शेतीचा आहे. शेकडा सुमारें ८५ लोक कास्तकार आहेत व यांचें मुख्य पीक धानाचें आहे. ६६,९११ एकर जमिनींत हें पीक काढण्यांत येतें. ह्या विकास गटांत २१० गांवें असून लोकसंख्या ७६,४०० आहे. क्षेत्रफळ ४५० चौ. मैल असून १५ ते २० गांवांत प्रत्येकीं एक याप्रमाणें ग्रामसेवकांचीं केंद्रें आहेत. लोकसंख्येच्या मानानें शेकडा १७ लोक साक्षर आहेत. येथें कोहळी, हरिजन व आदिवासी लोक प्रामुख्यानें राहतात. ते प्रामुख्यानें मराठी व गोंडी भाषा बोलतात.

पशु-संवर्धन ग्रामपंचायती मार्फत ह्या कार्याला उत्तेजन देण्यांत येत आहे. अर्जुनी येथें कृतिम गर्भधारण केंद्र, कुकुटपालन केंद्र सुरू झालेलीं आहेत.

आरोग्य व लोक-स्वास्थ्य येथें प्राथमिक स्वास्थ्य केंद्र स्थापण्यांत आलें असून दिघोरीं व सानगडी येथें सूतिकागृह उघडण्यांत आलें आहे. गट सुरू होण्यापूर्वी एक ॲलोपेथिक व दोन आयुर्वेदिक दवाखाने होते. परंतु साकोली जनपदतर्फे चार आयुर्वेदिक दवाखाने नवीन उघडण्यांत आले. तसेच नवेगांव येथील दवाखान्याचा विस्तार करण्यांत आला.

ह्या विभागाची हवा दमट असल्यामुळें व जिकडे तिकडे जंगलें असल्यामुळें रोगांचें प्रमाण जास्त आहे परंतु मलेरिया प्रतिबंधक टोळीमार्फत सर्व गांवागांवांतून वर्षांतून दोनदा डी.डी.टी. फवारण्यांचें कार्य होत असते.

सहकार गट सुरू झाल्यापासून ११ प्राथमिक सहकारी समित्या, एक औद्योगिक संस्था, तीन बहुउद्देशीय सहकारी संस्था सुरू करण्यांत आल्या. तसेंच शेंकडा ७० कास्तकारांना सहकारी संस्थेच्या कार्यक्षेत्रांत आणण्यांचें प्रयत्न करण्यांत येत आहेत.

ह्या गटांत २६ प्राथमिक शाळा, दोन माध्यमिक शाळा पूर्वीपासून होत्या. गट सुरू झाल्यापासून ६४ प्राथमिक शाळा, ५ माध्यमिक शाळा सुरू करण्यांत आल्या. अर्जुनी येथें एक हायस्कूल सुरू करण्याचे प्रयत्न चालू आहेत. ह्या गटांत केंद्रीय समाज-कल्याण समितीची स्थापना करण्यांत आली आहे. दळणवळणाची साधणें येथें कमी असल्यामुळें ठिकठिकाणीं रस्ते बांधण्याचे काम सुरू आहे. साकोली तें लाखांदूर ह्या रस्त्याचें काम सुरू आहे.

साकोली विकास गट

ह्या गटांत १३३ गावें आहेत. लोकसंख्या १००,२५० असून त्यांचा मुख्य धंदा शेतीचा असून बिडचा तयार करणें व व्यापार करणें इत्यादि साहाय्यक धंदे ह्या विभागांत चालतात. गट १९५६ पासून सुरू करण्यांत आला.

शेती शेतकऱ्यांना शेतीसंबंधी आधुनिक पद्धतीची माहिती देऊन प्रोत्साहन देण्यांत येते. मागील वर्षीं ह्या क्षेत्रांत २,२९५ एकरांत जापानी पद्धतीनें धानाची लागवड करण्यांत आली. १९५७-५८ मध्यें १०,००० एकड जमिनींत धानाची लागवड जापानी पद्धतीनें करण्यांत आली. एकूण ६५१ मण सुधारलेलें बी-बियाणें पेरणीकरितां, २८७ मण गहूं, ६० पौंड तूर व इतर भाजीपाल्यांचें बी देण्यांत आलें. त्याचबरोबर रासायनिक खतें १५,८०९ मण अमोनियम सल्फेट, १९,५६२ मण सुपरफास्फेट देण्यांत आलें. ताऊची गुरमा कास्तकारांना देण्यांत आले. पिकांचें निरनिराळ्या रोगांपासून संरक्षण करण्याकरितां जंतुनाशक औषधें फवारण्यांत आलीं.

सहकार या वर्षीं ह्या विभागांत २७ सहकारी पतपेढ्या होत्या. ३३ पतपेढ्या आणखी आयोजित करण्यांत आल्या व सदस्यांची ९६६ ची संख्या ५,३२४ पर्यंत वाढविण्यांत आली. त्याचें क्षेत्र ९७ खेड्यांपासून १३३ खेड्यांपर्यंत सहकाराच्या क्षेत्रांत आणण्यांत आलें. साकोली व सेलोटी येथें मच्छिमारी संस्था सुरू करण्यांत आली असून सहकारी धान्य भांडार पिंपळगांव येथें सुरू करण्यांत आलें. हीं भांडारें बोरगांव, आमगांव, पिंडकेपार, लाखोरी येथें स्थापण्याचें प्रयत्न सुरू होते. चर्मकारांची सहकारी संस्था लाखनी येथें सुरू झालेली आहे.

शिक्षणाच्या दृष्टीनें १० शाळांच्या इमारतींचें काम १९५७ मध्यें पूर्ण झालें होतें. ४३ बालविकास मंडळें स्थापण्यांत आलीं. १४ सामूहिक करमणूक केंद्रें सुरू करण्यांत आलीं.

तिरोडा विकास गट

ह्या विकास गटांत एकूण १२४ खेड्यांचा समावेश करण्यांत आला आहे. येथील लोकांचा प्रमुख धंदा शेतीचा असून दुय्यम धंदा बिड्या तयार करणें हा होय. गटांतील एकूण १०४,७६० लोकसंख्येपैकी २०,९५२ कुटुंबें २०२ चौ. मैलांत राहतात. गटाचें मुख्यालय तिरोडा येथें असून तालुक्याच्या मुख्यालयापासून १९ मैलांवर व जिल्ह्याच्या मुख्यालयापासून ३१ मैलांवर आहे.

शेती

प्रथम व द्वितीय पंचवार्षिक योजनेंत शेतकी विभागाच्या अधिक उत्पादन मोहिमेवर विशेष भर देण्यांत आला. लागवडीपैकी एकूण जमिनींतील बरीचशी जमीन तांदुळाच्या लागवडीखाली असते. पिकाखालील एकूण जमीन ९४,०५६ एकर आहे. त्यापैकी पाटबंधाऱ्यांचें पाणी देऊन ४४,७०९ एकर जमीन लागवडीखाली आणण्यांत येते. ९,५५० एकर जमीन जंगलांखाली आहे. ७५,९८६ एकर जमीन तांदुळाच्या लागवडीखाली आणण्यांत आली. यांत तीन मोठे तलाव असून अनेक लहान लहान तलाव आहेत. जपानी पद्धतीनें शेती करण्यासंबंधी प्रचार करण्यांत येत असून याकरितां ८८५ प्रात्यक्षिकें दाखविण्यांत आलीं. तांदुळाचें सुधारलेलें बी १२,८९५ मण तसेंच ९३७ टन कृत्रिम खतें, २५६ टन अमोनियम सल्फेट, ३७ टन सुपर फास्फेट, १,९७१ पौंड कीटकनाशक द्रवें देण्यांत आलीं.

बांधकाम

गटांत ६० शाळा असून फारच थोड्या शाळांना स्वतःच्या इमारती आहेत. त्या दृष्टीनें शाळाइमारती बांधण्याचें कार्य ह्या वर्षी सुरू करण्यांत आलें. त्यापैकी एकूण १६ इमारती ह्या वर्षी बांधून झाल्या. १८ सडकांचें कार्य सुरू होतें. ४३ विहिरींचें बांधकाम हातीं घेण्यांत आलें. एक गोसदन, तसेंच तिरोडा, परसवाडा सूतिकागृहाचें बांधकाम, पंचायतघराचें बांधकाम, तलाव दुरुस्तीचें काम पूर्ण झालेलें आहे.

समाज शिक्षण व शिक्षण

ग्रामीण युवकांत खेळीमेळीचें वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशानें ५ क्रीडा मंडळें, ३४ भजनी मंडळें, १० ग्रामीण वाचनालयें, ८ नाट्य मंडळें, ५ महिला मंडळें, सामुदायिक मनोरंजन केंद्रें ह्या वर्षी सुरू करण्यांत आलीं. गटांत एकंदर ५७ शाळा असून त्यांत १०,००० विद्यार्थी शिक्षण घेत होते. सहा बुनियादी शाळा व १० बालविकास पथकें आहेत.

सहकार्य

ह्या गटांत ५ धान्य कोठारे, १६ सहकारी पतपेढ्या व १२ औद्योगिक सहकारी संस्था ह्या वर्षी आयोजित करण्यांत आल्या. तसेच एक मत्स्यसंवर्धन संस्था व एक बुरडकामाची संस्था स्थापण्यांत आल्या.

लोकस्वास्थ्याच्या दृष्टीनें ह्या विभागांत एक प्राथमिक स्वास्थ्य केंद्र सुरू करण्यांत आलें. तसेंच गुरांकरितां एक दवाखाना व की-व्हिलेज केंद्र व पशुसुधार केंद्र सुरू झालेलीं आहेत.

भंडारा विकास गटांत १९५९-६० साली शेतकी खात्यातर्फे ७३० मण सुधारलेल्या धानाचें बी वाटण्यांत आलें. १,५०० मण धान, लोकांनीं निर्माण केलेल्या बियाणांतून, वाटण्यांत आलें. तसेंच एकंदर १,०४१ मण सुधारलेल्या गव्हाचें बी व २९ मण ज्वारीचें बी सुद्धां वांटण्यांत आलें. सुधारलेल्या बी-बियाण्याखालील जमीन एकंदर ५,९०० एकर होती. सुधारलेलें बी वापरल्यामुळें धानाचे पीक एकरीं २५ मण झालें. तसेंच ह्या गटांत ५,९६० मण अमोनियम सल्फेट, २,८५१ मण सुपर फास्फेट व ३११ मण

सनसीड वाटण्यांत आलें. रासायनिक खतें टाकण्यांत आलेल्या जमिनीचें ह्या गटांतील क्षेत्रफळ ११,००० एकर आहे. ओलीताकरितां म्हणून एकंदर १७ विहिरी बांधण्यांत येऊन २ विहिरी ह्या वर्षी दुरुस्त करण्यांत आल्या. तसेंच ८ तलावसुद्धा बांधण्यांत आले. ह्यामुळें एकंदर २०८ एकर अधिक जमीन ओलीताखाली आली. किडयापासून पिकांचें नुकसान होऊं नये म्हणून ६८१ पौंड जंतुनाशक औषधें वाटण्यांत आलीं. एकंदर ६० शेतकरी युनियन स्थापन करण्यांत आल्या. त्यांतील सभासदांची संख्या ५५३ आहे.

मोरगांव अर्जुनी विकास गट

हा विकास गट २-१०-५३ रोजीं प्राथमिक विकास गट म्हणून उघडण्यांत आला व १९५६ मध्यें समाज विकास गट संबोधण्यांत येऊन तेथील कार्याचा वेग वाढविण्यांत आला.

ह्या गटातर्फे १९५९-६० साली २६३ मण सुधारलेलें बी-बियाणें, ९,८०५ मण रासायनिक खतें, व १६४ ताऊची गुरमा वाटण्यांत आले. १६३ खताचे खड्डे खोदण्यांत आले. ७४ सांडपाणी शोषक खड्डे खोदण्यांत आले. एकंदर २०० एकर जमीन भाजीपाल्याखाली आणण्यांत आली. ओलीताकरितां म्हणून ३४ नव्या विहिरी खोदण्यांत आल्या व १४ विहिरींची दुरुस्ती करण्यांत आली. ३१३ एकरांत बांध घालण्यांत येऊन २,६४१ एकर अधिक जमीन ओलीताखाली आणण्यांत आली. पशुसंवर्धनाच्या योजनेखाली ६९८ सांड खच्ची करण्यांत येऊन ४,९९७ गुरांना लस टोचण्यांत आली. पिण्याच्या पाण्याकरितां ६ विहिरी बांधण्यांत येऊन २ विहिरी दुरुस्त करण्यांत आल्या. शिक्षणाचा प्रसार अधिक सुलभतेनें करतां यावा म्हणून शाळेकरितां ६ खोल्या बांधण्यांत आल्या व १७ खोल्याचें बांधकाम चालू होतें. एकंदर २७ वर्ग साक्षरता प्रसाराकरितां म्हणून उघडण्यांत आले.

तसेच १०१ फर्लांग कच्चे रस्ते तयार करण्यांत आले. चामडे कमाविणें व भांडी बनविण्याकरितां काढलेल्या शाळांतून एकंदर १८ विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यांत आलें. दोन उद्योगधंदेविषयक संस्था सुरू करण्यांत आल्या. त्यांतील सभासदांची संख्या एकंदर १०० आहे. अर्जुनी येथें विटा बनविणाऱ्यांची संस्था स्थापन करण्यांत आली. ह्या संस्थेतर्फे ३८६,१६० विटा व ४,५०० कवले बनविलीं गेलीं.

ह्या वर्षी सहकारी संस्था सुरू करण्यावर जास्त भर देण्यांत आला. २६ सर्व्हिस सहकारी संस्था व एक खरेदी-विक्री समिती उघडण्यांत आली. सभासदांच्या संख्येंत एकंदर १,७८२ नी वाढ झाली. ह्यानंतरसुद्धा गटांतील सर्व कुटुंबांना सहकारी संस्थेंत सामील करण्याबद्दल प्रयत्न करण्यांत येत आहेत.

तिरोडा विकास गट

हा विकास गट २-१०-५३ रोजीं सुरू करण्यांत आला व १-४-५६ मध्यें ह्या गटाचे प्राथमिक विकास गटांतून समाज विकास गटांत रूपांतर करण्यांत आलें. तीन वर्षानंतर म्हणजे १-७-५९ रोजीं ह्या गटाला स्टेज दोन नांव देण्यांत आलें.

ह्या गटातर्फे १९५९-६० सालीं ९९९ मण बी-बीयाणे, ७,३७८ मण रासायनिक खतें व १०९ शेतकी अवजारें वांटण्यांत आलीं. २०३ खताचे खड्डे खणण्यांत येऊन, ५३ सांडपाणीशोषक खड्डे तयार करण्यांत आले. २४ एकर जमीन फळझाडाखाली आणण्यांत आली. २,२८८ एकर पडीत जमीन लागवडीखाली आणण्यांत येऊन, ४९९ एकर जमिनीला बांध घालण्यांत आले.

ओलीतासाठीं २४ विहिरी बांधण्यांत येऊन १३ विहिरी दुरुस्त करण्यांत आल्या. पशुसंवर्धनाच्या योजनानुसार ६०२ बळूंना खच्ची करण्यांत येऊन ३,५११ जनावरांवर उपचार करण्यांत आले. पिण्याच्या पाण्याकरितां ११ विहिरी बांधण्यांत आल्या व १४ विहिरी दुरुस्त करण्यांत आल्या. २७ संडास तयार करण्यांत आले. शिक्षण खात्यातर्फे एक नवीन शाळा उघडण्यांत येऊन आठ शाळांच्या इमारती बांधण्यांत आल्या. तसेंच शाळाकरितां नव खोल्या बांधण्यांत आल्या व सहा खोल्यांचें बांधकाम सुरू आहे. ५५ समाज शिक्षणाचे वर्ग घेण्यांत आले व साक्षरता प्रसारासाठीं पांच वर्ग घेण्यांत आले. १६ मैल दहा फर्लांग रस्ते बांधण्यांत आले व नव मैल दोन फर्लांग रस्त्यांचीं दुरुस्ती करण्यांत आली. ह्या गटातर्फे गतवर्षी ३७ सहकारी संस्था सुरू करण्यांत आल्या.

सालेकसा विकास गट

हा विकास गट १-४-५८ रोजीं प्रथम गट म्हणून उघडण्यांत आला. हयाचा काळ पांच वर्षांचा आहे. पांच वर्षानंतर म्हणजे १९६३ मध्यें हा द्वितीय दर्जाचा होईल. हयांत ८६ खेडीं सम्मिलीत केलीं असून त्यांनीं १८७,११० एकर जागा व्यापलेली आहे. हया गटाची लोकसंख्या ४७,२६६ आहे.

हया गटातर्फे १०६ मण बियाणें १९५९-६० साली वांटण्यांत आलें. तसेंच १,३३४.३१ मण रासायनिक खतें व तीन शेतकी अवजारें वांटण्यांत आली. ३७९ खताचे खळगे व ५१ सांडपाणी शोषक खड्डे खणण्यांत आले. ११.७० एकर जमीन फळझाडाखाली आणण्यांत आली व ३०.६० एकर जमीन भाजीपाल्याखाली आणण्यांत आली. १२५ एकर पडीत जमीन लागवडीखाली आणण्यांत आली व ७,३६२ एकर जमिनीला बांध घालण्यांत आले. ओलीताखाली जमीन आणण्याकरितां ३२ विहिरी बांधण्यांत येऊन पांच विहिरी दुरुस्त करण्यांत आल्या. एकंदर १,११० एकर जमीन (अधिक) ओलीताखाली आणण्यांत आली. पशुसंवर्धन योजनेनुसार ९७७ बळूंना खच्ची करण्यांत आले व २२,१०३ जनावरांवर उपचार करण्यांत आले. पिण्याच्या पाण्याकरितां आठ विहिरी खोदण्यांत येऊन एक विहीर दुरुस्त करण्यांत आली. ११ संडास बांधण्यांत आले.

शिक्षण खात्यातर्फे तीन नवीन शाळा बांधण्यांत येऊन आठ शाळांकरितां खोल्या बांधण्यांत आल्या. पांच साक्षरता वर्ग सुरू करण्यांत आले. एकंदर १०८ फर्लांग लांबीचे रस्ते बांधण्यांत आले व ४६ फर्लांग लांबीचे रस्ते दुरुस्त करण्यांत आले. हया गटातर्फे १९५९-६० सालीं १९ सहकारी संस्था निर्माण करण्यांत आल्या.

आमगांव विकास गट

हा विकास गट १-४-५८ रोजीं पूर्व विस्तार विकास गट म्हणून सुरु करण्यांत आला. १-४-६० रोजी प्रथम विकास गटांत रूपांतरीत करण्यांत आला. हया गटांत एकंदर ५० खेडीं असून त्यांनीं ६२,७३५ एकर जागा व्यापलेली आहे. हया गटांतील लोकांची संख्या ४३,३४४ आहे. हया गटातर्फे १९५९-६० मध्यें ४०१ पौंड बियाणें वाटण्यांत येऊन १,५९४ पोती अमोनियम सल्फेट व ४६२ पोती सुपर फॉस्फेट विकण्यांत आले. ६१ शेतीचीं अवजारें वाटण्यांत आलीं, ६३४ खताचें खड्डे खणण्यांत आले व ६८ सांडपाणी शोषक खड्डे खणण्यांत आले. २९२ एकर पडीत जमीन लागवडीखाली आणण्यांत आली व २८४ एकर जमिनीला बांध घालण्यांत आले. ३१ नव्या विहिरी ओलीताकरितां बांधण्यांत आल्या व दहा विहिरी दुरुस्त करण्यांत आल्या. हयामुळें ५०० एकर अधिक जमीन ओलीताखाली आली. १६९ बळू खच्ची करण्यांत येऊन ४६० गुरांवर उपचार करण्यांत आले. पिण्याच्या पाण्याकरितां १२ विहिरी दुरुस्त करण्यांत आल्या. ४० सहकारी संस्था उघडण्यांत आल्या व सहकारी पद्धतीवर एक तेलघाणी सुरू करण्यांत आली.

देवरी विकास गट

हा विकास गट २-१०-५९ रोजीं उघडण्यांत आला. देवरी पूर्व विस्तार गट असून हया गटांत मागासलेल्या वर्गाची बरीच लोकवस्ती आहे. मुख्य धंदा शेतीचा असून बिडचा तयार करण्याचाहि धंदा चालतो. हा गट अगदी प्रथमावस्थेंत असल्यामुळें फारशी प्रगति होऊं शकली नाहीं. हया गटांत २१ खड्डे व आठ सांडपाणी शोषक खड्डे आतांपर्यंत बांधण्यांत आले. ओलीताकरितां दोन विहिरी खणण्यांत येऊन चार विहिरी दुरुस्त करण्यांत आल्या. एकंदर तीन एकर अधिक जमीन ओलीताखाली आणण्यांत आली. ३५ जनावरांवर उपचार करण्यांत आले व त्यांना औषधें देण्यांत आलीं. शाळेकरितां १२ खोल्या बांधण्यांत आल्या व चार साक्षरता वर्ग सुरूं करण्यांत आले. ३८ लोक साक्षर करण्यांत आले. ३,४०० फूट कच्चे रस्ते तयार करण्यांत आले व ८०० फूट रस्ते दुरुस्त करण्यांत आले. हया गटातर्फे आतांपर्यंत ३५ सहकारी संस्था निर्माण करण्यांत आल्या व सहकार्यावर जास्त भर देण्यांत आला.

स्थानिक संस्था

भंडारा जिल्हयांत एकंदर ५ नगरपालिका आहेत. त्या गोंदिया, भंडारा, तुमसर, पवनी व तिरोरा येथें आहेत. पैकी गोंदिया व भंडारा नगरपालिकेच्या हद्दीत २० हजारापेक्षां जास्त लोकसंख्या आहे तुमसर व पवनी नगरपालिकेच्या हद्दींत १० ते २० हजाराच्या दरम्यान लोकसंख्या आहे. व तिरोरा

नगरपालिकेच्या हद्दींत ५ हजार ते १० हजाराच्या दरम्यान लोकसंख्या आहे. शहरांतील जनतेच्या आरोग्याकडे लक्ष देणें, साफसफाई करणें, दिवाबत्तीची सोय करणें, पाणीपुरवठा करणें, शैक्षणिक संस्था चालविणें, इत्यादि कामें नगरपालिकेला करावी लागतात. ह्याकरितां लागणारा पैसा नगरपालिका कराच्या रूपानें वसूल करतात. १९५९-६० साली नगरपालिकांनीं वसूल केलेल्या व खर्च केलेल्या पैशाचा हिशेब पुढीलप्रमाणें देतां येईल.

भंडारा नगरपालिका

ह्या नगरपालिकेला कराच्या रूपानें २,८८,५६१ रुपये, इतर स्पेशल कायद्यामुळें ६,५२१ रुपयें, स्वतःच्या मालमत्तेंतून ३६,०८८ रुपये, मिळालेल्या देणग्यामुळें १,४३,१६२ रुपये व इतर चिल्लर उत्पन्न २,८१४ रुपये मिळालें. नगरपालिकेला एकूण उत्पन्न ५,१७,१५३ रुपये झालें. मागील वर्षाची बाकी १,०३,६३५ रुपये व कर्ज वसुली वगैरेपासून उत्पन्न १,१७,६२१ रुपये असे एकंदर नगरपालिकेजवळ ७,३४,५१० रुपये खर्चावियासाठीं होते. त्यापकी नोकरवर्गावर २,०४,८०७ रुपये, लोकांच्या सुरक्षितेसाठीं २७,६७२ रुपये, आरोग्य १,३७,५२० रुपये, सार्वजनिक संस्था १,२३,९५८ रुपये, देणग्या ४१० रुपये, कर्ज वगैरे देणें १,१५,१२७ रुपये व इतर चिल्लर खर्च ८,७२९ रुपये, अशा रीतीनें एकंदर ६,१८,२१६ रुपये खर्च आला व १,२०,१९५ रुपये नगरपालिकेजवळ शिल्लक होते.

गोंदिया नगरपालिका

ह्या नगरपालिकेला कराच्या रूपानें २,८९,११५ रुपये, स्पेशल कायद्यामुळें २,१४८ रुपये, स्वतःच्या मालमत्तेंतून २,१६,१६६ रुपये, मिळालेल्या देणग्या १,८६,२५१ रुपये व इतर चिल्लर उत्पन्न झालें. कर्जवसुली वगैरेच्या रूपानें मिळालेलें ३१,२५९ रुपये व मागील वर्षाची शिल्लक ७१,४९० रुपये मिळून नगरपालिकेजवळ ७,९५,२३७ रुपये खर्चावियासाठीं होते. त्यापैकी नौकरवर्गावर ५६,२४४ रुपये, लोकसुरक्षिततेसाठीं ३०,५९५ रुपये, आरोग्य व सोय २,४९,१५४ रुपये, सार्वजनिक संस्था २,६३,०४५ रुपये, देणग्या २७५ रुपये, चिल्लर १४,५४१ रुपये व कर्ज ७८,९९४ रुपये, ह्याकरितां एकंदर ६,९२,८९८ रुपये खर्च आला. वर्षाअखेर १,०२,३३९ रुपये शिल्लक होते.

पवनी नगरपालिका

ह्या नगरपालिकेला कराच्या रूपानें ७९,१९६ रुपये, इतर स्पेशल कायद्यामुळें ८२७ रुपये, स्वतःच्या मालमत्तेंतून १४,२८३ रुपये, मिळालेल्या देणग्या ४६,३१६ रुपये व इतर चिल्लर १,६८१ रुपये मिळून एकंदर १,८२,३०३ रुपये उत्पन्न झालें. कर्जवसूली १३,७०० रुपये व मागील वर्षाची शिल्लक २०,९९३ मिळून नगरपालिकेजवळ २,१६,९९६ रुपये होतें. त्यापैकी नौकरवर्गावर खर्च ३७,८५८ रुपये, लोकसुरक्षितता ८,०४७ रुपये, आरोग्य व इतर सोयी ४३,२७८ रुपये, सार्वजनिक संस्था ८०,४३१ रुपये, देणग्या ९० रुपये व चिल्लर ५,१८६ रुपये मिळून एकंदर १,९०,३८६ रुपये खर्च झाले. वर्षाअखेर २६,६१० रुपये शिल्लक होतें.

तुमसर नगरपालिका

ह्या नगरपालिकेला कराच्या रूपानें २,७५,५८५ रुपये, इतर स्पेशल कायद्यामुळें ४६८ रुपये झालें. स्वतःच्या मालमत्तेंपासून ८०,२४२ रुपये झाले. मिळालेल्या देणग्या २,४५,०४८ रुपये व चिल्लर ९,३६५ रुपये असे एकंदर ६,१०,६९८ रुपये उत्पन्न झाले. मागील वर्षाची शिल्लक १,७७,५४० रुपये व कर्जवसूली वगैरे ७२,७४६ रुपये मिळून नगरपालिकेजवळ ८,६१,०२४ रुपये होते. त्यापैकीं नौकरवर्गावर ९०,३६९ रुपये, लोकसुरक्षिततेसाठीं २२,१४९ रुपये, आरोग्य व सोय १,५९,३५६ रुपये, शिक्षणाकरितां २,०३,१९९ रुपये, इतर चिल्लर ५,०५६ रुपये व कर्ज वगैरे ६२,६४६ रुपये, असे एकंदर ५,४२,८२५ रुपये खर्च झाले व शिल्लक ३,१८,१९९ रुपये होती.

जनपद सभा

भंडारा जिल्हयांत तीन तालुक्यांत तीन जनपद सभा असून त्यांवर मुख्य कार्यपालन अधिकारी, यांची देखरेख असते. ह्या जनपद सभेच्या उत्पन्नाचा व खर्चाचा आढावा खालीलप्रमाणें देतां येईल.

हृया सभेला जमिनीमुळें १,०६,८६८ रुपये, लोकल रेट ३,५९,८०२ रुपये, व्याज ८ रुपये, शिक्षण १०,६६,७६६ रुपये, आरोग्य व औषधी ६७ रुपये, विज्ञान व इतर चिल्लर खाती २,१९० रुपये, इतर चिल्लर उत्पन्न १,३०,४५५ रुपये व बांधकाम ६,०८० रुपये मिळून एकंदर १६,७७,६४८ रुपये मिळाले. मागील वर्षाची शिल्लक सस्पेन्स अकाउंट मिळून एकंदर २,६६,६०० रुपये जनपदसभेजवळ होते. पैकी नौकरवर्गावर २७,६०५ रुपये, कायदा व न्याय हृयावर २५० रुपये, शिक्षणावर १२,३३,७४१ रुपये, औषधावर ८३,३३५ रुपये, विज्ञान व चिल्लर खात्यावर १८,२१५ रुपये, सुप. अलाउन्स एंड पेन्शन्स १५,००० रुपये, चिल्लर व इतर खर्च १०,१३३ रुपये, बांधकाम वगैरे २,२९,२३५ रुपये व सस्पेन्स अकाउंट ३,४२,९९० रुपये, मिळून एकंदर १,९८,५६१ रुपये खर्च झाला व १,८०,७३९ रुपये शिल्लक होते.

गोंदिया जनपद सभा

हृया जनपद सभेला लोकल रेटमुळें १,६८,८२० रुपये, शिक्षणामुळें ७,४१,१२२ रुपये, औषधी १४,९१४ रुपये, विज्ञान व इतर खाती यामुळें १,३५८ रुपये, इतर चिल्लर उत्पन्न १०,०५५ रुपये व बांधकाम ६,४४६ रुपये मिळून १०,३२,७२१ रुपये उत्पन्न झाले. त्यांत मागील सस्पेन्स अकाउन्ट व मागील शिल्लक मिळून १५,५९,७६९ रुपये जनपद सभेजवळ होते. त्यापैकी नौकरवर्गावर २७,३०८ रुपये, कायदा व न्याय ९४० रुपये, शिक्षणावर ८,१२,४७९ रुपये, औषधी १,११,५५७ रुपये इतर खात्यावर ७,३२९ रुपये, एस. ए. अलाउंन्स २१,३७० रुपये, चिल्लर खर्च १८,८८० रुपये, बांधकाम ३३,७४८ रुपये व सस्पेन्स अकाऊंट ३३,७४८ रुपये असे एकंदर ११,७७,२४१ रुपये खर्च झाले व ३,२५,७२२ रुपये शिल्लक होती.

साकोली जनपद सभा

जनपद सभा, भंडारा, हिनें १९५८ साली असलेल्या १९८ प्राथमिक शाळांची संख्या १९५९-६० पर्यंत २९१ वर नेली. एकूण प्राथमिक शाळा हृया जनपद सभेच्या अधिकार क्षेत्रांत २११ आहेत. तसेंच सर्व माध्यमिक शाळा १७ आहेत. जनपद सुरू झाल्यापासून येथील प्राथमिक शाळेंत एकूण ६०० शिक्षक आहेत. पूर्व माध्यमिक शाळेंत एकूण शिक्षक ८७ आहेत. विविध योजनेवर शैक्षणिक संस्थेकरितां शासनाकडून मिळालेलें अनुदान ६,७०,४५८ रुपये आहे. एकूण उत्पन्न ६,८१,६१५ रुपये असून, खर्च ७,३७,८०५ रुपये आहे. जनपद आपल्या उत्पन्नाच्या शेकडा ६७ रुपये खर्च शिक्षणावर करीत आहे. तसेंच हृया जनपद सभेतर्फे चालणाऱ्या औषधालयांची संख्या १६ असून सूतिकागृह चार आहेत व ॲलोपेथिक दवाखाना एक आहे. जनपद सभा सहा गुरांचे दवाखाने चालवीत आहे व कोंडवाड्याची संख्या २९ वर गेलेली आहे.

भंडारा जनपद सभा

गुरांचे बाजार २० ठिकाणीं भरत असतात. हृयापासून जनपदला बरीच आमदानी होत असते. बैठकी बाजार सहा भरतात. हृयांच्यापासून देखील बरेच उत्पन्न होत आहे.

बाजार

ग्रामपंचायती

जिल्हृयांतील प्रत्येक खेड्यांत ग्रामपंचायत असावी असें धोरण असून त्या दृष्टीनें लोकसंख्येच्या मानाने स्वतंत्र आणि सामूहिक मिळून पूर्ण जिल्हृयांत ९५४ ग्रामपंचायतींची स्थापना करण्यांत आलेली आहे. आतां जिल्हृयांत ग्रामपंचायत नाही असे एकहि खेडें नाहीं. जिल्हृयांत एकूण १,६४४ खेडीं असून ९५४ पंचायती आहेत. ९५४ पंचायतीपैकी ७३४ स्वतंत्र पंचायती असून २२० सामूहिक पंचायती आहेत. हृयापकी १९५९-६० मध्यें स्थापन झालेल्या १७२ ग्रामपंचायतीमध्यें निवडणुकीसंबंधीची कारवायी संपत आलेली आहे व त्या लवकरच सुरू करण्यांत येतील. १९५७-५८ मध्यें एकूण ७०६ पंचायती होत्या, १९५८-५९ मध्यें १९४ खेडीं मिळून ६१ सामूहिक पंचायती व १५ खेड्यांत १५ स्वतंत्र पंचायतींची स्थापना करण्यांत आली. १९५९-६० मध्यें ५११ खेडीं मिळून १५९ सामूहिक पंचायती व १३ खेड्यांत १३ स्वतंत्र पंचायतीची स्थापना करण्यांत आली. पंचायत स्थापनेचा कार्यक्रम १९५९-६० मध्यें पूर्ण करण्यांत आला. १९५९-६० मध्यें स्थापन झालेल्या १७२ ग्रामपंचायती खेरीज करुन ६८२

ग्रामपंचायतीला १९५८-५९ मध्यें रुपये १,९७,१४७.०३ न.पै. मालकाडीवरील अनुदान दिलें. १९५९-६० मध्यें रुपये २,३२,८६२.४९ न.पै. मालकाडीवरील अनुदान दिलें. जिल्ह्यांत सध्या १५५ ग्रामसाहाय्यक आहेत. १५५ पैकी १३४ ग्रामसाहाय्यकांना पटवारी कामाचें प्रशिक्षण देण्यांत आलें.

भंडारा जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यांत ग्रामपंचायती खालीलप्रमाणें आहेत--

तालुका	ग्रामपंचायत	खेडीं
भंडारा तालुका	१८८	५५८
साकोली तालुका	३३४	६२२
गोंदिया तालुका	३३२	४६४
एकूण ...	९५४	१,६४४

६ : शेतकी अर्थव्यवस्था

हवामान व पाऊस ह्यांचें स्थान शेतकी अर्थव्यवस्थेमध्यें फार महत्त्वाचें आहे. कास्तकारी करण्याची पद्धत, धान्याची उपज करण्याची पद्धत, पाट बांधण्याची पद्धत, इत्यादि अनेक बाबींची उत्तम पीक काढण्यास मदत होते. ह्या जिल्ह्यांतील उत्तम पाऊस आणि जमिनीची सुपिकता यामुळें उत्तम पीक घेतां येतें. येथें मुख्य पीक धानाचें आहे. तलावांतील पाणी पिकांस नियमितपणें मिळत असल्यामुळें येथें भाताची लागवड करणें सोयीचें व फायद्याचें ठरतें.

शेतकी अर्थव्यवस्था.

जमिनीची उपयुक्तता

	एकंदर जमीन	टक्केवारी	एकंदर जमीन	टक्केवारी
	वर्ष १९५७-५८		वर्ष १९५८-५९	
(१) एकंदर जमीन	२२,८३,०४९	१००	२२,८३,०४९	१००
(२) जंगलांनीं व्यापलेली जागा ...	६,४९,१४६	२८.४	६,४०,३५९	२८.००
(३) पडीत जमीन	३९,७००	१.७	३९,८३६	१.७
(४) गैरशेतकीच्या उपयोगांत असलेली जमीन	१,८३,४९७	८.१	१,८५,४९३	८.३
(५) लागवडीयोग्य पडित जमीन ...	६९,८४६	३.१	७१,१९६	३.३
(६) चराइचें क्षेत्र	३,२८,००१	१४.३	३,३४,६८२	१४.२

ह्या विभागामध्यें जंगलाचें क्षेत्र एकंदर जमिनीपेक्षां शेकडा २८.० आहे. जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिति अशी असल्यामुळें वैनगंगेच्या खोऱ्यांत व वाघ-पांगोलीच्या खोऱ्यांत अनेक तलावाची सोय उपलब्ध आहे. कालव्यांतून शेतीकरितां पाण्याची सोय करून घेण्यांत येते.

लोकांकरितां पाणी घेण्याचा प्रकार	वर्ष १९५७-५८	टक्केवारी क्षेत्र	वर्ष १९५८-५९	टक्केवारी क्षेत्र
कालवे	५३,३६९	१६.६	४९,८०४	१७.२
तलाव	२,५३,९१५	७९.५	२,२९,३६२	७९.१
विहिरी	६,४३६	२.०	६,१५१	२.१
अन्य प्रकार	५,९३९	१.९	४,६३९	१.६
एकंदर ओलिताचें क्षेत्र	३,१९,६६१	१००	२,८९,६५४	१००

भंडारा जिल्हयांतील एकूण १,९५१,८७२ एकर आराजीपैकीं ८३८,३८२ एकर आराजी शेतीसाठी उपयोगांत आणली जाते. राहिलेली ६६१,८२१ एकर आराजी वन्य क्षेत्रांत मोडते. हया जिल्हयांतील मुख्य पिकें खालीलप्रमाणें आहेत :—

			एकर
(१) धान—ओलीत	...	...	२७५,७८५
वरथेंबी	...	...	३५६,५६२
एकूण		...	६३२,३८७
(२) गहू—ओलीत	...	...	३८२
वरथेंबी	...	...	७३,६८५
एकूण		...	७४,०६७
(३) ज्वारी—खरीप	...	...	१२,७४०
रबी	...	...	८९,०८५
(४) हरभरा (चणे)		...	२७,१३७
(५) जवस	...	...	१३०,६१४
(६) ऊंस	...	...	१,७७६
(७) डाळी— (अ) तूर		...	१४,८९३
(ब) उडीद		...	६१,६०८
(क) लाख		...	१०१,५२२

हवामान

हया जिल्हयांत सरासरी ५० ते ५५ इंच पाऊस पडतो. हें पाणी पावसाळचाच्या दिवसांत बहुतेक सर्वत्र सारखें पडते व ऑगस्ट महिन्यामध्यें साधारणतः जोराचा पाऊस पडतो. सन १९५९-६० साली नेहमीपेक्षां बराच जास्त म्हणजे ६९-७० इंच पाऊस पडला. उन्हाळचांतील कडक उष्णतामान व हिवाळचांतील थंडी असा विषम हवामानाचा हा प्रदेश आहे. पावसाळचाच्या सुरवातीस उन्हाळा पूर्णपणें संपलेला नसल्यामुळें हवा उष्ण असते. पावसाळचाच्या शेवटी हिवाळा जवळ येत असल्यामुळें हवामान थंड असते. अशा तऱ्हेचे हवामान धानास उत्तम असल्यामुळें हया जिल्हयांत महाराष्ट्रांत सर्वांत जास्त व उत्तम प्रकारचें भाताचें पीक होतें.

ओलीताची सोय

हया जिल्हयांत लहान मोठे अनेक मालगुजारी तलाव, विहिरी, शासकीय तलाव हयामुळें ओलीताची उत्तम सोय आहे. अन्दाजे ३५.६ टक्के आराजी म्हणजेच एकूण ८९८,३८२ एकर उठित जमीनीपैकीं ३१९,६६१ एकर जमिनीस ओलीत करण्याची सोय आहे. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणें आहे :—

तळयांची संख्या.—लहान १३,७५८, मोठीं ५८०; एकूण १४,३३८.

ओलीताखालील क्षेत्र.—२५३,९१५.

विहिरींची संख्या—८,६९५.

वरील प्रकारच्या हवामानाचा ओलीताचा व मुख्य पिकाचा अभ्यास करून ह्या जिल्ह्यांत धानाच्या उत्पन्नाच्या वाढीवर जोर देण्याचें कृषि विभागानें ठरविलें व जपानी पद्धतीची मोहीम ह्या जिल्ह्यांत सुरू केली.

एकूण ओलीत क्षेत्र.

जपानी भात शेतीची पद्धत ही प्रथमतः १९५२-५३ सालीं गोंदिया तहसिलीमध्यें पांच शेतकऱ्यांनीं सुरू केली. सन १९५३ पासून ह्या पद्धतीचा सर्व जिल्हाभर शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकें दाखवून पुरस्कार केला गेला. ह्या पद्धतीमुळें चटकन डोळ्यांत भरण्यासारखे जास्त उत्पन्न होत असल्यामुळें ती शेतकऱ्यांत फार लोकप्रिय झाली.

शेतकी खात्यामार्फत "अधिक धान्य पिकवा" योजनाखाली शेतकऱ्यांना शेतीच्या सुधारणेसाठीं व उपलब्ध जमिनींतून जास्त पीक काढण्यासाठीं १९५७-५८ मध्यें खालील सवलती जनतेला देण्यांत आल्या :—

ह्या जिल्ह्यांत धानाचें मुख्य पीक असल्यामुळें सुधारलेल्या धानाच्या बियाचें सवलतीच्या दरानें वांटप करण्याच्या योजनेनुसार १,४४,००० रुपये किंमतीचें निरनिराळ्या जातींचें ९,००० मण सुधारलेलें बी गरजू शेतकऱ्यांना वांटण्यांत आलें. त्याचप्रमाणें नगदीनें आणि तगाईवर कर्जरूपानें मूळ किंमतींत १५⅝ टक्के सूट देऊन बियाण्याचें वांटप करण्यांत आलें. तगावी रूपानें दिलेल्या कर्जावर सवलतीच्या व्याजाचा दर ४.११ टक्के आकारण्यांत येतो व सर्व रकमेची फेड व्याजासह एकाच हप्त्यांत करण्यांत येते.

गेरवा प्रतिबंधक जातीच्या गव्हाचें रु. ३१,९६०.४८ किंमतीचें १,२८५ मण बी शेतकऱ्यांना वरीलप्रमाणें वांटण्यांत आलें. सरकारी प्रक्षेत्रावरून घेतलेलें बी शेतकऱ्यांना मूळ किंमतींत देण्यांत आलें. इतर अ व ब वर्गाच्या सीड फॉर्ममधून विकत घेतलेलें बी शेतकऱ्यांना दर मणास दोन रुपये सूट देऊन वाटण्यांत आलें.

जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठीं हिरवें खत तयार करण्याकरितां, बोरूच्या बियाचें वांटप करण्यासाठीं एक योजना तयार करण्यांत आली. या योजनेंत बोरूच्या बियाण्याच्या मूळ किंमतींत ¼ इतकी रक्कम सूट देण्यांत येते आणि व्याजाचा दर ४.११ टक्के प्रमाणें आहे.

कृत्रिम खताचें वांटप

अमोनियम सल्फेट शेतकऱ्यांना नगदी व तगाई वर वाटण्यांत येते. व्याजाचा दर वरीलप्रमाणेंच आहे. कर्जाची रक्कम, ज्या पिकांकरितां खत दिलें असेल त्या पिकाची कापणी झाल्यावर एक हप्त्यांत (इंस्टालमेंट) वसूल केली जाते. या खताचा विक्रीचा दर ३८० रुपये टन किंवा ३९ रुपये पोते असा ठरविण्यांत आला होता. ह्या वर्षांत एकूण ७,१६,३०० रुपये किंमतीचे १,९८५ टन, ४ हंड्रेडवेट अमोनियम सल्फेट नगदीनें किंवा तगाईवर वाटण्यांत आलें. तसेंच २,१२,१०० रुपये किंमतीच्या ७६० टन सुफर फॉस्फेटचें वांटप १२½ टक्के सूट देऊन सवलतीच्या दरानें नगदी अगर तगाईवर करण्यात आलें.

रहाटाचें वांटप

ओलीताखाली जास्त जमीन आणण्याकरितां एकूण ९,००० रुपये किंमतीचे नव रहाट नव शेतकऱ्यांना २५ टक्के सूट देऊन सवलतीच्या व्याजाच्या दरानें नगदी आणि तगाई रूपानें वांटण्यांत आले. त्याचप्रमाणें ऑईल इंजिन पम्प खरेदी करण्याकरितां पम्पाच्या इंजिन खरेदी किंमतीइतकी रक्कम किंवा जास्तींत जास्त ३,४०० रुपये तगाई रूपानें कर्ज सवलतीच्या व्याजाच्या दरानें देण्यांत आले. गरजू शेतकऱ्याला ह्या रकमेची परत फेड ५ वर्षांत करायची असते. ह्यावर्षीं १७ इंजिन पम्प खरेदी करण्यासाठीं ५२,५४७ रुपये तगाई रूपानें शेतकऱ्यांना देण्यांत आले. ह्याशिवाय ज्या ठिकाणीं वीज उपलब्ध आहे, तेथील शेतकऱ्यांना विजेवर चालणारे इंजिन व पम्प विकत घेण्याकरितां प्रत्येक इंजिन पम्पाकरितां १,२०० रुपये तगाई रूपानें कर्ज सवलतीच्या व्याजाच्या दरानें देण्यांत येतें. कर्जाची फेड वरीलप्रमाणे ५ वर्षांत करावयाची असते.

२८ शेतकऱ्यांना ३२,८०० रुपयांचे इलेक्ट्रिक पम्प आणि १८ शेतकऱ्यांना ५६,२३२ रुपयांचीं ऑईल इंजिस् कर्जाऊ म्हणून देण्यांत आलें. ओलीताखाली जास्त जमीन आणण्याकरितां नवीन विहिरी खोदून त्यांचा उपयोग करण्यांत आला. ह्यासाठीं शेतकऱ्यांना प्रत्येक विहिरीसाठीं एक हजार रुपये कर्ज रूपानें देण्यांत येते, आणि कर्जाची रक्कम ५ वर्षांत, ५ हप्त्यांत परत करावी लागते. ह्या योजनेखाली २६ शेतकऱ्यांना विहिरी खोदण्यासाठीं २४,५०० रुपयांचें तगाई रूपानें कर्ज देण्यांत आलें. दुसऱ्या योजनेप्रमाणें

प्रत्येक विहिरीकरितां २,५०० रुपयांचें कर्ज शेतकऱ्यांना देण्यांत आलें. ह्या कर्जाची फेड दहा वर्षांत दहा हप्त्यांत करावयाची असते. विहिरीचें काम पूर्ण झाल्यावर शेतकऱ्याला कर्जाच्या ¼ इतकी रक्कम किंवा ५०० रुपयांची सवलत देण्यांत येते. व्याजाचा दर ४½ टक्के पडतो. या योजनेनुसार ८ शेतकऱ्यांनीं ८ विहिरी बांधण्यासाठीं कर्ज रूपानें ८०० रुपयाचा पहिला हप्ता उचललेला आहे, आणि दुसरा हप्ता काम पूर्ण झाल्यावर देण्यांत येईल. ह्याशिवाय जुन्या विहिरींच्या दुरुस्तीसाठीं प्रत्येक विहिरीस ४०० रुपये याप्रमाणें दोन विहिरींची दुरुस्ती करण्यांत आली. कर्जाची फेड ५ वर्षांच्या मुदतीची आहे. १० वर्षांच्या मुदती-करितां जुन्या विहिरी दुरुस्त करण्यासाठीं प्रत्येकी १,००० रुपयाचें कर्ज दोन शेतकऱ्यांना दोन विहिरीकरितां देण्यांत आले. व्याजाचा दर ४½ रुपये आहे. नवीन तलाव व जुन्या तलावांची दुरुस्ती करण्यासाठीं ह्यावर्षी १,३१,२५० रुपये मंजूर झाले होते. परंतु योग्य अर्जदारांभावी कर्ज देण्यांत आलेलें नाहीं. जिल्ह्यांत जपानी पद्धतीनें शेती करण्यास प्रोत्साहन देण्यासाठीं व ताऊची गुरमा विकत घेण्यासाठी २६,३०,००० रुपये शासनानें मंजूर केले होते. ह्या पद्धतीनें शेती करण्यासाठीं प्रत्येक एकराभागें ४० रुपये कर्ज व गुरमाकरितां २० रुपये याप्रमाणें २६,७४० रुपयांचें कर्ज व ३,४८० रुपये किंमतीचे २७४ ताऊची गुरमा शेतकऱ्यांना तगाईवर देण्यांत आले.

कीटकापासून पिकाचें संरक्षण करण्यासाठीं ह्यावर्षी १,२४,२३५ रुपयांची कीटकनाशक औषधें किंमतींत ५० टक्के सवलत देऊन शेतकऱ्यांना विकण्यांत आलीं. ही औषधें फवारण्या-करितां प्रेस पम्प डस्टर वगैरे विनामूल्य देण्यांत येतात. साकोली तहसीलमध्यें बऱ्याच वर्षांपासून गाद नांवानें ओळखल्या जाणाऱ्या किडयांच्या प्रादुर्भाव होत आहे. मागील वर्षी ह्या किडयापासून कांहीं कांहीं भागांत धानाच्या पिकांस भयंकर नुकसान झालें. ह्या रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी यावर्षी आठ खेडयां-तील ४०० एकरांमध्यें औषधांचे प्रयोग करण्यांत आले आणि निरनिराळ्या औषधांकरितां ७,००० रुपये खर्च करण्यांत आले. तसेंच तुमसर विभागांत गऱ्हाबघेडा ह्या गांवांत आल्याची लागवड बऱ्याच प्रमाणांत होत असल्यामुळें सड नांवाच्या रोगापासून संरक्षण करण्यासाठीं ८३,४९६ रुपयांची निरनिराळी औषधें विकत घेऊन त्यांचा प्रयोग आल्याच्या पिकांवर करण्यांत आला. पीक-स्पर्धेत राज्य पातळीवर भंडारा जिल्ह्यांतील एकूण ६२ शेतकऱ्यांनीं विशेषत: धानाच्या पिकाच्या स्पर्धेत भाग घेतलेला आहे.

आतांपर्यंत शेतकीविषयक बाबतींत माहिती देऊन अधिक धान्य पिकविण्याकरितां भंडारा जिल्ह्यांत उपलब्ध असलेल्या लहान, मध्यम व मोठ्या तळ्यांच्या कामाविषयी माहिती असणें जरूरीचे आहे. भरपूर पाणी असलेलीं तळीं ह्या जिल्ह्यांत इतकी आहेत की मोठ्या योजनेपेक्षां लहान योजनाच जास्त फायदेशीर होत असल्याने रावनवाडी, शीवनीबांध, आमगांव, जलाशय, नवेगांव बांध, सालेगांव-हरी, रिसाला , नवतलाव, राजोली, काटी, लोभी, चांदोरी, दवा, परसगांव व मानेगांव ह्या योजना प्रथम पंचवार्षिक योजनेंत हातीं घेण्यांत आल्या असून त्यांचीं कामें पूर्ण होत आहेत. ह्याशिवाय बाघ व इटचाडोह ह्या मोठ्या योजना ह्यावर्षी सुरू झालेल्या आहेत.

सन १९५८-५९ साली मुंबई राज्याची धानसंवर्धक योजना ह्या जिल्ह्यांत लागू करण्यांत आली व २०,००० एकराचें लक्ष्य असलेला एक गट उघडण्यांत आला. त्याचें कार्य चांगलें झाल्यामुळें २, ३ व ४ गट ह्या जिल्ह्यासाठीं देण्यांत आले. त्यांचें कार्य खालीलप्रमाणे आहे --

वर्ष	जापानी भातशेती क्षेत्र
१९५३-५४	५३९.७४
१९५४-५५	५,४१७.००
१९५५-५६	२,५९६.९७
१९५६-५७	१८,५६४.३७
१९५७-५८	१९,७१३.०५

वर्ष	भातशेती मार्गदर्शक गट	लक्ष्य	प्राप्ती
(१)	(२)	(३)	(४)
		एकर	एकर
१९५८-५९ ...	तुमसर-साकोली गट	२०,०००	१८,३०६
१९५९-६० ...	भंडारा-तुमसर-मोहाडी गट ...	२०,०००	१९,४२२-२८
	साकोली-मोरगांव-अर्जुनी गट ...	२०,०००	१८,८४०-४५
	तिरोडा-गोंदिया-आमगांव गट ...	२०,०००	१७,००८-००
	एकूण ...	६०,०००	५५,२७०-७३
१९६०-६१ ...	भंडारा	२०,०००	३०,४६२-७९
	साकोली	१५,०००	१३,९५२
	मोरगांव-अर्जुनी	१५,०००	१२,११३
	गोंदिया	१५,०००	१७,७७५
	एकूण ...	६५,०००	७४,३०२-७९

१९६०-६१ साली वर दिलेल्या ६५,००० एकर लक्ष्याशिवाय २,००० एकर लक्ष्य ज्या विभागांत भातशेती मार्गदर्शक योजना अंमलांत आणलेली नाहीं, अशा विभागासाठीं निर्धारित केलें आहे. त्यासाठीं १,६०,००० रुपये तगाईहि मंजूर करण्यांत आली आहे. हें लक्ष्य मोहाडी, पौनी व गोंदिया या भागांत प्रत्येकी ५०० एकरप्रमाणें विभागण्यांत आलें आहे.

बिजोत्पादन क्षेत्र

धानाच्या सुधारलेल्या जातीचें शुद्ध बी राखण्यासाठीं व वाढविण्यासाठीं ह्या जिल्ह्यामध्यें ६ प्रक्षेत्र उघडण्यांत आलीं आहेत. सन १९५९-६० ह्या प्रक्षेत्रावर निरनिराळ्या धानाच्या जातीचें, गेरवा प्रतिबंधक गव्हाचें तसेंच सुधारलेल्या ज्वारी व हरभऱ्याचें पीक घेण्यांत आलें. ह्या प्रक्षेत्रामध्यें शेतकऱ्यांना सुधारलेल्या जातींचें चांगलें बी मिळवून बियाण्याची शुद्धता राखली जाईल. ह्या प्रक्षेत्रावरून ९,२८० मण धानाचें बी यंदा वांटण्यांत आलें.

"अधिक धान्य पिकवा" या मोहिमेखाली निरनिराळ्या योजनांमधून भंडारा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना भरपूर फायदा मिळाला. त्याची तपशीलवार माहिती येणेंप्रमाणें आहे :—

बीं-बियाणें

सुधारलेल्या धानाचें बियाणें म्हणून वांटप.—सन १९५९-६० साली भंडारा जिल्ह्यांत सुधारलेल्या धानाचें बी ४,७३६ मण ३१ शेर शेतकऱ्यांना वांटण्यांत आलें. ह्याशिवाय ह्या वांटपाकरितां शेतकऱ्यांना बियाच्या किंमतीवर १५$\frac{5}{8}$ टक्के सूट देण्यांत आली. हें वांटप कांहींना नगदी पैसे घेऊन तर कांहीं गरीब शेतकऱ्यांस बँकेकडून तगाई कर्ज देऊन करण्यांत आलें. ह्या सुधारलेल्या बियांच्या वापरामुळें ५ टक्के धानाच्या उत्पादनांत वाढ झाली.

गेरवा प्रतिबंधक गव्हाचें बी-वांटप.—वरील योजनेखाली ह्या जिल्ह्यांत २८१ मण १८ शेर गेरवा प्रतिबंधक गव्हाचें बी वाटण्यांत आलें. बी निरभेळ व शुद्ध राखण्यासाठीं शेतकी विभागामार्फत योग्य ती काळजी घेण्यांत आली.

हिरव्या खताकरितां बोरूचें बी-वांटप.--या योजनेखाली २,२३७ मण ३७ शेर बोरूचें बी वांटप करण्यांत आलें. हें बी २५ टक्के सूट देण्यांत येऊन व बँकेमार्फत तगावी कर्ज देऊन वाटण्यांत आलें. ह्यामुळें हिरव्या खतांचा उपयोग कसा करावा व त्याचा उत्तम पीक येण्यासाठीं कसा उपयोग होतो, याचा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळाला, तसेंच या खताचा वापर करण्याविषयी शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळालें.

ओलीताची सोय.--ओलीताची सोय असल्याशिवाय कोणताही शेतकरी आपल्या जमिनीचा योग्य वापर करूं शकत नाहीं व चांगलें पीक काढूं शकत नाहीं म्हणून ओलीताची सोय करण्याचें काम शेतकी विभागानें हातीं घेतलें आहे. या मोहिमेंत खालील योजनांचा समावेश होतो :--

नवीन विहिरी खोदणें व बांधणें.--सन १९५९ साली शेतकऱ्यांना नवीन विहिरी खोदण्यासाठीं व त्यांच्या बांधकामासाठीं कर्जरूपानें १,६५,६५० रुपये वांटण्यांत आले. एका विहिरीसाठीं कर्जाची रक्कम २,५००रुपयांपर्यंत मर्यादित केली आहे. हें कर्ज १० वर्षांत वसूल करण्यांत येईल व ह्यावर ४½ टक्के व्याज राहील. ह्याशिवाय ह्या कर्जाऊ रकमेपैकी २५ टक्के रक्कम सूट देण्यांत आली. ह्या योजनेमुळ अंदाजे ५२५ एकर नवीन जमीन ओलीताखाली आणण्यांत आली.

जुन्या विहिरींची दुरुस्ती.--जुन्या विहिरीची दुरुस्ती करण्यासाठीं २०,८०० रुपये खर्च करण्यांत आले. या दुरुस्तीसाठी जास्तीत जास्त दर विहिरीमागें १,००० रुपये कर्जरूपानें देण्यांत येतात. त्यांत सूटीबद्दल कांहींच तरतूद करण्यांत आली नाहीं.

पाट बंधाऱ्याकरितां लहान तलाव बांधणें व जुन्या तलावांची दुरुस्ती करणें.--ह्या योजनेनुसार ४३,५५८ रुपये शेतकऱ्यांना वाटण्यांत आले. या योजनेखाली जमिनीचें क्षेत्र ओलीत करण्यांत येणाऱ्या जमीनीच्या अंदाजावरून दर ओलीत केलेल्या एकरामागे १५० रुपयेप्रमाणें जास्तीत जास्त १०,००० रुपये इतके कर्ज एका तलावाला देण्यांत येते व याची परतफेड ५ वर्षांत सव्याज करावयाची असते. यावर २५ टक्के सूट देण्यांत येते.

ताऊची गुरमा (जपानी डव्रा).--गतवर्षी ह्या जिल्ह्यांत जपानी भातशेतीखाली १,७०० ताऊची गुरमा प्रत्येकी १८ रुपये भावानें शेतकरी बंधूना विकण्यांत आले.

हलयंत्र (ट्रॅक्टर).--ह्या जिल्ह्यांत ५५,००० रुपयांची एकूण ७ हलयंत्रें देण्यांत आलीं. त्याकरिता सरकारकडून तकावी कर्ज देण्यांत आलें.

ऑईल इंजिन पम्प व इलेक्ट्रिक मोटार.--ह्या योजनेखाली शेतकऱ्यांना कर्जरूपानें ५८,९७५ रुपये कर्ज रूपांत देण्यांत आले. ह्याचा फायदा पुष्कळ शेतकऱ्यांनीं घेतला.

खतें व जोर खतें.--ह्या जिल्ह्यांत खालीलप्रमाणें खतें व जोर खतें वाटण्यांत आलीं :--

		टन
(१)	सिंगल सुपर फॉस्फेट ...	२८८
(२)	ट्रीपल सुपर फॉस्फेट ...	५३७
(३)	अमोनियम सल्फेट	२,४६३

फक्त सुपर फॉस्फेट वर १२½ टक्के सूट देण्यांत आली.

पशुसंवर्धन

शेतकी कार्यक्रमामध्यें पशुसंवर्धनाचें महत्त्वाचें अंग आहे. चांगली शेती म्हटली कीं ओघानेच चांगली जनावरे ही आलीच. त्यासाठीं योजनेंत पशुसंवर्धनासाठीं सोय केलेली आहे. पशूचें संगोपन करणें हें आजच्या काळांत महत्त्वाचें होऊन बसलें आहे. ठिकठिकाणीं विशेषत: विकासगटांतून गुरांचे दवाखाने, त्यांची जोपासना, कुक्कुटपालन, उत्पत्तिविषयक प्रशिक्षण, गोसदनाची सोय, इत्यादि कार्यक्रम ह्या विभागातर्फे पार पाडले जातात.

भंडारा जिल्हयांत सर्व सोयींनी युक्त असे जनावरांचे पांच दवाखाने आणि आऊट लेइंग जनावरांचे २५ दवाखाने उघडले आहेत. १९५९-६० मध्यें उपचार केलेल्या जनावरांची संख्या याप्रमाणें आहे:—

एकंदर १९,९३१ जनावरांवर निरनिराळ्या रोगांवर उपचार करण्यांत आले. तसेंच २९,६५५ जनावरें खच्ची करण्यांत आलीं. रेंडरपेस्ट रोगप्रतिबंधक लस एकंदर ९,९१० जनावरांना देण्यांत आली. ह्या जिल्हयांत पांच की व्हिलेज सेंटर्समध्यें ११ गवळाऊ जातीचे सांड ठेवण्यांत आले आणि ५३२ गाईंवर कृत्रिम गर्भधारणेचा प्रयोग करण्यांत आला. यापासून ३१४ वासरे जन्माला आलीं.

गोशालेच्या विकासाकरितां गोंदिया येथें श्रीकृष्ण गोसदन या संस्थेला २,००० रुपयांचे अनुदान देण्यांत आलें.

भंडारा जिल्हयांत भंडारा, साकोली, मोरगांव-अर्जुनी व तिरोडा येथें प्रत्येकी एक याप्रमाणें प्रशिक्षण केंद्रें स्थापण्यांत आलीं. ह्या केंद्रांवर विकास मंडळाद्वारे देखरेख होत असते.

कुक्कुटपालन संस्था

ह्या विभागाकडून भंडारा व गोंदिया येथें एक एक केंद्र सुरू केलेलें आहे. गटामध्यें देखरेखीचें काम विस्तार अधिकारी (पशुसंवर्धन) ह्यांच्यातर्फे होत असते. प्रत्येक गटांमध्यें ह्या अधिकाऱ्याची नेमणूक केलेली आहे.

द्वितीय पंचवार्षिक योजनेंत खालील कार्यक्रम कार्यान्वित करण्यांत आले :—

(१) पशु चिकित्सालय, पशु संवर्धन संस्थांचा विस्तार.
(२) ठिकठिकाणीं आऊट लेइंग पशु चिकित्सालय सुरू करणें.
(३) ठिकठिकाणीं कुक्कुटपालन केंद्राची स्थापना.
(४) सहा ठिकाणीं कृत्रिम रेतन केंद्राची सोय.
(५) प्रत्येक विकास गटांतून ह्या चिकित्सालयासाठी इमारती बांधणें.

भंडारा जिल्हा हा तलावांचा जिल्हा आहे. ह्या जिल्हयांमध्यें तलावांतील मासेमारी १९४८ पासून मत्स्यपालन विभागातर्फे सुरूं करण्यांत आली. प्रथम प्रयोग म्हणून भंडारा शहरांतील दोन तलावांत बीज सोडण्यांत आलें. मत्स्यपालन हे "अधिक धान्य पिकवा" ह्या

मत्स्यपालन

मोहिमेचें एक अंग आहे. कारण अनेक लोक मासळीचा पूरक खाद्य म्हणून उपयोग करतात. सरकारतर्फे १९५६ पासून तलावांत मासळीचें बीज कलकत्त्यावरून आणून सोडण्यांत येते. वैनगंगा नदींत अशा प्रकारचें बीज लाखांच्या संख्येंत सोडण्यांत आलें. एक मत्स्य बीज संकलन केन्द्र सिंधपुरी (पौनी) येथें सुरू करण्यांत आलें. रोहू जातीचे मासें ह्या ठिकाणीं विपुल प्रमाणांत सांपडतात.

पंचवार्षिक योजनेनुसार सोडण्यांत आलेले मासळीचें बी

योजनेचें नांव (१)	योजनेचें उद्दिष्ट (२)	लक्ष्य १९५९-६० (३)	साधलेलें लक्ष्य (४)	
पाहणी ...	६,१०० एकर पाण्यांत.	१,२००	२,६७६ एकर	वार्षिक लक्ष्यापेक्षां अधिक.
सांठा ...	१,६२४,००० फ्राय.	४००,००० फ्राय.	८५०,७८० फ्राय	,,
नेटींग ...	५५६,७४०	१७०,००० पौंड.	२३३,८४३ पौंड	,,

नरसरींची स्थापना

नरसरी बांधणें आणि त्याची दुरुस्ती करणें			वार्षिक लक्ष्यापेक्षां अधिक
नरसरीमध्यें सांठा	...	२३१,५०० फ्राय	,,
नेटींग	... ५०,००० फ्राय..	१०९,१७५	,,

होड्यांची सोय करणें, मासें पकडण्याकरितां नायलॉनचे जाळ कोळयांना देणें, त्याशिवाय इंजिन होड्यांची सोय करणें तसेंच मासे पकडण्याकरितां १५० पौंड वजनाचे नायलॉनचें जाळें देण्याचें लक्ष्य होते, परंतु २७२ पौंडाचे जाळ लोकांना मासे पकडण्याकरितां देण्यांत आलें.

भूअंतर्गत मत्स्यपालन विभाग

ह्या विभागांत वरील कामाकरितां ८५,००० रुपयांची सोय करण्यांत आली आहे. ह्या जिल्ह्या-मध्यें सहकारी मंडळानें आपल्या कार्याचें जाळे विविध क्षेत्रांत पसरविलें आहे. मत्स्यपालन कार्याच्या बाबतींतहि हा जिल्हा मागे राहिलेला नाहीं. एवढ्यांतच कोळी लोकांच्या २५ सहकारी संस्था नोंदविण्यांत आल्या असून सहकार्यानें ते आपला धंदा करीत आहेत. कमीतकमी भांडवलांत, श्रमांत व वेळांत जास्तीत जास्त पैसा उभारण्याची ही योजना असल्याचें आतां जनतेला अनुभवानें पटलेलें आहे. या सहकारी संस्थांना सरकारतर्फे अवजारें व आर्थिक मदत देण्यांत येते. गोंदिया येथील सहकारी संस्थेस २६,००० कार्प फ्राय आणि ८,००० रुपयांचें कर्ज देण्यांत आलें. तसेंच इतर आठ सहकारी संस्थांना ४,००० रुपयांची व्यवस्थापक सबसीडी व १,६३० रुपयांचें कर्ज देण्यांत आलें. २६ वैयक्तिक लोकांना, १२ सोसायटयांना, १६ ग्रामपंचायतींना, ५ लक्ष फ्रिंग माशांचें बी वांटण्यांत आलें. त्याशिवाय मत्स्यपालन क्षेत्राकडून २ लक्ष ३१ हजार ५ शे बारके मासें निरनिराळ्या तलावांत सांठविलेले आहेत व ५ लक्ष बारके मासें वैयक्तिक संस्थांना देण्यांत आले. या खात्याकडून जाळ्याद्वारें पकडलेले मासे ६,३३४ पौंड असून इतर संस्थांनीं व लोकांनीं पकडलेले १७०,५०० पौंड होते. १९५९-६० मध्यें ह्या विभागाला माशापासून १५,०९५ रुपयांचें उत्पन्न झालें.

पाहणी


ह्यावर्षीं २,६७६ एकर पाण्यांत पाहणी केली गेली. १९५८-५९ मध्यें २,५०० एकर पाण्यांत पाहणी केली गेली. द्वितीय पंचवार्षिक योजना सुरू झाल्यापासून ४ वर्षांत १३,८८५ एकर पाण्यांत पाहणी झाली आहे. योजना कालावधीकरितां ६,१०० एकरांचें लक्ष्य ठरविण्यांत आलें होतें. ह्या शिवाय ह्या विभागांकडून खालील कार्यक्रम कार्यान्वित करण्यांत आले. भंडारा येथील राम नर्सरीची सुधारणा व दुरूस्ती, सिंधपुरी येथील नर्सरीमध्यें पाणी जाण्याकरितां नाल्याची दुरूस्ती व विभागीय नर्सरीभोवती तारेचें कुंपण लावणें ही कामें करण्यांत आलीं. भंडारा येथील खांब तलाव व तांडा येथें वेस्ट वेयर बांधण्यांत येऊन ह्या तलावाची दुरूस्ती करण्यांत आली. साकोली येथील नर्सरीकरितां अर्जुनी स्टेशनजवळ नवीन नर्सरीची स्थापना करण्यांत आली.


भंडारा जिल्हा वनमंडळ

क्षेत्र व विस्तार

भंडारा जिल्ह्यामध्यें एकूण १,३५० चौरस मैल क्षेत्र जंगल खात्याच्या ताब्यांत आहे. ह्याशिवाय अदमासे १०० चौरस मैल क्षेत्र मुलकी खात्याकडे आहे. १,३५० चौरस मैलांपैकीं ५०० चौरस मैल राखीव जंगल असून बाकीचे ८५० चौरस मैल पूर्वीचें मालगुजारी जंगल आहे. ८५० चौरस मैल मालगुजारीपैकी जवळ जवळ ५०० चौरस मैल दुचंद जंगल असून बाकीचे ३५० चौरस मैल फाजील जंगल आहे. दुचंद जंगलामध्यें लोकांचे निस्ताराचे हक्क असून ते मालगुजारी विसर्जनानंतरसुद्धा सरकारनें कायम केले आहेत. सर्व दुचंद जंगलांना आतां इंडीयन फॉरेस्ट ॲक्ट कलम नं. २९ लागू केला असून त्याप्रमाणें त्यांना प्रोटेक्टेड फॉरेस्ट म्हणून समजले जाईल. लोकांचे हक्क कायम राहतील.

भंडारा जिल्हा
नद्या, डोंगर व
जलाशय





फाजील जंगलामध्यें मालगुजारीच्या वेळी कोणतेहि हक्क नव्हते. आता ही सर्व जंगलें राखीव जंगलें करण्याचें ठरलें आहे व त्यानुसार त्यांना इंडीयन फॉरेस्ट ॲक्टचें कलम नं. ४ लागू केले आहे. हीं जंगलें पूर्णपणें राखीव करण्यापूर्वीं ह्यामध्यें कोणाचे हक्क आहेत काय याची चौकशी करून या हक्काची कशी अम्मलबजावणी करतां येईल हें ठरवून देण्यासाठीं एक स्वतंत्र अधिकारी नेमला आहे. त्यांना फॉरेस्ट सेटलमेंट अधिकारी म्हणतात. सन १९६१-६२ पर्यंत हें काम पूर्ण होण्याची आशा आहे. मध्यंतरीच्या काळांत ह्या फाजील, दुचंद जंगलाचे शास्त्रोक्त संरक्षण कसे करावे व ह्या जंगलाचा इतर राखीव जंगलाप्रमाणें कसा उपयोग करून घ्यावा ह्याचा अभ्यास करून एक योजना बनविण्यासाठीं भंडाऱ्यामध्यें एक स्वतंत्र अधिकारी नेमला आहे. त्यांचें काम १९५८ डिसेंबरपासून चालू आहे. तें सन १९६० च्या डिसेम्बर महिन्यापर्यंत पूर्ण होईल. ही योजना तयार होऊन लागू केल्यानंतर (१९६१ मध्यें) ह्यापासून साधारण अदमासे ५ ते ७ लाख रुपयांचें जास्त उत्पन्न होईल.

कामाच्या व जनतेच्या सोईसाठीं भंडारा वनमंडळाचे सन १९६० जानेवारीमध्यें दोन भाग करण्यांत आले असून त्यांचीं आतां दोन स्वतंत्र वनमंडळें तयार झालीं आहेत. (भंडारा व गोंदिया) येथें अनुक्रमें जंगल कार्यालयाचें मुख्यालय आहे.

भंडारा जिल्ह्यामध्यें दरवर्षी सरासरी २३ लाख रुपयांचें उत्पन्न सरकारला मिळतें. एकंदर खर्च दरवर्षी सरासरी ४·५० लाख रुपयांचा असतो. गतवर्षीं ह्या जंगलामधून २० हजार टन इमारती लांकूड व ३० हजार टन जळाऊ लांकूड इतका माल **उत्पन्न** बाहेरकाढण्यांत आला याशिवाय १० हजार टन बांबू व इतर किरकोळ उत्पन्न झालें.

कर्मचारी.— सर्व वर्गांचे मिळून एकूण ३२५ कर्मचारी भंडारा जिल्ह्यामध्यें निरनिराळीं कामें करतात.

पंचवार्षिक योजना.— गतवर्षीं एकूण ११ योजना पंचवार्षिक योजनेखाली होत्या. त्यावर एकूण १,८४,००० रुपये खर्च करण्यांत आला. त्यापैकी कांहीं ठळक योजना खालीलप्रमाणें:—

भंडारा जिल्ह्यामध्यें जरी १,३५० चौरस मैल जंगल क्षेत्र असलें तरी त्यामध्यें सागवनासारखी मौल्यवान झाडें फार कमी आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेखाली एकूण ३५० एकर जमीन सागवान लागवडीखाली आणावयाची होती व यापैकीं ११० एकर लागवड सन १९५९-६० मध्यें करावयाचे योजले होते. तरी सन १९५९-६० मध्यें एकूण २१७ एकर **सागाची लागवड** क्षेत्र लागवडीखाली आणण्यांत आलें. ह्याशिवाय ३२० एकरांमध्यें सन १९६०-६१ मधील लागवडीसाठीं पूर्ण तयारी करण्यांत आली. एकूण खर्च अंदाजे ४,००० रुपये करण्यांत आला.

ताब्यांत घेतलेल्या मालगुजारी जंगलाचें भू-मापन करण्यांत आलें. एकूण अदमासे ३०० चौरस मैलांच्या क्षेत्राचें भू-मापन पूर्ण करण्यांत आलें. त्यावर २६,००० रुपये खर्च करण्यांत आला.

भूतपूर्व मालगुजारी जंगलें पद्धतशीर लावण्यासाठीं एकूण ३२,००० रुपये खर्च करण्यांत आला.

जमिनीची धूप थांबवून त्यावर १५० एकरामध्यें आदर्श अशी जंगलाची वाढ करण्यांत आली. त्यावर एकूण १४,००० रुपये खर्च करण्यांत आला.

कमी वेतन मिळणाऱ्या कर्मचाऱ्यासाठीं राहण्यासाठीं घरें बांधण्यासाठीं ४९,००० रुपये खर्च करण्यांत आले व खात्याच्यामार्फत एकूण ३६ घरें बांधण्यांत आलीं.

जंगलांत राहणाऱ्या आदिवासी लोकांच्या शेतीला लागणाऱ्या पाण्यासाठीं २ तलाव बांधण्यांत आले. त्यावर एकूण १५,००० रुपये खर्च झाला.

सर्व योजनांमध्यें ठरविलेल्या कामाच्या लक्ष्यापेक्षां अधिक लक्ष्य गाठण्यांत आलें.

६ : पाटबंधारे योजना

भंडारा जिल्ह्यांत अनेक सिंचाई योजना कार्यान्वित करण्यांत आल्या. कास्तकारांकरितां पाण्याची सोय करण्यासाठीं प्रयत्न सुरू आहेत. याकरितां अनेक तलाव बांधण्यांत आलें असून त्यांची माहिती खालीलप्रमाणें आहे :—

रावणवाडी जलाशय योजना.

ह्या जलाशय योजनेचा समावेश प्रथम पंचवार्षिक योजनेंत करण्यांत आला आहे. त्याचें काम जवळ जवळ पूर्ण होत आलें आहे. भंडाऱ्यापासून १२ मैलांवर कार्धा-पवनी रोडवर दोन उंच टेकड्या मधून वाहत जाणाऱ्या खिड नाल्यास रावणवाडी असे म्हणतात. येथें बांध बांधून जलाशय निर्माण करण्यांत आले. तलावाचे जलग्रह क्षेत्र ५ वर्ग मैल असून मुख्य बांध ३१३ फूट लांबीचा आहे. तलावाची क्षमता २४३·७५ दशलक्ष घनफूट आहे. मुख्य कालव्याची लांबी १६ मैल असून २,६०० एकर जमिनींत ओलिताची सोय होईल. खर्चाचा एकंदर अंदाज ८ लक्ष ८० हजार रुपये होतो.

१९५९-६० मध्ये सी. डी. चें काम व कालव्याचें काम पूर्ण करण्यांत आलें. ह्या वर्षी १,०३,२४७ रुपये खर्च करण्यांत आले. या योजनेमुळें नऊ खेड्यांना ओलिताची सोय होणार आहे.

आमगांव तलाव योजना

हे जलाशय भंडाऱ्यापासून सात मैलांवर नागपूर-रायपूर रोडवर आहे. तलावाचें क्षेत्र १.४६ वर्ग मैल असून ७४८ एकर जमिनीला सिंचाई व्यवस्था होणार आहे. ह्या तलावाचे दोन भाग असून एकास आमगांव लोवर तलाव व दुसऱ्यास आमगांव अपर तलाव असे म्हणतात. १९५९-६० मध्ये वेस्ट वेयरचें काम जवळ जवळ पूर्ण झालेलें आहे. ह्या वर्षी १,१२,०२९ रुपये खर्च झाले. एकंदर पांच ते सहा लक्ष रुपये खर्च येईल असा अंदाज आहे.

रिसाला तलाव योजना

हा तलाव नागपूर-गोंदिया लाईनवर मुंडीकोटा रेल्वे स्टेशनपासून १२ मैलांवर आहे. तलावांचें जलक्षेत्र ७ वर्ग मैल असून मुख्य बांध २७० फूट लांब आहे. जोड बांध २८० फूट लांब आहे. त्याचें काम पूर्ण झालेलें आहे. ह्या जलाशयाला एकंदर ११ लक्ष १४ हजार रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. १९५९-६० मध्यें २,९२,०५९ रुपये खर्च झाले.

हरी तलाव

हे जलाशय नागपूर-गोंदिया लाईनवर गंगेझरी स्टेशनपासून एका मैलावर आहे. या योजनेंत जुन्या तलावाची दुरुस्ती करून त्याची क्षमता वाढविण्यांत आली. तलावाचा मुख्य बांध ७२० फूट लांबीचा असून त्याचें काम १९५८ मध्ये पूर्ण झाले. कालव्याची लांबी ३.७ मैल असून कालवे बांधण्याचें काम सुरू आहे. एकूण २,१०,४४० रुपये खर्च झाले असून आणखी १४,७७१ रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. योजना पूर्ण झाल्यानंतर ८१७ एकर जमिनीस ओलिताचा फायदा मिळणार आहे. एकंदर योजनेवर ३,८३,००० रुपये खर्च होणार आहेत.

नवेगांव बांध

हा देऊळगांव रेल्वे स्टेशनच्या गोंदिया-चांदा ह्या रेल्वे मार्गावर दीड मैलावर आहे. जलग्रहण क्षेत्र २८५ चौरस मैल असून १३,५०० एकर जमिनीस ओलिताची सोय होणार आहे. हें काम प्रथम पंचवार्षिक योजनेतील आहे. २८ लक्ष ५६ हजार रुपये खर्च झाले. १९५९-६० मध्यें वेस्ट वेअरचें काम पूर्ण केलें आहे. त्याशिवाय कालवे बांधण्याचें काम सुरू आहे. येथील काम मार्च १९६४ पर्यंत पूर्ण होईल असा अंदाज आहे हा जुना मालगुजारी तलाव पूर्वीचाच होता.

हा जुना मालगुजारी तलाव असून साकोली पासून ६ मैलांवर साकोली-लाखांदुर सडकेवर आहे जलग्रहण ७.५ वर्ग मैल आहे व ४,५७५ एकर जमिनीला ओलिताची सोय आहे. एकंदर खर्च ८,१९,००० रुपये होणार आहे. १९५९-६० मध्ये पूर्व-पश्चिम कालवे व सी. डी. कालव्याचें काम सुरू होतें. **शिवनी बांध**

हा तलाव देवरी-आमगांव सडकेवर १० मैलांवर आहे. २.८२ चौरस मैल जलग्रहण क्षेत्र आहे व १,९०० एकर जमिनीस ओलिताची सोय होईल. खर्च ६,७२,००० रुपये होईल असा अंदाज आहे. १९५९-६० मध्ये सी. डी. कालव्याचें काम सुरू होतें तसेंच मुख्य कालव्याचें सेक्शनिंगचें काम चालू आहे. **सालेगांव बांध**

वरील योजनाशिवाय खालील योजना जिल्हा विकास मंडळांनें स्वीकृत केल्या आहेत. त्यांची चौकशी पाहणी, आदि प्राथमिक स्वरूपाचीं कामें हातीं घेण्यांत आली.

(१) भंडारा तहसिलींतील सोर्ना तलाव, (२) संग्रामपूर तलाव, (३) नवेगांव, (४) भीमलकस, आणि इतर ३२ जुने लहान लहान मालगुजारी तलाव. २५० एकराच्या वर ओलिताची सोय करणाऱ्या तलावांच्या दुरुस्तीकरितां पाहणीचें काम हातीं घेण्यांत आले.

खालील सिंचाई तलावांचें (मेंटेनंसचें काम) हृया विभागाकडे असून १९५९-६० मध्ये निरनिराळ्या तलावामधून पाणी देण्यांत आलें. यासंबंधी माहिती खालीलप्रमाणें आहे :—

तलावाचें नांव	१९५९-६० मध्यें ओलिताची सोय खरीप	रबी	एकंदर
चोरखमारा तलाव	१२,४८१	३२	२१,५१३
बोदलकसा तलाव	१२,०८५	५६	१२,१४१
खरबंध तलाव	१०,७२६	...	१०,७२६
पांगरी तलाव	२,१८०	४	२,१८४
गुंडोह तलाव	१,२००	...	१,२००
साडेपार तलाव	५२	४	५६
कुंभली तलाव	३५५	४	३५९
रावनवाडी तलाव	१५४	१००	२५४
आमगांव तलाव	२७	६५	९२
हरी तलाव	४८९	...	४८९
सालेगांव तलाव	८७५	५०	९२५
शिवनी बांध	२,०६०	८	२,०६८
नवेगांव बांध	३,१२६	८३	३,२०९
राजोली तलाव	७	३	१०

मोठ्या आकाराच्या पाटबंधारे योजना

इटियाडोह योजना:—भंडारा जिल्ह्यांत ज्या पाटबंधारे योजना हातीं घेण्यांत आल्या (द्वितीय पंचवार्षिक योजनेत) त्यापैकी इटियाडोह व बाघ नदी योजना या मुख्य योजना आहेत. इटियाडोह योजना साकोली तालुक्यांतील प्रतापगढ जवळ जेथे गाढवी नदी आपला मार्ग बदलते, त्या ठिकाणीं एक मातीचा बांध बांधण्यासंबंधीची योजना आहे. या योजनेखाली १४१ खेड्यांना ओलिताची सोय उपलब्ध करून देण्यांत येणार आहे. तांदूळ व ऊंस हृया पिकांकरितां येथील जमीन उपयुक्त असल्यामुळें जास्त प्रमाणांत या पिकांची लागवड करण्यांत येणार आहे. या योजनेवर एकंदर ७५३ लक्ष रुपये खर्च होणार आहे. या योजनेचें प्राथमिक स्वरूपाचें काम सुरू झालेलें असून आतापर्यंत १३ लक्ष ६३ हजार रुपये बोरिंग, कालव्याची पाहणी, अप्रोच रोड, मोरगांव-अर्जूनी, गोठानगांव येथील पक्का इमारती, आणि यंत्रसामग्रींवर खर्च झालेले आहेत.

हीं योजना साकोली तहसीलीच्या अगदी काठावर असलेल्या नागपूर-रायपूर या मुख्य राजमार्गावर ८८ मैलावर सिरपूर येथून वाहणाऱ्या बाघ नदीवर मातीचें धरण बांधून पाणी अडवण्याची योजना आहे.

बाघ नदी योजना

या धरणाचें पिकप वेअर साकोली तालुक्याच्या लोहारा गावांजवळ राहणार आहे. ह्या धरणाची व पिकप वेअरची क्याचमेंट एरिया १६७ वर्ग मल व २२७ वर्ग मैल अनुक्रमे आहे. या योजनेचे कमांड क्षेत्र दूर असल्यामुळे लोहारा येथे १० मैलाखालील एक पिकप वेअर बांधण्यांत येणार आहे. या पिकप वेअर पासून काढण्यांत येणाऱ्या कालव्यापासून जवळजवळ ६०,००० एकर जमीन (बाघ नदीच्या डावीकडे) ओलीताखाली येणार आहे आणि या जमीनींतून मिश्र पिकें बारामाही स्वरूपांत काढण्यांत येतील. मध्य-प्रदेश सरकारने या योजनेसाठीं ३२०.४ लक्ष रुपये खर्च करण्याचे ठरविले होते, परंतु पुन्हा पाहणी केल्यानंतर आतां ह्या योजनेमुळें अन्नोत्पादन वाढविण्यासाठीं ६०९.७७ लक्ष रुपये खर्च होणार आहेत. त्या योजनेचें प्राथमिक स्वरूपाचें कार्य सुरू आहे. आतांपर्यंत बोरिंग कालव्यांची पाहणी, आमगांव, गोंदिया, साकोली येथील इमारतीवर व रस्त्यांवर जवळजवळ ११ लक्ष रुपये खर्च झाले आहेत. ही योजना कार्यान्वित करण्यासाठी वेगळचा स्वतंत्र कार्यपालन यंत्री ह्यांच्याकडे हे काम सोपविण्यांत आले.

७ : दळणवळण व इमारती

देशाच्या उन्नतिकरितां वाहतुकींच्या साधनाची अत्यन्त आवश्यकता आहे. जर एखाद्या देशांत मोटार, आगगाड्या वगैरे दळणवळणाचीं व वाहतुकीचीं साधनें उपलब्ध नसतील तर ते त्या प्रदेशाच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीस मारक ठरेल.

भंडारा जिल्हा रस्त्याच्या बाबतींत थोडासा मागेच आहे. परंतु जिल्हयांतील सर्व मुख्य ठिकाणें रस्त्यांनीं एकमेकाला जोडलेलीं आहेत. तसेच नागपूर-रायपूर ह्या राजमार्गाचा भंडारा जिल्हयाला फायदा मिळाला आहे. हा रस्ता भंडारा जिल्हयाच्या तिन्ही तहसिलींच्या मुख्य ठाण्यांतून जातो. तसेंच तुमसर व पौनी ही दोन्ही मुख्य शहरें जिल्हयाच्या मुख्य ठिकाणास रस्त्यांनीं जोडलेली आहे. जिल्हयांतील अंतर्गत भागांत मात्र रस्त्यांची कमतरता भासतें व त्यामुळें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत पुष्कळसे रस्ते बांधणें चालू केले आहे. काटी-डोंगरली रस्ता, तेवडा-जबारटोला रोड, हिवरा-रतनाळा रस्ता, लाखांदुर-सिंधपुरी रस्ता, कोका-करडी, साकोली-लाखांदुर रस्ता, देवरी-सातेगांव रस्ता, आंबाडी-मानेगांव-आंभोरा रस्ता, गोंदिया-तिरोडा-तुमसर रस्ता, सानगडी-नवेगांव-मोरगांव-अर्जुनी रस्ता, साकोली-एकोडी रस्ता, तुमसर-रामटेक रस्ता व करडी-तिरोडा रस्ता हे त्यापैकीं आहेत. ह्या रस्त्यांवर ३१ मार्च १९६० पर्यंत एकंदर १८,०३,४५७ रुपये खर्च करण्यांत आले. भंडारा जिल्हयांत सध्या ३९९.८ मैल लांबीचे रस्ते आहेत. त्यापैकी ६०.५ मैल लांबीचा राजमार्ग, ११८.५ मैल लांब मुख्य प्रादेशिक राजमार्ग, ८९.५३ मैल लांबीचें मुख्य जिल्हा रस्ते, ५२.४२ मैल लांब इतर जिल्हा रस्ते, ६२.४५ मैल लांब खेडे भागांतील रस्ते, पब्लिक वर्क्स डेव्हलपमेंटच्या देखरेखीखाली आहेत. ६.६२ मैल लांब इतर जिल्हा रस्ते व ९.८१ मैल लांब खेडे विभागांतील रस्ते जनपद सभेच्या देखरेखीखाली आहेत.

साकोली-लाखांदुर रस्ता

साकोली हें तहसिलीचें ठिकाण असून लाखांदुर हें एक मोठे खेडेगांव चांदा व भंडारा जिल्हयाच्या सीमेवर आहे. हा भाग धानाच्या उत्पादनाकरितां फार प्रसिद्ध आहे. परंतु दळणवळणाच्या गैरसोयीमुळें हा भाग जरा मागे पडला होता. म्हणून सरकारनें जनतेच्या सोयीकरितां साकोली-लाखांदुर हा २९ मैलांचा रस्ता ८ लक्ष रुपये खर्च करून बांधण्याचें ठरविलें. ह्या रस्त्याचें काम झपाट्यानें सुरू असून २३ मैलापर्यंत काम झालें आहे. आतापर्यंत ४,०९,३१६ रुपये खर्च करण्यांत आलें. हें काम १९६२ पर्यंत पूर्ण होईल असा अंदाज आहे. काम पूर्ण झाल्यानंतर लोकांची बरीच गैरसोय दूर होईल.

सानगडी-नवेगांव-मोरगांव-अर्जुनी रोड

हा विभाग धानाकरितां प्रसिद्ध असून दळणवळणाच्या अभावी लोकांची बरीच गैरसोय होत होती. ह्या भागाला ईटियाडोह धरणाचें पाणी मिळणार आहे. सानगडी-नवेगांव-मोरगांव-अर्जुनी हा २२ मैलांचा रस्ता ६ लक्ष रुपये खर्च करून बांधण्याचें कार्य सुरू आहे. आतांपर्यंत १० मैलांपर्यंत काम येऊन ठेपलेले आहे.

गोंदिया-आमगांव-सातगांव-देवरी-चिचगड-कुरखेडा रस्ता

हा मार्ग कुरखेड्यांपर्यंत जोडण्यांत येणार असून हा रस्ता जंगली विभागांतून जात आहे. त्यामुळें हा रस्ता तयार झाल्यानंतर जंगलांतील इमारती लांकूड व इतर उत्पन्न सहज रीतीनें मोठ्या बाजार पेठापर्यंत पोहोंचविण्याची सोय होणार आहे. गोंदिया ते आमगांव १३ मैलांचा रस्ता २.५० लक्ष रु. खर्च करून बांधण्यांत येत आहे. सादगांव ते देवरी १५ मैलांचा रस्ता ३ लक्ष रुपये खर्च करून बांधण्यांत येत आहे. देवरी ते चिचगड १४ मैलांचा रस्ता २,७५,००० रुपये खर्च करून बांधण्यांत येत आहे. हीं कामें जोमानें सुरू आहेत. फक्त ह्या सडकेवर पूल बांधण्याचें कार्य तृतीय पंचवार्षिक योजनेंत घेण्यांत येणार आहे. वरील कामें जवळ जवळ पूर्ण होत आलीं आहेत.

हा सर्व भाग धानाच्या उत्पन्नाकरितां प्रसिद्ध आहे. येथील उत्पन्नाची आवक जावक फक्त रेल्वेनेच होतें. शासनानें ही अडचण लक्षात घेऊन ह्या उत्पादनाला चांगली बाजारपेठ मिळवून देण्यासाठीं हा रस्ता मंजूर केला आहे. हा रस्ता ५५ मैल लांबीचा असून त्यावर २५ लक्ष रुपये खर्च करण्यांत येणार आहे. वैनगंगा नदीवर ह्या रकमेंतून मोठा पूल बांधण्यांत येणार आहे. ह्या रस्त्याचें काम रामटेकपासून तुमसरपर्यंत पूर्ण झालेलें आहे. तुमसर शहरासारखे उद्योगधंद्यांत पुढें असलेलें शहर ह्या रस्त्यामुळें इतर गांवांच्या जवळ येईल.

रामटेक-तुमसर-तिरोडा-गोंदिया मार्ग

चुलवन नदीमुळें पावसाळचांत जवळ जवळ एकंदर सहा महिनेपर्यंत दळणवळण बंद होऊन जाते व लोकांची फार गैरसोय होते. ह्या कारणास्तव १२ लक्ष रुपये मंजूर करून सरकारनें ह्या नदीवर पूल बांधण्याचें काम हातीं घेतले आहे. हा पूल दोन वर्षांत बांधून पूर्ण होईल असा अंदाज आहे. काम झपाटयानें प्रगतीवर आहे.

चुलबन नदीवर पूल

लोककर्म विभागातर्फे झालेलें काम

१९५८ मध्ये पुढील इमारती बांधण्यांत आल्या. भंडाऱ्यांत जकातदार कन्या शाळा ही इमारत एक आधुनिक सोयीनें परिपूर्ण अशी इमारत होय. त्यांत ३१ वर्गाच्या खोल्या, दोन सायन्स लॅबोरेटोरी व इतर कांहीं खोल्या आहेत. ह्या इमारतीवर ४ लक्ष रुपये खर्च करण्यांत आले आहेत.

तिरोडा येथील आय. इ. एम. शाळेची बरीच मोठी इमारत बांधली असून त्याचें काम १९५७ मध्ये सुरू झालें होतें व ती दीड वर्षाच्या अवधींत पूर्ण करण्यांत आली. ह्या इमारतीवर १ लक्ष १२ हजार रुपये खर्च झालेला आहे.

भंडारा येथील सरकारी शाळेला लागून एक अनेक्स बिल्डींग बांधून तयार झालेली आहे. (१९५७-५८) ह्यावर १ लाख १२ हजार रुपये खर्च झाला. पोलीसासाठीं ८० घरें २,१०,००० रु. खर्चानें बांधण्यांत आलीं आहेत. तसेंच सब-इन्सपेक्टरच्या निवासस्थानासाठीं दोन क्वॉर्टर्स २८,००० रुपये खर्च करून पूर्ण करण्यांत आले. पवनी येथील पोलीस स्टेशनची इमारत २५,००० रुपये खर्च करून बांधण्यांत आली. शासनाच्या निरनिराळचा कर्मचाऱ्यासाठीं व अधिकाऱ्यांसाठी ९४,००० रुपये खर्च करून निवासस्थान बांधण्यांत आले. कलेक्टर कचेरीच्या सध्याच्या इमारतीला जोडून १,१६,००० रु. खर्च करून कांहीं इमारती बांधण्यांत आल्या.

भंडारा जिल्ह्यांत प्रत्येकी तुमसर, भंडारा, गोंदिया, साकोली, येथे चार धान्य कोठारे ४,१२,००० रुपये खर्च करून बांधण्यांत येत आहेत. भंडारा येथील मुख्य चिकित्सालयाचें कांहीं बांधकाम झालें असून १,५०,००० रुपयांचें एक्स-रे थिएटर व इतर निवासस्थानें बांधून झालीं. भंडारा येथें क्षयरोगाकरितां एक इमारत बांधण्याचें ठरविलें असून त्यावर २ लक्ष रुपये खर्च येणार आहे. इस्पितळाचें बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ५० रोग्यांची सोय होणार आहे.

१९५९-६० मध्ये झालेल्या कामाचा आढावा

गोंदिया येथील स्त्रियांच्या दवाखान्याची वाढ करण्यास मंजुरी मिळाली असून ७५,००० रुपयांच्या इमारतीचें बांधकाम सुरू आहे. ह्यामध्ये एक्सरेच्या खोलीशिवाय खाटांची सोय व ऑपरेशनची खोली बांधण्याचें कार्य सुरूं आहे.

गोंदिया व भंडारा येथे औद्योगिक वसाहत स्थापण्याचें उद्दिष्ट आहे. मंजुरी आल्यानंतर काम सुरूं होईल. भंडारा येथें बेसीक प्रशिक्षण कॉलेज काढण्याचें ठरविलें आहे. जागा वगैरे पाहण्यांत येऊन येथे इमारत बांधण्याचें काम सुरूं करण्यांत येईल.

ह्याशिवाय भंडारा येथें दुष्काळी निवारक काम भंडारा-खात रोडवर झालें. कांहीं सरकारी जुन्या इमारतीची ह्या विभागातर्फे दुरुस्ती करण्यांत आली. सरकारनें ह्या जिल्ह्याकरितां रोड योजना मंजूर केली असून त्याअन्वये १,६०२ मैलांचे रस्ते बांधावयाचें होतें. त्यापैकीं ४०० मैलांचें रस्ते अजून व्हावयाचे आहेत. हे रस्ते तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्याचें ठरविलें आहे.

८ : शिक्षण

कोणत्याहि समाजाची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक उन्नति ही त्या समाजाला मिळणाऱ्या शैक्षणिक सवलतीवर मोठ्या प्रमाणांत अवलंबून असतें आणि भंडाऱ्यासारख्या जिल्ह्यांत जेथें साक्षरतेचें प्रमाण फक्त १४.५ टक्के आहे, तेथें तर अशा सवलतीची फारच आवश्यकता भासते. ह्या जिल्ह्यांतील सरकारी संस्थांनीं व लोकल बोर्डानीं सुद्धा शैक्षणिक सवलती लोकांना मिळतील अशा प्रकारची व्यवस्था करण्याची काळजी घेतली आहे, त्याचप्रमाणें विकास खात्यातर्फे शाळा बांधणें, वाचनालयें सुरू करणें, साक्षरता वर्ग सुरू करणें अशा प्रकारचीं कार्यें सुरु करण्यांत येऊन लोकांत शिक्षणाची आवड निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला.

शिक्षण क्षेत्रांत झालेल्या कामाचा आढावा

१९४७ पासून या विभागानें शिक्षण क्षेत्रांत बरीच प्रगति केलेली आहे. १९५७-५८ वर्षी उपलब्ध असलेल्या शिक्षणसंस्था खालीलप्रमाणें आहेत—

१६१ प्राथमिक शाळांची संख्या ६३१ पर्यंत वाढली आहे. मिडल स्कूलच्या बाबतींत ती १३ पासून ४८ पर्यंत वाढलेली आहे. तसेंच हायस्कूलची संख्या ४ पासून २७ पर्यंत वाढलेली आहे. एक सरकारी मूलोद्योगी महाविद्यालय, एक खासगी प्रशिक्षण महाविद्यालय, दोन खासगी आर्टस् कॉलेजेस ह्या जिल्ह्यांत सुरू करण्यांत आलीं. तीन उच्च मूलोद्योगी शाळा आहेत. ३८ शाळांचें प्रायमरीमधून मूलोद्योग शाळांत रूपांतर झालेलें आहे. त्याशिवाय मूलोद्योग शिक्षण विषयक परिसंवाद आणि समाज शिक्षण शिबिर, शारीरिक शिक्षण यावर जिल्ह्यामध्यें विशेष भर दिला. एन. सी. सी. आणि ए. सी. सी. शिक्षणाच्या बाबतींतहि हा जिल्हा मागें राहलेला नाहीं. त्यांत २३१ विद्यार्थ्यांचा व ९ प्रशिक्षण शिक्षकांचा आणि १,३५० विद्यार्थी व २७ शिक्षकांचा समावेश करण्यांत आला. हायस्कूल कॅम्पमध्यें एकंदर ९,६८३ विद्यार्थी शिकत असून आय्. ई. एम्. स्कूलमध्यें १,७४६ आहेत. मराठी माध्यमिक शाळांत २०,२०० विद्यार्थी असून मूलोद्योग शाळांत ४,९४६ विद्यार्थी आहेत. प्राथमिक मुलामुलींच्या शाळेंत एकंदर ७५,७८६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सक्तीचें शिक्षण देण्याच्या ७२ शाळा असून त्यांत ८,९८१ विद्यार्थी शिकत आहेत. बालक मंदिरांत ७५० मुलें आहेत.

शारीरिक शिक्षण क्षेत्रांत हा जिल्हा प्रगतीपथावर असून ह्या जिल्ह्यांतच प्राथमिक शिक्षकांनीं क्रीडा खेळोत्तेजक मंडळ सुरू केलें आहे. ही संस्था १९३८ पासून कार्य करीत आहे. ह्या संस्थेमार्फत जिल्ह्यांतील सर्व प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा क्रीडा सप्ताहामध्यें केंद्रा केंद्रांतून भाग घेतात. ह्या वर्षी एकूण ४५,००० विद्यार्थ्यांनीं क्रीडा सप्ताहांत भाग घेतला होता. त्याचप्रमाणें ४४० शिक्षकांनीं निरनिराळ्या सामन्यांत भाग घेतला. ह्या क्रीडा सप्ताहांत सांस्कृतिक कार्यक्रमाचाहि समावेश आहे.

माध्यमिक शाळेकरितां जिल्हा माध्यमिक शाळा क्रीडा मंडळ असून त्यामार्फत हायस्कूलमधील विद्यार्थी व विद्यार्थीनीं ह्यांत दर वर्षी भाग घेतात. ह्या क्रीडासमारंभांत प्रदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. त्याचप्रमाणें मुंबई राज्य क्रीडा महोत्सवांत एकंदर ३,५०० खेडयांतील विद्यार्थी विद्यार्थीनीनीं भाग घेतला होता. बालवीर मंडळ ह्या जिल्ह्यांत सुरू केलेलें आहे. त्यांत एकंदर १,२०० मुलें आहेत. गर्ल गाईडचीं चार पथकें असून त्यांत ४० विद्यार्थीनी आहेत.

सरकारच्या वाचनालय योजनेखाली ह्या जिल्ह्यांत एकूण १६० वाचनालय केंद्रें सुरू केलीं असून जिल्ह्याच्या ठिकाणीं एक मुख्य वाचनालय केंद्र आहे.

१९५८-५९ वर्षी प्रायमरी आणि माध्यमिक शाळांच्या संख्येंत बरीच वाढ झाली.

वर्ष	मुलांच्या शाळा	विद्यार्थी	मुलींच्या शाळा	विद्यार्थीनी
१९५७-५८	६८२	६५,६०७	१०	१,७६,०००
१९५८-५९	७५०	६८,५९१	१०	२१,१७५

१९५७-५८ मध्ये ६८२ प्राथमिक शाळा होत्या. हें प्रमाण १९५८-५९ मध्यें शेकडा ९.९ टक्क्यांनीं वाढलेलें होतें. या शाळांत ८३,४०७ विद्यार्थी हजरी पटावर होते. पुढच्या वर्षीं हीच संख्या ८९,७६६ वर गेलेली होती. एकंदर शाळा शिक्षक २,७०३ होते. भंडारा जिल्हयामध्यें १९५८-५९ मध्यें ४४ केंद्रांतून सक्तीच्या शिक्षणाची सोय होती.

गतवर्षी माध्यमिक शाळांची संख्या २६ होती. हयांची संख्या १९५८-५९ मध्यें ५.७६ टक्क्यांनी वाढली होती. एकंदर ११,१५८ विद्यार्थी शिक्षण घेत होते, त्यापैकी १०,३२३ मुलें व ८३५ मुली होत्या. त्यांची संख्या १९५८-५९ मध्यें शेकडा २७.२ नी वाढली असून त्यांत मुलांची संख्या १३,०२४ व विद्यार्थीनींची संख्या १,१७२ इतकी होती. मूलोद्योगी शाळावर मागील दोन वर्षांत येणेंप्रमाणें खर्च झाला—

अडयाळ, तिरोडा, लाखनी येथें असलेल्या मूलोद्योगी शाळेंत १९५७-५८ मध्यें ४२,७७६.८७ रुपये खर्च व १९५८-५९ मध्यें ४५,२२२.४७ इतके रुपये खर्च झाले. सर्वसाधारण बक्षीस, हरिजन व आदिवासी विद्यार्थ्यांना आणि फारच मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यांना सुद्धा स्टायपेंड देण्यांत आले. हया विद्यार्थ्यांना १९५७-५८ मध्य ११,१३९ रुपये व १९५८-५९ मध्यें १३,७६९ इतके रुपये शिष्यवृत्त्या म्हणून देण्यांत आले.


भंडारा जिल्हयांत १९५९-६० सालांत एकंदर ७९६ प्रायमरी शाळा व ५४ मिडल स्कूल व हायस्कूल होती. प्रायमरी शाळेंतून एकंदर ९७,५१९ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यांत २९,४१३ मुलीं होत्या. मिडल स्कूल व हायस्कूलमधून एकंदर १७,६२५ विद्यार्थी शिकत असून त्यापैकीं २,५३९ मुलीं आहेत. हया सर्व शाळांतून एकंदर ७७४ शिक्षक विद्यार्जन करीत आहेत. तसेंच हया जिल्हयांत ४ स्पेशल स्कूल्स असून त्यांत ३३३ विद्यार्थी व २४ शिक्षक शिकविण्याचें कार्य करीत आहेत.

१९५९-६० सालीं हया जिल्हयांतील ७५१ खेडयांत शाळा होत्या, ७४६ खेडयांत शाळा नव्हत्या. ७४६ खेडयांपकीं ४१५ खेडयांची लोकसंख्या ५०० पेक्षां कमी आहे. १,००० पेक्षां जास्त लोकसंख्या असलेल्या फक्त ७ खेडयांत शाळा उघडण्यांत आल्या नाहींत.

भंडारा जिल्हयांत गोंदिया येथें एक महाविद्यालय असून तें १९५८-५९ मध्यें उघडण्यांत आलें आहे. भंडारा येथें एक महाविद्यालय उघडण्यांत आले आहे. तसेंच मुलींकरितां एक प्रशिक्षण महाविद्यालय उघडलें आहे. गोंदिया येथील महाविद्यालयाची स्वतःची इमारत बांधून तयार झाली आहे. येथे सायन्स कॉलेज काढण्याचेंहि प्रयत्न सुरू आहेत.

भंडारा जिल्हा

रेल्वे मार्ग व रस्ते



Inset in Form 3-A

९ : उद्योगधंदे

भंडारा तहसिलींत खालील धंदे व कारखाने आहेत. धानकुटाईच्या गिरण्या तुमसर, भंडारा, अड्याळ, वरठी, सिहोरा व विड्यांचे कारखाने भंडारा, तुमसर, मोहाडी, पवनी, वरठी, सिहोरा येथें आहेत. लुगडीं व धोतरजोड्या पवनी, भंडारा, मोहाडी, अड्याळ, आंधळगांव येथें कोष्टी लोक हातमागावर विणतात. पवनीची जरीकाठी धोतरें अजूनहि प्रसिद्ध आहेत.

गोंदिया तहसिलींत शेतीशिवाय इतर उद्योगधंदे सुद्धा आहेत. गोंदिया येथें कांच व लाख शुद्ध करण्याचा कारखाना आहे. येथील जंगलांत विपुल प्रमाणांत लाख उत्पन्न होत असल्यामुळें हा धंदा फार महत्त्वाचा झाला आहे. धानकुटाईच्या गिरण्या गोंदिया, तिरोडा, गोरेगांव, आमगांव, मुंडीकोटा, इत्यादि ठिकाणीं आहेत. विड्यांचे कारखाने गोंदिया, आमगांव, गंगाझरी, तिरोडा, इत्यादि ठिकाणीं चालू आहेत. त्याशिवाय मजूर लोक आपापल्या घरीं तंबाखू कारखानदाराकडून आणून घरींच विड्या तयार करतात. अशा मजुरांची संख्या जिल्ह्यांत पुष्कळच आहे. बुरडाचें काम डाकरामसुकळी, करडी, इत्यादि ठिकाणीं होतें.

साकोली तहसिलींत मुख्य धंदा शेतीचा. त्याशिवाय ह्या तहसिलींत विडीपत्ता येथील जंगलांत फार असल्यामुळें लाखनी, पोहरा, धानला, चिचगड, इत्यादि ठिकाणीं विड्यांचे कारखाने पुष्कळ आहेत. ह्या विभागांत उंसाचें उत्पादन जास्त प्रमाणांत होत असल्यामुळें साकोली, सासरा, कुंभली, इत्यादि ठिकाणीं गुळाकरितां रस गाळण्याचे चरक आहेत. ह्याशिवाय एकोडी, बाम्पेवाडा येथें कोशाचें कापड व सानगडी, पालांदूर येथें लुगडीं विणण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. लाखनी, सौंदड, कोहमारा येथें बुरडी-सामान तयार होत असते.

पितळी भांडीं

ह्या जिल्ह्यांत फार पुरातन काळापासून हा धंदा होता. म्हणूनच ह्या जिल्ह्याला भाणारा शद्वापासून अपभ्रंश झालेल्या भंडारा या नांवानें संबोधण्यांत येते. भाणा याचा अर्थ भांडे म्हणजेच येथें भांडे बऱ्याच प्रमाणांत होत असावेत. सुरवातीला कासार लोक हा धंदा करीत असत. इ. स. १९०० पर्यंत हा धंदा कासार लोकांनींच ह्या जिल्ह्यांत केला. त्यानंतर इतर लोकांनी म्हणजे राजस्थानी, तेली वगैरे लोकांनीं हा धंदा पत्करला व भरभराटीस आणला. आज भंडारा येथें पितळी भांड्यांची एक महत्त्वाची बाजारपेठ झाली आहे. पूर्वीं कच्चा माल परदेशांतून येत होता व त्यापासून भांडीं तयार होत असत. तसेंच पुणें, मुंबई, नाशिक वगैरे ठिकाणीं मशीननें तयार केलेलीं भांडीं आयात होत होतीं. आज परिस्थिति बदलली आहे. आतां येथें तयार झालेला माल मध्यप्रदेश, खानदेश, वऱ्हाड, टाटानगरपर्यंत पुरविला जातो. विदर्भांतील जिल्ह्यांत फक्त भंडाऱ्यास जास्त प्रमाणांत भांडीं तयार होतात. नागपूर येथें थोडेबहुत कारखाने आहेत. बाकी सर्व कारखाने भंडारा येथेंच आहेत.

भंडारा येथील सर्वांत प्रमुख कारखाना श्रीकृष्ण मेटल वर्क्स १९४८ मध्ये सुरू झाला. त्यानंतर लक्ष्मी मेटल वर्क्स, पारस मेटल वर्क्स, निर्वाण मेटल वर्क्स, इत्यादि कारखाने सुरू झाले आहेत व जिल्ह्यांत भांडीं उत्पादनांत मदत करीत आहे. त्याशिवाय अनेक लहान लहान कारखाने देखील चालू आहेत. पूर्वीं ह्या कारखान्यांत ३०० मजूर काम करीत होते. परंतु जसजसा कारखान्यांचा व्याप वाढला तसतशी मजुरांची संख्या व उत्पादन यांत अतिशय वाढ झाली. सध्या मजुरांची संख्या १०,००० च्या वर गेली आहे व उत्पन्न तिप्पट झालेलें आहे. दर दिवशीं १,००० गुंड व इतर भांडीं ह्या कारखान्यांतून तयार होतात. ५० च्या वर पितळी भांड्यांचीं दुकानें आहेत. कारखान्यास आवश्यक असणारा कच्चा माल जर मुबलक प्रमाणांत उपलब्ध झाला तर हा धंदा खात्रीनें वाढेल.

या कारखानदारांनीं आपली एक संघटना निर्माण केली असून तिच्यातर्फे कच्च्या मालाची खरेदी होते.

भंडारा जिल्हयामध्यें विजेचा पुरवठा नागपूरजवळ असलेल्या खापरखेडयांतून ६६,००० वाल्टस् ट्रांस्मीशन लाईनवरून तुमसरला होतो. तुमसर येथें राज्य विद्युत् मंडळाचें कार्यालय असून सबंध जिल्हयांत येथूनच वीजेचा पुरवठा होत असतो. तुमसरच्या हया उपकेंद्रांतून सर्वत्र वीज पुरविण्यांत येते. हया तुमसर विद्युत् उपकेंद्राची शक्ति ३,००० के. व्ही. ए. इतकी आहे, हयाशिवाय ६६ के. व्ही. चे उपकेंद्र तुमसरपासून जवळ असलेल्या खंबाटा फेरो मँगनीजच्या जागेवर बसविलें आहे. हया सब-स्टेशनची शक्ति १०,००० के. व्ही. ए. आहे. आणखी जास्त शक्तीचे प्लँट बसविण्याचा विचार आहे. फेरो मँगनीजच्या उद्योगधंद्यांत सर्व काम वीजेवर होत असून मँगनीज व इतर खनिज पदार्थ वितळण्याकरितां जास्त प्रमाणांत वीज लागत असते. कच्चा माल येथें वितळवून लोखंडासारखा धातु निर्माण करतात. हयाकरितां ६६ के. व्ही. डबल सरकीट लाईन खापरखेड्यांतून खंबाटा प्लॅन्टच्या ठिकाणीं आणून लावली आहे. भंडारा येथें आणखी एक उपकेंद्र स्थापन करण्याचें कार्य सुरू आहे आणि हया सबस्टेशनमधील वीज कवडसीं येथे सुरू होणाऱ्या आर्डनन्स फॅक्टरीच्या कामासाठी उपयोगांत आणणार आहे. ही आर्डनन्स फॅक्टरी मध्यवर्ती सरकारच्या रक्षा विभागाकडून सुरू करण्यांत येत आहे. प्राथमिक कार्य सुरू झालेलें आहे. तसेच हया कवडसी फॅक्टरीला रेल्वे लाईननीं जोडण्याकरितां भंडारा रोडवरून एक लाईन भंडारा शहरांतून कवडसीला नेण्यांत येणार आहे. हीं दोन्हीं कामें तृतीय पंचवार्षिक योजनेंत पूर्ण होईल असा अंदाज आहे.

विजेचा पुरवठा व त्यावर चालणारे उद्योगधंदे.

भंडारा जिल्हयांतील जवळ जवळ ३० ग्रामीण व शहरीं विभागांत वीजेचा पुरवठा केला जातो आणि हया विजेच्या पुरवठयामुळें खालील उद्योगधंद्यांचा विकास होणार आहे. तुमसरच्या आसपास असलेल्या मँगनिजच्या खाणी--हया खाणी डोंगरी बुझरुक, यदरबुची, चिखली, सितासावंगी, कुरमुडा, तिरोडी, इत्यादि ठिकाणीं आहेत. हया जिल्हयांतील माल बऱ्याच मोठया प्रमाणांत परदेशांत जात आहे.

खाणींचा विकास घडवून आणण्यासाठीं विजेचा उपयोग करण्यांत येतो. धातु शुद्ध करण्यासाठी वेगळे प्लॅन्टस् बसविले आहेत. तुमसर येथील कागदाच्या कारखान्यांत कार्बन इलेक्ट्रो उत्पादन केंद्र, राईस मिल, हाडांचा चुरा करण्यासाठीं गोंदिया येथें कारखाना, लाख उत्पादन केंद्रें, आणि लांकूड कापण्याचे कारखाने, भंडारा, गोंदिया, तुमसर, इत्यादि ठिकाणीं. आणि आटाचक्की चालविण्याकरितां व लहान लहान उद्योगाकरितां लागणारे लोखंडी छर्रे उत्पादन करण्यासाठीं उद्योगधंदे आणि इतर उद्योगधंदे हया जिल्हयांत चालू असल्यामुळें, हे सर्व उद्योगधंदे विजेच्या पुरवठयाशिवाय कांहींच प्रगति करूं शकले नसते. परंतु येथें विजपुरवठा हया बोर्डाकडून होत असल्यामुळें हयाची भरभराट होत असल्याचें दिसून येते.

हया जिल्हयांत तुमसरच्याजवळ कुरमुडा, बदरबुची, पोवारडोंगरी, सीतासावंगी, येथें मँगनीजच्या अनेक खाणी आहेत. येथील मँगनीज उत्तम प्रकारचे असून त्यास जगभर मागणी आहे. याशिवाय पांढऱ्या मातीच्या खाणी भंडारा तहसिलींत आग्री येथें आहेत. पांढऱ्या दगडाच्या खाणी कवडसी येथें आहेत. कांचेचा कारखाना आणि लिथो प्रेस गोंदियास आहे. कोशाचें कापड एकोडी व बापेवाडा येथें होते. पांढऱ्या दगडाच्या खाणी कोका, कन्हेरी या गांवीं आहेत. पोहे बनविण्याचे कारखाने हया जिल्हयांत अनेक ठिकाणीं आहेत.

भंडारा जिल्हयांतील बिडी उद्योगधंदे

भंडारा जिल्हयांत बिडी उत्पादन करणारे दोन मोठे कारखानदार असून दीडशे लहान कारखानदार आहेत. वरील दोन मोठे कारखानदार (अ) छोटाभाई जेठाभाई पटेल अँड कंपनी. (ब) मोहनलाल हरगोविंददास बिडी फॅक्टरी.

हया दोन मोठया कारखान्यांत दररोज अनुक्रमे ३० हजार व ४० हजार बिडीमजूर रोज काम करतात. व दीडशे लहान कारखानदाराजवळ एकूण १,३०,००० (एक लाख तीस हजार) मजूर रोज काम करतात. वरील मोठया कारखानदाराजवळ दररोज अनुक्रमे अडीच ते तीन करोड बिडी तयार होते.

हया जिल्हयांत १९५८ सालीं पांच बिडी उत्पादन सहकारी संस्था स्थापन झाल्या. प्रत्येक संस्थेमध्यें पांच ते सात मजूर काम करणारे आहेत. हया सर्व संस्थांमध्ये मजुरीचा दर सरकारी नोटीफीकेशनप्रमाणे देण्यांत येतो.

हया पांच सोसायटींपैकी जनता बिडी कामगार सहकारी समिति सतत प्रयत्नशील राहिली आहें. हया सोसायटीला भारत सरकारच्या संरक्षण खात्याने बिडी खरेदी करण्याचें आश्वासन दिलें आहे.

१० : जिल्ह्यांतील सहकारी चळवळ

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या काळांत नागपूर विभागांत भंडारा जिल्ह्यानें सहकारी क्षेत्रांत निर्दिष्ट उद्देशापेक्षां उच्चांक गाठल्यामुळ १९५९-६० पासून हा सखोल विकासाकरितां निवडण्यांत आला. ह्या जिल्ह्यांत सध्या खालील सोसायटचा काम करीत आहेत—

(१)	जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक	१
(२)	जमीन गहाण बँक	१
(३)	प्राथमिक क्रेडीट सोसायटी	५
(४)	विविध उद्देशीय मोठ्या सोसायटचा	२१
(५)	सेवा सहकारी सोसायटी	७५३
(६)	खरेदी आणि विक्री	१०
(७)	कन्झुमर्स सहकारी सोसायटी व स्टोअर	२६
(८)	हातमाग सहकारी संस्था	३९
(९)	औद्योगिक सहकारी संस्था	२३
(१०)	मत्स्यपालन सहकारी संस्था	२५
(११)	सहकारी धान्य बँक	१५
(१२)	सहकारी राईस मिल	४
(१३)	गैर-शेतकी सोसायटी	४
(१४)	कमी वेतन कमावणाऱ्याची सोसायटी	१
(१५)	मोटार वाहतूक सोसायटी	२
(१६)	गृह-निर्माण सोसायटी	५
(१७)	सुपरवाईजींग युनियन	१३
(१८)	जिल्हा सहकारी बोर्ड	१
(१९)	पशुसंवर्धन सोसायटी	४
(२०)	बेटर-लिव्हींग सोसायटी	३
(२१)	सहकारी कुकुटपालन संस्था	२
(२२)	सहकारी पध्दत शेती संस्था	१
(२३)	इतर औद्योगिक संस्था	६
	एकंदर ...	९६५

भंडारा जिल्ह्यांत मध्यवर्ती सहकारी बँक ही मध्यवर्ती फायनान्सिग एजन्सी आहे. सर्व सहकारी संस्थांना ह्या बँकेमार्फत कर्ज देण्यांत येतें. ह्या बँकेची स्थापना १९११ ह्या वर्षी झाली. ह्या बँकेच्या सध्यां सर्वत्र शाखा असून सर्व खेडयांचा समावेश बँकेच्या कक्षेत केलेला आहे. एकंदर ७४१ सेवा सहकारी संस्था, २१ मोठ्या विविध समित्या असून सभासदांची एकंदर संख्या ४९,४६३ आहे.

बँक कर्ज रूपांत प्राथमिक क्रेडीट सोसायट्यांना कर्ज देतें. त्यांच्यामार्फत कास्तकारांना कर्ज मिळण्याची सोय झालेली आहे. वैयक्तिक कर्जदारांना ऑईल एंजीन खरेदीकरितां सोसायटचा कर्ज देतात. त्या बँकेच्या खातेदारांना पण त्यांच्या फिक्स्ड डिपॉझिट व राष्ट्रीय बचत योजना सर्टीफिकेटवर कर्ज देतात.

कर्ज (१)	बँकेची बाकी (२)	अ‍ॅडव्हांस (३)	वसूली (४)	बाकी (५)
	रुपये	रुपये	रुपये	रुपये
		१९५८-५९		
प्राथमिक क्रेडीट सोसायटींना कर्ज	४६,१२,६१२	९१,७४,६९२	४५,१९,२८९	९२,६८,०१५
वैयक्तिक कर्जे ...	४३,३०९	१२,७५०	१८,९७०	३७,०८९
कर्ज ए. एफ्. डी. आर् आय्. एन. एस्. सी.	१८,७२५	१०,०४०	११,९४९	१६,८१६
		१९५९-६०		
प्राथमिक क्रेडीट सोसायटींना कर्ज	९२,६८,०१५	१,०४,७०,००७	७०,५८,५८८	१,१७,७९,४९५
वैयक्तिक कर्ज ...	३७,०८९	अ‍ॅडव्हांस देणें बंद केले.	१९,२६८	२४,८२१
कर्ज ए. एफ. डी. आर. आय. एन. एफ. सी.	१६,८१६	२९,२१०	१५,६५०	३०,३७६

भातशेती योजना

१९५८ मध्यें ही योजना तुमसर व साकोली येथें प्रथम सुरू करण्यांत आली. आज ही योजना जिल्ह्यांमध्यें एकूण ५ भातशेती गटांमध्यें विभागली आहे. ह्या योजनेअंतर्गत बँकेचे ५,९४५ सभासद असून त्यांनी १५,३०३ एकर जमीनीतून भातशेती करण्यासाठी ५,८९,१५१ रुपये बँकेकडून कर्ज घेतले आणि २,५७,६५८ रु. चे आवश्यक वस्तू बी, बीयाणे, रासायनिक खतें इत्यादिकरितां कर्जरूपांत घेतले. १९६० पर्यंत भातशेतीचा ११,५४२ सभासदांनीं फायदा घेऊन ३४,७९२ एकर जमिनीत भातशेती केली. त्याकरितां रु. ७,३१,८४१ कर्ज म्हणून रोख रक्कम बँकेकडून घेतले व रु. १०,८२,९०० च्या भातशेतीस आवश्यक वस्तू कर्जरूपांत घेतल्या. एकंदर कर्ज रकमेपैकी बँकेची पेड-अप शेअर कॅपिटल २७,७९,५६५ रुपये असून सरकारी वाटा रु. ८,२५,००० आणि रिझर्व फंड १,२३,६४२ रुपयाचे आहे. फिक्स्ड डिपाझिट रु. ५,४३,६७९ व सेव्हींग बँक रक्कम १२,९३,२६७ रुपये आहे. बँक शाखा तुमसर, पवनी, लाखनी, साकोली, मोरगांव अर्जुणी, गोंदिया व तिरोडा येथें आहेत. शक्यतोवर कास्तकारांना त्यांच्या घरीं कर्ज पोहोंचविण्याची व्यवस्था करण्यांत येते.

	१९५७	१९५८	१९५९	१९६०
	रुपये	रुपये	रुपये	रुपये
सोसायटी ...	३२८	३६८	४११	७६२
सभासदांची संख्या	१२,९१९	२५,७२८	४३,३४६	४९,४६३
शेअर रक्कम ...	५,१६,८८३	१३,११,४२९	१९,४६,४०३	२७,७९,५६५
डिपाझिटस् ...	७,२९,८८३	८,३४,१५०	१३,९५,६७३	१९,५१,२०९
कर्ज	१८,०८,३२८	४६,१२,६१२	९३,००,३६३	१,२०,८६,८६१

जमीन गहाण बँक, भंडारा---ही संस्था सद्या भंडाऱ्यालाच आहे. तिच्या शाखा इतर सर्व गट विभागांत निर्माण करावयाच्या आहेत.

		१९५७-५८	१९५८-५९	१९५९-६०
(१) सभासद (अ)	... ...	४७२	४९५	५४८
(ब)	...	१३४	१३६	१६६
		रुपये	रुपये	रुपये
(२) शेअर भांडवल	... ...	१६,२२३	१७,६४०	१८,९३७
(३) कर्ज दिलेली रक्कम	...	३५,७८०	७८,३५०	१,११,५८०
(४) कर्ज वसूली	... ...	६५,७०१	६३,२२६	५३,३३६
(५) कर्ज बाकी	... ...	३,१९,१४७	३,५०,५०९	४,०९,००८

हया समित्या जिल्हयांत २१ प्रकारच्या वरील सोसायटया चालू आहेत. हयांच्या सभासदांची संख्या ५६,६९१ इतकी आहे. हया १४ सोसायटयांना ७,५०० रुपयांचे प्रत्येकी शेअर कॅपिटलचें भांडवल देण्यांत आलें. ११ सोसायट्यांना कर्ज रूपानें ७,५०० रुपये व २,५०० रुपयांचे सबसिडीच्या रूपानें लहान आकारांचीं गुदामें बांधण्याकरितां देण्यांत आले आणि बाकीच्या १० सोसायट्यांना ३७,५०० रुपयांचें कर्ज व १२,५०० रुपयांची सब्सिडी देण्यांत येणार आहे.

सेवा सहकारी संस्था

सरकारी धोरणानुसार सद्याच्या शेतकी पतपेढयांचें सेवा सहकारी संस्थेंत रूपांतर करण्याचें ठरलें होतें, आणि जिथे असल्या प्रकारच्या संस्था नसतील तेथें नवीन सेवा सहकारी संस्था स्थापण्याचें उद्दिष्ट होतें. त्यानुसार ३२६ जुन्या सोसायटयांचें सेवा सहकारी संस्थात रूपांतर करण्यांत येऊन नवीन ५१३ सोसायट्यां एका वर्षाच्या अवधींत स्थापन करण्यांत आल्या. ४४० नवीन सोसायट्या व ३१३ जुन्या सोसायटया नोंदविण्यांत आल्या.

खरेदी-विक्री सहकारी समित्या

शेतकी उत्पादनाच्या विक्री आणि खरेदी करणाऱ्या एकंदर १३ संस्था असाव्या असे होतें. हया समित्या प्रत्येकी विकास गटाच्या मुख्य ठिकाणीं स्थापन करावयाच्या होत्या. त्यादृष्टीनें १३ पैकीं १० विकास गटांत प्रत्येकी १ याप्रमाणें संस्था सुरु करण्यांत आल्या. गोंदिया येथील खरेदी-विक्री संस्थेला सरकारकडून २४,९९० रुपये शेअर कॅपिटल धान्य भांडार बांधण्याकरितां कर्ज आणि सबसिडी म्हणून देण्यांत आलें. तसेच वडेगांव येथें १०,००० रुपये मध्यम आकाराचें धान्यभांडार बांधण्याकरितां देण्यांत आले.

गिऱ्हाईकांची सहकारी संस्था व स्टोअर हया संस्था रोजच्या जरुरीच्या वस्तूंच्या वांटपाकरितां असल्या तरी त्या सर्वांची सेवा सहकारी संस्थेंत रूपांतर करण्याची एक योजना आहे.

हातमाग उद्योगाकरितां सध्या एकंदर ३९ सोसायटया हया जिल्हयांत आहेत. सभासदांची संख्या ३,७२८ असून त्यांचे शेअर कॅपिटल ५४,२१७ रुपये आहे. औद्योगिक सहकारी संस्थेची संख्या २३ असून सभासदांची संख्या ७०६ इतकी आहे व शेअर भांडवल १६,३९७ रुपये आहे.

हया जिल्हयांत २९ मत्स्यपालन सहकारी संस्था असून विभागाकडून कर्ज व सवलती देण्यांत आल्या आहेत.

सहकारी राईस मिल

सहकारी राईस मिलची स्थापना जिल्ह्यामध्यें सिहोरा व पिंपळगांव येथें करून नागपूर विभागांत सहकारी चळवळींत ह्या जिल्ह्यानें प्रमुख स्थान पटकाविलें आहे. सरकारकडून ७५,००० रुपये व ७०,००० रुपये शेअर भांडवल म्हणून देण्यांत आलें. आणि जवळजवळ तितकीच रक्कम सोसायटीच्या लोकांनीं जमा केली आहे. तसेच आणखी २ राईस मिलची स्थापना कारधा व गोंदिया येथें करण्यांत आली आहे. पिंपळगांव व सिहोरा येथें राईस मिलची इमारत तयार झाली असून आवश्यक यंत्र-सामुग्री लावण्यांत आलेली आहे. गिरणीचें धान प्रोसेसिंगचें काम सुरू झालेलें आहे.

सहकारी गृह-निर्माण समिति

ह्या कार्यक्रमानुसार जिल्ह्यांमध्यें भंडारा, तुमसर, गोंदिया येथें एकएक सहकारी पद्धतीवर गृह-निर्माण संस्था कार्य करीत आहे. ह्या संस्थेमध्यें एकंदर २७५ सभासद आहेत. एकंदर १३२ घरें बांधण्यांत आलीं. हीं घरें लो इन्कम योजनेखाली बांधण्यांत आलीं. त्याशिवाय मागासलेल्या वर्गांच्या व मेहतरांच्या सहकारी संस्था निर्माण करण्यांत आल्या असून त्यांच्याकरितां घरें बांधण्याचें काम सुरू आहे. सेवा सहकारी संस्था सुरू झाल्यानंतर त्या संस्थेवर देखरेख ठेवण्यासाठीं प्रत्येक गट विकासाच्या मुख्य ठिकाणीं एक-एक अशा १३ ठिकाणीं सुपरवाईजिंग युनियन्स स्थापण्यांत आल्या.

जिल्हा सहकारी बोर्ड

सहकारी चळवळीबद्दल लोकांना माहिती देणें, प्रशिक्षित कर्मचारीवर्ग तयार करणें व सहकारी चळवळीचें क्षेत्र वाढविणें इत्यादि कार्यक्रम पार पाडण्यासाठीं १९५९ मध्यें जिल्हा सहकारी बोर्डाची स्थापना करण्यांत आली. ह्या बोर्डांत १९ सभासद असून त्यामध्यें १४ सभासद, ह्या सहकारी संस्थेंतून व १५ इतर सभासद आहेत. त्यांत सहकारा-संबंधीचें शिक्षण देणारे शिक्षक आहेत. दोन प्रशिक्षण वर्ग आहेत. ५८ वर्ग घेण्यांत आले असून २,९१९ लोकांना सहकारासंबंधीं शिक्षण देण्यांत आलें. त्याशिवाय ६५ ग्राम सेवकांना सहकारासंबंधीं प्रशिक्षण देण्यांत आलें.

भातशेती योजना

भंडारा जिल्ह्यांतील भाताचें प्रमुख पीक आहे. ज्या भागांत पाटाच्या पाण्याची व ओलीताची सोय आहे अशा विभागांत कास्तकारांना आपली-शेती जापानी पद्धतीनें लावण्यास प्रवृत्त करण्यांत येते. त्यांना योग्य मार्गदर्शन करून वेळीच भांडवलाची सोय करणें हें ह्या योजनेचें थोडक्यांत स्वरूप आहे. ही योजना सहकार व शेतकी खात्यांच्या मार्फत कार्यान्वित करण्यांत येत आहे. १९५७-५८ मध्यें तुमसर व साकोली विकास गटांत २०,००० एकरांत जापानी पद्धतीनें शेती करण्याचें लक्ष्य होतें. त्यापैकीं १८,००० एकरांचे उद्दिष्ट गाठण्यांत आलें. हंगामाच्या वेळीं कास्तकारांना सहकारी समित्याद्वारा कर्ज, बी-बियाणें व खत वांटण्याचा मुख्य उद्देश आहे. १९५९-६० मध्यें सबंध जिल्ह्यांत ५ भातशेती गटांतील ६०,००० एकरांत जापानी पद्धतीनें भातशेती करण्याचें लक्ष्य होतें. त्यापैकी ५६,००० चें लक्ष्य गाठण्यांत आलें. १९५७-५८ मध्यें ६,५८० कास्तकार सभासदांना ७,००,६२१ रुपये कर्जाच्या व खताच्या रूपानें देण्यांत आले. १९५९-६० मध्यें बँक तर्फे २१,६५,७५६ रुपये ११,५४२ कास्तकार सभासदांना देण्यांत आले.

नियंत्रित बाजार योजना

ही योजना या भागांत नवीनच आहे. जिल्ह्यांतील प्रमुख बाजारपेठा गोंदया, तुमसर, पौनी, भंडारा, आमगांव, लाखनी, इत्यादि ठिकाणीं असून त्या नियंत्रित करण्याचे प्रस्ताव पाठविण्यांत आले आहे. लवकरच वरील बाजारपेठा नियंत्रित जाहीर करण्यांत येतील.

मागासलेल्या जातीकरितां धान्य भांडार योजना

योजना मुख्यत्वेकरून मागासलेल्या जातीकरितां अत्यंत फायद्याची सिद्ध झाली आहे. ही संस्था सदस्यांना अडचणीच्या वेळीं कर्ज रूपांत धान्य देऊन ते त्यांच्याकडून वसूल करते. भंडारा जिल्ह्यांत एकूण ६ धान्य-भांडारें आहेत. ते आलेझरी, गंगेझरी, गोंडखारी, सोनगांव, सोंडखारी व पाथरीटोला या ठिकाणीं स्थापन करण्यांत आले असून त्याकरितां प्रत्येकी ४ हजार रुपये कर्ज म्हणून दिले आहेत.

मागासलेल्या वर्गाकरितां घर बांधणी

ही योजना ह्या विभागांत नुकतीच सुरू करण्यांत आली. ह्या संस्थेत घर बांधण्याकरितां सरकारकडून जमीन, कर्ज व अनुदान या स्वरूपांत मदत होतें.

केंद्रीय धान्य भांडार योजना

कास्तकारांना धान्याची योग्य किंमत मिळवून देण्याची केंद्रीय सरकारची योजना आहे. याप्रकारचे केंद्र गोंदिया येथे आहे. ह्या भांडारांत कास्तकार आपलें धान्य आणून ठेवतो व त्यावर त्याला योग्य रक्कम कर्ज रूपांत ही संस्था देतें. त्याच्या धान्याला जास्त किंमत आली तर तो कास्तकार आपलें धान्य ह्या संस्थेतून घेऊन जातो, व घेतलेलें कर्ज परत करतो. हे कार्पोरेशन मोठमोठ्या औद्योगिक शहरांत असल्या प्रकारचीं गुदामें निर्माण करणार आहे व जवळ जवळ १०,००० रुपयांचें धान्य मावेल इतक्या मोठ्या गोदामाची सोय करण्यांत येणार आहे. सध्या देशामध्यें ३० वेअरहाऊसेस निर्माण केले आहेत. त्यापैकी भंडारा जिल्ह्यांत गोंदिया येथें एक संस्था १९५७ पासून कार्य करीत आहे.

धान्याचें प्रकार (१)	स्टोअरींग चार्ज प्रत्येक पोत्यांना (मासिक) (२)	प्रत्येक पोत्यावर प्रत्येक आठवड्यांत (३)
भुईमूगाच्या शेंगा	१२ नये पैसे	४ नये पैसे
तांदुळ, ज्वारी, गहूं, तूर, हरभऱ्याची दाळ, मुगाची डाळ, उडद शेंगा	१८ नये पैसे	५ नये पैसे
साखर, मिरच्या, इत्यादि	२१ नये पैसे	६ नये पैसे

१९५७-५८ मध्यें ६९६ पोतीं म्हणजेच १,७०० मण धान्य ह्या केंद्रांत जमा करण्यांत आलें. १९५८-५९ मध्यें ५२,६६० पोतीं किंवा १२५,००० मण धान्य साठविण्यांत आलें. १९५९-६० मध्यें ९२,३६५ पोतीं किंवा २१८,००० मण धान्य साठविण्यांत आलें. ह्या गुदामांत पुरेशा जागेच्या अभावी एक नवीन धान्य गुदाम बांधण्याची योजना आहे.


कुटीर उद्योग व औद्योगिक सहकारी संस्था

घरगुती उद्योगधंदे अथवा कुटीर उद्योग व ग्रामोद्योग हे जुने असून एके काळीं त्याच्या कलाकौशल्याची ख्याति सर्व जगभर पसरलेली होती. यांत्रिक युग सुरू झाल्यापासून त्याचें महत्त्व हळूहळू कमी होत गले. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या धंद्याचें महत्त्व पुनः वाढत आहे. छोटे उद्योगधंदे व मोठे उद्योग धंदे यांना राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीनें महत्त्वाचें कार्य करावयाचे असल्यामुळें आणि दोन्ही प्रकारच्या धंद्यांना एकमेकांचे पूरक म्हणून कार्य करतां येत असल्यानें छोटे उद्योगधंदे विरुद्ध मोठे उद्योगधंदे हा प्रश्नच उद्भवत नाहीं.

लोकांना कामधंदा मिळवून देण्याच्या दृष्टीनें तसेंच मालाच्या मोठ्या प्रमाणावरील उत्पादनापेक्षां बहुसंख्य लोकांना त्यांच्या चरितार्थासाठीं साधन मिळवून देण्याच्या दृष्टीनें यांचा उपयोग करून घेणें आवश्यक आहे.

विकास गटांतून प्रत्येकीं एक याप्रमाणें ग्रामोद्योग व लघुद्योगाचे विस्तार अधिकारी हे विकास गट अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कामकाज करीत असले तरी ते या खात्याच्या कामकाजाचे एकमेव घटक आहेत. यावरून या खात्याच्या कामाची कल्पना येते. कुटीर उद्योगाची व्याख्या सरकारनें अगोदरच संमत केली असून त्याप्रमाणें पुढील पद्धतीनें कार्य करण्यांत येत आहे :—

(१) वंशपरंपरागत कारागिरांना तांत्रिक प्रशिक्षण देणें, उत्पादन संस्था चालविणें व संघटित करणें.


भंडारा जिल्हा
आरोग्य व्यवस्था
व शैक्षणिक प्रगति
शाळा
बालक मंदीर
क्षयरोगाचे दवाखाने
सुतिकागृह
महारोगी दवाखाने
प्रायव्हेट दवाखाने
आयुर्वेदिक दवाखाने
सरकारी दवाखाने
डोंगरी
नाकाडोंगरी
गोबरवाही
गरीबघोडा
चिरवला
तुमसर
आंधळगांव
मोहाडी
वरठी
मुढरी
करंज
कोका
भंडारा
दवडीपार
अड्याळ
कोंढा
पालोरा
आमगांव
पवनी
भुयार
सावरला
तिरोडा
मुंडीकोटा
गोंगला
सुकळी
कुरघडी
गोंदिया
गोरेगाव
अर्जुनी
दवनीपाडा
दासगाव
काटी
बोडगाव
कामठा
काट्टीपार
मोनी
चोपा
आमगाव
अंजोरा
डोंगरगांव
सोनपुरी
सालेकसा
दरेकसा
पांढरी
अेकोडी
राजेगाव
लाखनी
पोहरा
सडकपिंपळगांव
साकोली
सौंदड
सडक अर्जुनी
किटाडी
सानगडी
दिघोरी
शरांडी
दारव्हा
बडेगांव
लाखांदूर
मोरगाव अर्जुनी
पहालगाव
देवरी
पालांदूर
चिचगड
कोकाडी
केशोरी

J-130—3-B.

(२) ज्यांच्यामुळे उत्पादन वाढेल अशा सुधारलेल्या अवजारांच्या उत्पादनासाठीं संशोधन करणें.

(३) कारागीर किंवा इतर व्यक्तींना घरगुती उद्योगधंद्याची वाढ करण्याकरितां भांडवल अवजारें व इतर सामुग्री यासाठीं आर्थिक साहाय्य करणें.

(४) औद्योगिक सहकारी संस्थांतून प्रशिक्षित कारागिरांचें संघटन करून कार्यक्रमाला चालना दणें.

औद्योगिक सहकारी संस्था खातें पुढील कार्य करते—

(१) औद्योगिक सहकारी संस्था संघटित करणें व त्यांचीं नोंद करणें.

(२) या संस्थांच्या कारभाराची तपासणी करणें व त्यावर देखरेख ठेवणें.

(३) या संस्थांना भांडवल, खेळतें भांडवल, अवजारें, इतर सामुग्री आणि व्यवस्थेचा खर्च यांसाठीं आर्थिक साहाय्य देणें आणि त्यांनी उत्पादन केलेल्या मालाच्या विक्रीची व्यवस्था करणें.

औद्योगिक सहकारी संस्था

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस म्हणजे १९५५-५६ अखेर भंडारा जिल्हयांत केवळ हातमाग उद्योगाखेरीज अन्य औद्योगिक क्षेत्रांमध्ये सहकारी चळवळीनें स्पर्श केलेला नव्हता. परंतु दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अवघ्या तीन वर्षांत बिडी उद्योग, चर्मोद्योग, तेलघाणी, शिवणकाम, बुरडकाम ह्या उद्योगांतील कारागिरांच्या सहकारी संस्था स्थापन झालेल्या असून शिवाय पितळ कामगार, कुंभार, सुतार, लोहार, विद्युत कामगार, जंगल कामगार, इत्यादि व्यवसायांतील कामगार सहकारी चळवळीच्या क्षेत्रांत आले आहेत. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या चार वर्षांत भंडारा जिल्हयांत औद्योगिक सहकारी संस्थांची संख्या दिनांक ३१ मार्च १९६० च्या अखेर ६० झालेली होती. त्यांत हातमाग विणकरांच्या ३९, बिडी कामगारांच्या ५, बुरड कामगारांच्या ४, चर्मोद्योगाच्या ४, तेलघाणी उद्योगाच्या २, शिवणकला उद्योगाची १, आणि वनिता विकासासाठी १, विटा-कौले कामगारांच्या ३, कामगार सहकारी संस्था २, जंगल कामगार ४, कोषा उत्पादक सोसायटी १, पितळ-भांडी सोसायटी १, याप्रमाणें औद्योगिक सहकारी संस्था कार्य करीत आहेत.

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षांतील प्रगति

		१९५६-५७	१९५७-५८
(१) विणकर सहकारी संस्था	...	३६	३८
(२) सभासदांची संख्या ...	...	१,५६०	२,७८३
		रुपये	रुपये
(३) शेअर भांडवल ...	...	२०,८८४	५५,७८८
(४) राखीव निधी ...	...	२९,१४९	४३,७४३
(५) नफा	...	३३,५६८	७३,४५७
(६) सुताची खरेदी ...	...	४,९६,६८६	५,६०,७०१
(७) विक्री	...	५,८८,८७४	८,४९,५४८

याशिवाय १९५८-५९ या आर्थिक वर्षांमध्यें हातमाग विणकर सहकारी संस्था, लि., मुंढरी, व हातमाग विणकर सहकारी संस्था, लि., अड्याळ, या दोन संस्थांना रंगाई गृहांकरितां आर्थिकसाहाय्य देण्यांत आलें आहे. तसेंच विणकर सहकारी संस्थांना वारपिंग बीमचा पुरवठा करण्याच्या योजनेंनुसार प्रत्येकी रुपये ४०० याप्रमाणें रु. २,४०० अनुदानहि चार संस्थांना मंजूर करण्यांत आलेलें आहे. हातमागाच्या कापडाची विक्री वाढविण्याच्या व त्यांना बाजारपेठ मिळवून देण्याच्या उद्देशानें विणकर सहकारी संस्थांना सॅम्पल-बुक्स तयार करण्याच्या योजनेंनुसार प्रत्येकी ६० रु. याप्रमाणें ३६० रुपयांचीं सहा संस्थांना अनुदानें मंजूर करण्यांत आलीं आहेत.

द्वितीय पंचवार्षिक योजनेनुसार ग्रामोद्योगाचीं मूलभूत उत्पादन केंद्रें सुरू करण्याच्या कार्यक्रमान्वयें भंडारा येथें २६ जानेवारी १९५८ ला अखाद्य तेलापासून साबण तयार करण्यासाठीं एक मूलभूत उत्पादन केंद्र सुरू करण्यांत आलें आहे. ८ एप्रिल १९५९ पर्यंत या केंद्रांत सुमारे रु. ३,६५४.४४ किमतीचे साबण बार, वड्या व चुरा यांचें उत्पादन करण्यांत आलें असून एकूण रु. ३,३३६.९६ किमतीच्या साबणाची विक्री करण्यांत आली आहे.

शासकीय साबण उत्पादन केंद्र, भंडारा

वयक्तिक कर्जें

भंडारा जिल्ह्यांत एकूण रु. ३०,७२० इतक्या रकमेचें आर्थिक साहाय्य वैयक्तिक कर्जाच्या स्वरूपांत खालील उद्योगांना देण्यांत आलें आहे--

		रुपये
(१)	साबण उद्योग	५,०००
(२)	विटा व कौलें बनविणें	६,०००
(३)	होड्या व फर्निचर तयार करणें ...	५,०००
(४)	तेलघाणी उद्योग	८,५००
(५)	गूळ व खांडसारी	६,२२०

याशिवाय सामूहिक विकास गट, तुमसरमध्ये ग्रामीण कला, हस्तव्यवसाय व उद्योग या कार्यक्रमांतर्गत सुद्धा खालील उद्योगांच्या विकासासाठीं एकूण ५७,८५० रुपयाचें आर्थिक साहाय्य कर्जाच्या स्वरूपांत देण्यांत आलें आहे. हीं कर्जे प्रामुख्यानें लोहारकाम, सुतारकाम, कुंभारकाम, तयार कपडे बनविणें, शिवणकाम दूधपुरवठा, ब्लँकेट बनविणें, सोनारकाम, तेलघाणी, कुक्कुटपालन, नेवार व सतरंज्या बनविणें, चर्मोद्योग, विटा व कौले बनविणें, उदबत्त्या तयार करणें, साबण उद्योग, आटाचक्की, वह्या तयार करणें व हातमाग उद्योग यांसाठीं देण्यांत आलेलीं आहेत.

गूळ व खांडसारी उद्योगाच्या विकासासाठीं तसेंच आधुनिक पद्धतीनें गूळ तयार करण्याचें शिक्षण शेतकऱ्यांना देण्यासाठीं साकोली येथें गूळ बनविण्याचे प्रात्यक्षिक देणारे एक पथक ठेवण्यांत आलेलें आहे. ह्या पथकाद्वारे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतांत गूळ बनविण्याची प्रात्यक्षिकें देण्यांत येतात. हीं प्रात्यक्षिकांची योजना आज बरीच लोकप्रिय झालेली आहे.

गूळ व खांडसारी उद्योग

याशिवाय कढया व घाणे यांच्या खरेदीसाठीं लोकांना सुमारे ६,२२० रुपये इतक्या रकमेचीं वैयक्तिक कर्जेंहि देण्यांत आलीं आहेत.

सामूहिक विकास योजना कार्यक्रमांतर्गत ग्रामीण कला, हस्तव्यवसाय व उद्योग यांच्या विकासाच्या दृष्टीनें कारागिरांना अद्यावत यंत्र व तंत्र यांचें ज्ञान देण्याच्या आणि त्यांचा वापर करून उद्योगांची उत्पादकता वाढविण्याच्या हेतूनें आज प्रत्येक विकास गटांत कारागिरांना पिढीजात व्यवसायांचें प्रशिक्षण देण्याची तजवीज करण्यात आलेली आहे. कारागिरांना त्यांच्या गांवांतच त्यांच्या पिढीजात उद्योगांचें अद्यावत ज्ञान मिळावे आणि नवीं यंत्रें व तंत्रें त्यांच्या उद्योगांत रूजूं व्हावीत या योजनेनुसार खालीलप्रमाणें प्रशिक्षण तथा उत्पादन केंद्रें चालविलीं जात आहेत--

ग्रामीण कला, हस्त-व्यवसाय व उद्योग

(१) सामूहिक विकास गट, तिरोडा--

(अ) बांबूच्या वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण केंद्र, बोरा व सुकळी.

(ब) कुंभारकाम व विटा तयार करण्याचें प्रशिक्षण केंद्र, सरांडी.

(क) शिवणकाम प्रशिक्षण केन्द्र, तिरोडा.

(ड) सुतारकाम प्रशिक्षण केंद्र, वडेगांव.

या केंद्रांत प्रत्येकी किमान १०—१० विद्यार्थी प्रशिक्षण घेऊन बाहेर पडले आहेत अगर प्रशिक्षण घेत आहेत.

(२) सामूहिक विकास गट, मोरगांव-अर्जुनी—

(अ) चर्मोद्योग प्रशिक्षण केन्द्र, महागांव.
(ब) कुंभारकाम प्रशिक्षण केन्द्र, अर्जुनी.
(क) शिवणकाम प्रशिक्षण केन्द्र.

यापैकी पहिली दोन केंद्रें चालविलीं जात असून त्यामध्यें १० विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. तिसरें केंद्र लवकरच सुरूं करण्यांत येत आहे.

(३) प्रथमावस्था विकास गट, भंडारा—

(अ) सुतार काम व लोहारकाम प्रशिक्षण केंद्र, धारगांव.
(ब) चर्मोद्योग प्रशिक्षण केंद्र, भंडारा.
(क) शिवणकाम प्रशिक्षण केंद्र.

(४) प्रथमावस्था विकास गट साकोली—

(अ) चर्मोद्योग प्रशिक्षण केंद्र.
(ब) बुरडकाम प्रशिक्षण केंद्र.
(क) शिवणकाम प्रशिक्षण केंद्र.

यापैकीं पहिलीं दोन केंद्रें लाखनी येथें लवकरच सुरू करण्यांत येतील. तिसऱ्या केंद्राला अजून मंजुरी यावयाची आहे.

(५) प्रथमावस्था विकास गट, सालेकसा—

(अ) सुतारकाम प्रशिक्षण केंद्र.
(ब) कुंभारकाम प्रशिक्षण केंद्र.

(६) द्वितीयावस्था विकास गट, तुमसर—

(अ) हातमाग विणकाम प्रशिक्षण केंद्र, सिहोरा.
(ब) सुतारकाम प्रशिक्षण केंद्र, येरली.
(क) रंगाई व छपाई प्रशिक्षण केंद्र, सिहोरा.
(ड) मधमाशा पाळण्याचें प्रशिक्षण केंद्र, बघेडा.

या केंद्रांतून २८ विद्यार्थ्यांनीं प्रशिक्षण घेऊन आपला अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे.

द्वितीय पंचवार्षिक योजनेंत ग्रामोद्योगांचा विकास हा अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग कमिशन, नवी दिल्ली आणि राज्य ग्रामोद्योग मंडळ, मुंबई याच्या मार्फत व्हावयाचा आहे. त्याप्रमाणें विदर्भाच्या प्रादेशिक ग्रामोद्योग सल्लागार समितीची निर्मिती ही इ. स. १९५७ मध्ये करण्यांत येऊन समितीनें आपलें कार्य सुरूं केलें आहे. समितीच्या कार्यक्रमांतर्गत भंडारा जिल्ह्यात इ. स. १९५७-५८ मध्ये तेलघाणी उद्योगासाठीं कर्ज व अनुदानाच्या स्वरूपांत एकूण १७,९०६ रुपये इतकी रकम निरनिराळ्या संस्थांना देण्यांत आली आहे.

तद्वतच आटाचक्की व धान्य उडवणीच्या पंख्याचें वांटप करण्यासाठीं अनुदान म्हणून ५८५ रुपये भंडारा व तुमसर ह्या विकास गटासाठीं भंडारा जिल्हा साहाय्यक समिति, गोंदिया या संस्थेला देण्यांत आले आहेत.


तेलघाणी उद्योगाचें प्रशिक्षण देण्यासाठीं गोंदिया येथें एक प्रशिक्षण केंद्र भंडारा जिल्हा साहाय्यक समिति मार्फत चालविण्यांत येत असून आतापावेतो या केंद्रांतून सुमारे ३० विद्यार्थ्यांनीं आपला अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. प्रशिक्षणाच्या कालावधींत ह्या विद्यार्थ्यांना दरमहा प्रत्येकी ४० रुपये या प्रमाणे विद्यावेतनहि देण्यांत येते.

१९५८-५९ या आर्थिक वर्षात ग्रामोद्योगाचा कार्यक्रम अधिक विस्तृत स्वरूपांत अंगिकारण्यांत आला असून एकूण५८,४५५ रुपये रकमेचें आर्थिक साहाय्य तेलघाणी, हातसडीचा तांदूळ, हातबनावटीचा कागद आणि चर्मोद्योग ह्या व्यवसायासाठीं कर्ज व अनुदानांच्या स्वरूपांत देण्यांत आले आहे. ही मदत प्रामुख्यानें वैनगंगा तेलघाणी सहकारी समिति लि., बोरगांव, ग्रामोद्योग तेलघाणी सहकारी समिति लि., नरसगी, गुरुदेव सेवामंडळ पवनी, गुरुदेव सेवा आश्रम, आमगांव, भंडारा जिल्हा साहाय्यक समिति लि. गोंदिया, व चर्मकार सहकारी संस्था, लाखनी, या संस्थांना देण्यांत आली आहे.

कुटीर उद्योग आणि सहकारी चळवळ

कुटीर उद्योगांच्या विकासाचें कार्य असे आहे की, सरकारी अधिकाऱ्यांव्यतिरिक्त, इतरांनीं सक्रिय सहकार्य दिल्याशिवाय ते यशस्वीरीत्या पार पाडतां यावयाचें नाहीं. कुटीर उद्योगांना प्रोत्साहन मिळालें तर बऱ्याच लोकांना काम मिळेल या उद्देशाने कुटीर उद्योगांचें संघटन करण्याचा, कुटीर उद्योगांतून निर्माण होणाऱ्या मालाचें उत्पादन वाढविण्याचा, उत्पादनाची साधनें सुधारण्याचा, कच्च्या मालाची तरतूद करण्याचा व त्यांना भांडवली स्वरूपाची मदत करण्याचा सरकारनें संकल्प केला आहे. शहरांतील स्पर्धेने बंद पडलेले कुटीर उद्योग सुरू करणें हाहि एक कार्यक्रम आहे. सुमारे तीनपंचमांश ग्रामीण भारत हा सामूहिक विकास कार्यक्रमांत समाविष्ट व्हावयाचा असून या क्षेत्रांत कुटीर उद्योगांचें पुनरुज्जीवन सहकारी पध्दतीनें व्हावयाचें आहे.

भंडारा जिल्हा
पिकें व खनिज संपत्ती



११ : सार्वजनिक आरोग्य

ह्या जिल्ह्यांतील लोकांसाठीं आरोग्यविषयक सोयी करण्याकरितां तीन खातीं आहेत--(१) सरकार, (२) लोकल मंडळें आणि (३) ग्रामपंचायती. लोकांना संसर्गजन्य रोगापासून दूर ठेवण्याकरिता इंजेक्शनचा प्रबंध करणें व सार्वजनिक स्वच्छतेकडे वगैरे लक्ष ठेवणें. ह्या गोष्टी प्रामुख्यानें जनपद सभा, ग्रामपंचायती यांनीं करावयाच्या असतात. सरकारतर्फें जिल्ह्यांत निरनिराळ्या ठिकाणी रूग्णालयें उघडण्यांत आलीं आहेत. त्यांतून लोकांना औषध पुरवठा करणें, त्यांच्या रोगांची चिकित्सा करणें, वगैरे मदत देण्यांत येते.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील आरोग्यविषयक कार्यक्रमाचें सर्वसाधारण लक्ष अस्तित्वात असलेल्या आरोग्यविषयक सोयींची वाढ करून रोगप्रतिबंधक उपाययोजना करणें हें होय. मुख्य ठिकाणी एक मोठे सरकारी इस्पितळ आहे आणि जिल्ह्यांत इतरत्र ११ ॲलोपेथिक दवाखाने उघडलेलें आहेत. ह्याशिवाय जनपद आणि नगरपालिकाद्वारा चालविलेल्या एकंदर ३८ आयुर्वेदिक दवाखानें असून ७ प्रसूतिकागृहांची स्थापना केलेली आहे. जिल्ह्यांतील मुख्य रूग्णालयांत एक्सरे मशिनची सोय करण्यांत आलेली आहे, तसेंच त्याकरिता लागणारी इमारत तयार झालेली आहे. त्या रुग्णालयांत मेजर व मायनर ऑपरेशन करण्याकरिता दोन शल्य शाळा राहतील. ह्या रुग्णालयांत क्षयरोग्याची व्यवस्था ठीक व्हावी म्हणून जास्तीच्या १० खाटा वाढविण्यांत आल्या. गोंदिया येथें नवीन क्षय रूग्णालय १९५७ मध्ये उघडण्यात आले. प्रत्येक विकास गटांतून एक प्राथमिक स्वास्थ्य केंद्र उघडण्याचें लक्ष्य आहे. त्यांपैकी जुन्या विकास गटांत हीं केंद्रे उघडलेलीं आहेत.

भंडारा जिल्ह्यांत सध्यां बारा रूग्णालयें व पांच औषधालयें आहेत. पैकी ५ रूग्णालयें भंडारा तालुक्यांत, चार गोंदिया तालुक्यांत, तीन साकोली तालुक्यांत आहेत. पांच औषधालयापैकी तीन गोंदिया तालुक्यांत व दोन साकोली तालुक्यांत आहेत. त्याचप्रमाणें जिल्हा स्वास्थ्य अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली भंडारा, गोंदिया, मोरगांव अर्जुनी आदि प्रत्येक विकास गटांतून एक प्राथमिक उपचार केंद्राची स्थापना करण्यांत येत आहे.

ह्या रूग्णालयांतून १९५९-६० सालांत एकंदर २७ डॉक्टर काम करीत होते. त्यापैकी १० शहर विभागांत व १७ खेडे विभागांत होते. एकूण १२ रूग्ण परिचारिका रूग्णालयांतून काम करतात, रूग्णालयात एकंदर २५७ रोग्यांसाठीं बेड्सची व्यवस्था केलेली आहे. ह्या दवाखान्यांतून ६,८५९ रोग्यावर उपचार करण्यांत आले व २२९,९०७ रोग्यांना औषध पुरविण्यांत आलें.

भंडारा जिल्ह्यांत १९५९ साली जन्माचें प्रमाण दर हजारीं ८०.२५ होते, तर मृत्युचें प्रमाण ६६.३१ होतें. तसेच बालमृत्युचे प्रमाण दर हजारीं २२.१९ होते. जिल्हा स्वास्थ्य कचेरीतर्फे १९५९ सालांत एकंदर ६,१९५ लोकांना रोगप्रतिबंधक इनॉक्युलेशन करण्यांत आले.

भंडारा जिल्ह्यांत ह्यापूर्वी तुमसर व तिरोडा येथें प्राथमिक स्वास्थ्य केंद्रें उघडण्यांत आलीं असून यांचा उपयोग विषेशत: आसपासच्या ग्रामीण विभागांतील लोकांना होत आहे. आणि लवकरच प्रत्येक विकास गटांत प्रत्येकी एक स्वास्थ्य केंद्र दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत उघडण्यात येणार आहे. ह्या स्वास्थ्य केंद्रांत एक मेडीकल ऑफीसर, चार मिडवाईफ, एक हेल्थ व्हिजीटर, एक स्वास्थ्य निरीक्षक, एक दाई व ७ चपरासी नियुक्त केलेले असतात. ह्या केंद्राच्या अंतर्गत येणाऱ्या भागांतील लोकांच्या स्वास्थ्य रक्षणाचे काम तीन उपकेंद्रांतून केलें जातें. प्रत्येक प्राथमिक केंद्राच्या अंतर्गत जास्तीत जास्त ६०,००० लोकवस्तीच्या भागाचा समावेश केलेला असतो. प्रत्येक केंद्रामागें जवळजवळ ४८,००० रुपये खर्च करावे लागतात. क्षयरोग निवारणार्थ बी.सी.जी. टीकेचा उपयोग करण्यांत आला आहे. ह्याकरितां निरनिराळीं पथकें सबंध जिल्ह्यांत क्षयरोगास प्रतिबंधक उपाययोजना करण्याकरितां फिरत असतात. स्वच्छ पाण्याची सोय करण्याकरीतां ठिकठिकाणीं विहीरी खोदण्यांत आल्या. तसेंच पाणी स्वच्छ राहावे म्हणून औषध विहिरीमध्ये टाकण्यांत येतें.

प्राथमिक स्वास्थ्य केंद्र

कुटुंब नियोजन

जिल्हा विकास समितीनें आपल्या बैठकींत एका ठरावाद्वारे भंडारा गोंदिया, तुमसर या गांवांमध्यें तेथील नगरपालीकेनें प्रत्येकी एक एक कुटुंब नियोजन केंद्र सुरू केलें.

मलेरिया निर्मूलन

भारताच्या सार्वजनिक आरोग्य क्षेत्रांतील सर्वांत मोठा शत्रु म्हणून गाजलेल्या मलेरिया रोगाचे नियंत्रण करण्यासाठीं अखिल भारतानें मलेरिया प्रतिबंधक योजना १९५३ साली हातीं घेतली आणि त्याच योजनेच्या अंतर्गत राज्यसरकारच्या आदेशानुसार भंडारा जिल्ह्यांत ह्या कार्यालयाची स्थापना करण्यांत आली.

१९५६ साली संपूर्ण जिल्ह्यांत नियंत्रणाचें काम पूर्ण जोरानें सुरू होऊन जिल्ह्यांतील प्रत्येक गांवांतील एकूण एक घर, झोपडी, गोठा आदि सर्व ठिकाणीं मलेरियाच्या प्रसरणकालात (मलेरिया ट्रेन्स मिशन सीजन) म्हणजे साधारणपणे जून ते ऑक्टोबर या अवधीत दर वर्षी दोनदा डी.डी.टी. फवारून मलेरियाचा प्रसार करणाऱ्या एनाफिलीस जातीच्या डांसांचा नायनाट करण्यात येतो. या रोगाशी १९५६ पासून सतत झुंज घेऊन या कार्यालयाने जिल्ह्यांत यशस्वी नियंत्रण केलेले आहे.

याच अवधीत मलेरियाचा प्रादुर्भाव व नियंत्रण योजनेचे परिणाम यांचा आढावा घेण्यासाठीं ठरविण्यांत आलेल्या मापण पद्धतीनुसार केलेल्या मोजमापाचे बोलके आंकडे १९५८ पर्यंतच्या आपल्या जिल्ह्यांतील मलेरियाचे यशस्वी नियंत्रणाचे चित्र डोळ्यासमोर उभे करून त्या योजनेच्या सफलतेची साक्ष पटवून देतात.

१९५६ सालीं जिल्ह्यांतील दवाखान्यातून औषधोपचार घेतलेल्या एकूण रोग्यांपैकी मलेरिया रोग्याचें प्रमाण शेकडा ७.३ होतें, तसेंच १९५८ साली ३.७८ झालेलें आढळलें, मलेरियानें पछाडलेल्या २ ते १० वर्षे वयांच्या मुलांची पानथरी वाजवीपेक्षां जास्त वाढत असल्याने मलेरियाच्या प्र दुर्भावाच्या मापन पद्धतींत २ ते १० वर्षे वयांच्या पानथरी मापनास विषेश महत्त्व आहे. नियंत्रण योजनेपूर्वी आपल्या जिल्ह्यांतील एकूण तपासलेल्या मुलांपैकी शेकडा ३० मुलांची पानथरी वाढलेली आढळली. याच वयोमानाच्या मुलांची रक्ततपासणी केली असतांना नियंत्रणापूर्वी शेंकडा २१ मुलांच्या रक्तांत मलेरियाचे जंतु आढळून आले होते. नियंत्रणानंतर म्हणजे १९५८ साली रक्तांत मलेरियाचे जंतु शेंकडा ०.७ आढळले.

१२ महिन्यांखालील वयाच्या बालकांच्या रक्ततपासणीवरून चालू वर्षांत मलेरियाचा किती प्रसार झाला याचा अंदाज करतां येत असल्यानें ती तपासणी दर वर्षी करण्यांत येते. नियंत्रणापूर्वी शेकडा १.५ बालकांच्या रक्तांत मलेरियाचे जंतु आढळले होते. पण १९५८ सालीं मात्र एक वर्षाच्या आंतील एकाहि बालकाच्या रक्तांत मलेरियाचे जंतु सांपडू शकले नाहींत.

आपल्या देशांतील एनॉफिलीस डासात जंतुनाशकांचा प्रतिकार करण्याची शक्ति निर्माण होण्यापूर्वीच आपल्या देशांतून मलेरियाचें संपूर्ण उच्चाटन करण्याचें कार्य भारत सरकारनें १९५८ मध्ये राष्ट्रीय मलेरिया निर्मूलन योजनेंचे कार्य हाती घेतलें. मलेरियाचे उच्चाटण (निर्मूलन) हा १९५८ सालापासून पुढील ६ वर्षाचा २ टप्प्याचा कार्यक्रम आहे.

निर्मूलन योजनेच्या पहिल्या टप्प्याचे म्हणजे मलेरियाचा प्रसार करणाऱ्या एनॉफेलीस डासांवरील जोरदार हल्ल्याचे (अटॅक-फेज) हें शेवटचे वर्ष आहे. जिल्हयांतील प्रत्येक गावांतील एकूण एक घर, झोपडी व कोठा यांत चांगल्याप्रकारे डी.डी.टी. फवारल्या जात आहे एकहि घर राहू नये हें मुख्य ध्येय. यासाठी डी.डी.टी. फवाऱ्याचें महत्त्व संपूर्ण जनतेस समजावून सांगण्याच्या हेतूनें १९५९ पासून जिल्हा कार्यालयातर्फे योजनाबद्ध कार्यक्रम आखण्यांत आला. १९५९ आणि १९६० साली देखील ह्या कार्यालयाच्या अधिकारी वर्गानें आणि कर्मचाऱ्यांनीं बऱ्याच गांवामध्यें बैठकी घेऊन, पत्रकें वाटून व याशिवाय जिल्हा समाज सेवा कार्यालय, जिल्हा प्रसिद्धि कार्यालय यांच्या सहकार्यानें बऱ्याच गांवामधून मलेरियाविषयक सिनेमा दाखवून जास्तीत जास्त जनतेस निर्मूलन योजनेची माहिती दिली व तिच्या यशस्वीतेकरितां जनतेकडून सहकार्य अपेक्षित आहे हें समजावून सांगितलें. याशिवाय १९६० सालीं जागतिक आरोग्य दिनाच्या दिवशी जागतिक आरोग्य संघटनेच्या आदेशानुसार संपूर्ण देशाबरोबरच याहि जिल्हयांत ७ एप्रिल १९६० रोजीं मलेरिया कर्मचाऱ्याच्या जोडीलाच विकास कर्मचाऱ्यांनीं आपआपल्या विभागांतील प्रतिष्ठित नागरिकांच्या मार्गदर्शनाखाली सभा घेऊन वरील प्रकारची माहिती जनतेस करून दिली.

या सर्व गोष्टींचा परिणाम जिल्हयांतील जवळजवळ १०० टक्के घरें, झोपड्या, गोठे, डी.डी.टी. नें फवारून घेण्याऱ्या जागृत जनतेच्या मनोवृत्तीवरूनच दिसून आला. घरमालकांनीं नाकारल्यामुळें डी.डी.टी. न फवारतां राहलेल्या घरांचें प्रमाण १९५७ साली प्रथम फवारण्याचे वेळीं शेकडा ८.४ व दुसऱ्या फवारण्याच्या वेळी ४.९ होते. तेंच १९५९ साली शेकडा ३.०७ इतकेच राहिले. इतकेच नव्हे तर १९६० च्या प्रथम फवारण्याच्यां वेळी तेंच प्रमाण शेकडा केवळ १.५ आढळून आलें. या यशाच्या श्रेयाचा बराच वांटा ह्या जिल्हयांतील जनतेच्या सक्रिय सहकार्यालाच द्यावा लागेल. जिल्हयांतील जनतेचें सहकार्य असेच अनुकूल राहिले तर मलेरिया निर्मूलन योजनेचा दुसरा प्रत्यक्ष देखरेखीचा टप्पाहि आपण यशस्वी रीत्या गाठूं अशी खात्री वाटतें.

महाराष्ट्र प्रकाशक संस्था
[illegible] पो. [illegible]
[illegible] चौक, पुणे-४११ ०[illegible]

१२ : आंकडेशास्त्र

कोणत्याहि योजनेचा मूलभूत पाया म्हणजे ह्या विषयासंबंधीचे आंकडे हे होत. एखादी योजना आखतांना सर्वप्रथम त्या विषयावरील पूर्ण माहिती असणें अत्यावश्यक आहे. अशा मूलभूत आंकडया-शिवाय केलेली योजना म्हणज पायाशिवाय बांधलेली इमारतच होय. ह्या दृष्टिकोनांतून पाहिलें असतां आंकडेशास्त्राचें महत्त्व वेगळे प्रतिपादन करण्याची आवश्यकता नाहीं.

१९४५ मध्ये झालेल्या आंतरविभागीय समितीच्या शिफारसीनुसार अर्थशास्त्र व आंकडेशास्त्र समिती नमण्यांत आली. ह्या समितीचें कार्य, संघटित सहकार्य निर्माण करणें, आंकडे गोळा करणें, प्रशिक्षण, पुनर्शोधन करण व तांत्रिक मार्गदर्शन करणें हें आहे. संख्या गोळा करणें, त्यांच्यांतील संदिग्धता नाहीशी करणें व संज्ञा (डेफिनिशन्स) व प्रामाण्य (स्टँडर्ड) याच्यांत कांटेकोरपणा निर्माण करणें हीं कार्ये करणारी अशी ही एकच संस्था आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ह्या संस्थेच्या शाखा प्रत्येक जिल्ह्यांत उघडण्याची एक योजना आखण्यांत आली व त्या योजनेनुसार भंडारा जिल्हयांत एक जिल्हा आंकडेशास्त्र कचेरी मागील वर्षी (१९५९) डिसेंबर महिन्यांत उघडण्यांत आली. जिल्हा आंकडेशास्त्र अधिकारी आपल्या सहकाऱ्यांच्या साहाय्यानें पुढील प्रकारचीं कामें करतो:—

जिल्हा आंकडेशास्त्रीय वेचा व जिल्हयाच्या सामाजिक व आर्थिक परस्थितीचा गोषवारा (डिस्ट्रिक्ट स्टॅटीस्टीकल ॲब्स्ट्रक्ट ॲन्ड सोसीओ-एकॉनामिक रिव्हयू).—जिल्हयांतील प्रत्येक जिल्हा कार्यलयांतून गोळा होणारी महत्त्वाची माहिती ही तालुकानिहाय संकलीत करण्यांत येऊन एक जिल्हा आंकडे-शास्त्रीय वेचा तयार करण्यांत येतो. ह्या वेच्याच्या अनुषंगाने जिल्हयांतील सामाजिक व आर्थिक परिस्थितींत झालेल्या बदलांचा आढावा देणारा एक गोषवारा तयार करण्यांत येतो.

दुसरी पंचवार्षिक योजना.—जिल्हयांतील निरनिराळ्या खात्याचे अधिकारी ज्या पंचवार्षीय योजना भंडारा जिल्हयांत कार्यान्वित करीत आहेत त्यांच्या प्रगतीचा आढावा दर त्रैमासिकांत जिल्हाधिकाऱ्यांनीं घ्यावयाचा आहे. ह्या कामीं जिल्हा आंकडेशास्त्र अधिकारी जिल्हाधिकाऱ्याला ती माहिती संकलीत करण्यास मदत करतो. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा करतांना जिल्हा आंकडशास्त्र अधिकाऱ्याची जिल्हाधिकाऱ्याला मदत झालेली आहे.

जिल्हा आंकडेशास्त्र अधिकारी हा एक तांत्रिक अधिकारी म्हणून समजण्यांत येतो. १९६१ सालीं होणाऱ्या दसवर्षीय शिरगणतीबद्दल जिल्हा आंकडेशास्त्र अधिकारी जिल्हा शिरगणती अधिकाऱ्याला तांत्रिक बाबतींत मदत करीत आहे व त्या कार्यात त्याच्याकडे नेमून दिलेलें कार्य करीत आहे.

प्रत्येक विकास गटांत ह्या प्रांतातील अर्थशास्त्र व आंकडेशास्त्र समितीतर्फे एक सांख्यिकी साहाय्यक नेमण्यांत आला असून त्यावर जिल्हा आंकडेशास्त्र अधिकारी तांत्रिक देखरेख ठेवतो.

ह्या सर्व कार्यामुळें जिल्हयांत आंकडेशास्त्राबद्दल अचूकपणा व वक्तशीरपणा निर्माण होण्यास मदत झाली आहे.

जिल्हयांतील वृत्तपत्र

भंडारा जिल्हयांतून सध्या एकच वृत्तपत्र निघतें. हे वृत्तपत्र मराठींतून दर आठवडयाला सोमवारी भंडाऱ्यांत प्रसिध्द होत असते. लोकवाणी साप्ताहिकाचे संपादक श्री. अ. र. पंडितराव आहेत. हें पत्र मागील ११ वर्षापासून नियमितपणे निघत आहे. त्याचा खप ८०० ते ९०० पर्यंत आहे. मुख्यत: जिल्हापत्रक म्हणून ह्या वर्तमानपत्रांत जिल्हयाच्या निरनिराळ्या विकासाच्या घडामोडी व इतर बातम्या येत असतात. ह्या जिल्हयामध्यें निरनिराळ्या वर्तमानपत्राचे वार्ताहर एकंदर ३० च्या जवळपास आहेत.

भंडारा जिल्हा दारुबंदी नसलेला भाग म्हणून ओळखला जात होता हें जरी खरें असलें तरी ह्या जिल्ह्यांतहि सरकारच्या दारूबंदी धोरणाला अनुसरून क्रमाक्रमाने दारूबंदी करण्याचे ठरविण्यांत आलें. दारूबंदी ही एक सामाजिक सुधारणा आहे व तिची अंमलबजावणी करण्यासाठीं मुंबई सरकारनें विशेष प्रयत्न केले आहेत. आणि राज्यांत एप्रिल १९५९ पासून संपूर्ण नशाबंदी करण्याचें धोरण अमलांत आणलें आहे. आपल्या जिल्ह्यामध्यें १ एप्रिलपासून संपूर्ण दारुबंदी झालेली आहे. तत्पूर्वीची परिस्थिति लक्षांत घेणें जरुरीचे आहे. १९५७-५८ मध्यें ह्या जिल्ह्यांत मद्याची ३९ व ताडीची ४ दुकानें होतीं. १ एप्रिल १९५८ पासून त्या दुकानांची संख्या १५ व १ अशी १६ दुकानें कमी करण्यांत आली आहेत म्हणजे सर्व जिल्ह्यांत मद्याची २४ दुकानें व ताडीची ३ दुकानें राहिलीं होती ; ती १ एप्रिल १९५९ पासून बंद करण्यांत आलेलीं आहेत. आणि आतां संपूर्ण जिल्हयात नशाबंदी झालेली आहे असे जाहीर करण्यांत आले आहे. आतां गुन्हेगारास कडक शिक्षा करण्यांत येईल. संपूर्ण नशाबंदीकरितां वातावरण निर्माण करण्याकरितां नुकतेच नशाबंदी अधिकारी ह्या जिल्ह्यांत नेमण्यांत आले असून चलचित्रपट गाडीद्वारा प्रचाराचें कार्य जोरांत सुरू झालेलें आहे. ह्या गाडीद्वारे दारूचे दुष्परिणाम व त्यापासून होणारे नुकसान हे जनतेस दारूबंदीचे महत्त्व पटवून दिलें जातें आणि ह्या कामांत जनतेचे साहाय्य मिळविण्यास येतें.

दारूबंदी

करमणुकीच्या जास्तीत जास्त सोयी उपलब्ध करण्याच्या दृष्टीनें भंडारा जिल्ह्यांत दोन संस्कार केंद्रें स्थापण्यांत आलीत, त्यापैकी एक लाखनीला व दुसरें अडयाळला सुरू करण्यांत आलें. ह्या केंद्रांत देशी खेळ, व्हालीबॉल, क्यारम् इत्यादि खेळ लोक येऊन खेळतात. तसेच नाटकें, भजनें, कीर्तनें, पोवाडे वगैरे सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे स्थानिक कलांचा विकास करण्यास प्रोत्साहन देण्यांत येते.

बेकारीनिवारण (एम्प्लॉयमेंट)

ह्या जिल्ह्यांत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनुसार एक जिल्हा एम्प्लॉयमेंट कचेरी उघडण्यांत आली. ह्या खात्यातर्फे नौकरी नसलेल्या व ज्यांना नौकरीची आवश्यकता आहे अशा लोकांची नोंद करण्यांत येते व त्यांच्या शैक्षणिक लायकीनुसार नौकरी मिळवून देण्याची खटपट करण्यांत येते. तसेंच ज्या कचेऱ्यांतून जागा रिकाम्या आहेत त्यांची माहितीसुद्धा कचेरीला देण्यांत येते व अशा रीतीनें बेकारी निवारण्यासाठीं प्रयत्न करण्यांत येतो.

सन् १९५९-६० मध्ये एकंदर ५,७७९ लोकांची नोंद करण्यांत आली व जिल्ह्यातील सर्व सरकारी व खाजगी कचेऱ्यांतून १९० रिकाम्या जागा भरावयाच्या असल्याबद्दल माहिती देण्यांत आली. ह्या वर्षी ५६७ लोकांना निरनिराळ्या कचेऱ्यांतून नोकऱ्या लावून देण्यांत आल्या. सध्या नोकरीची जरूरी असलेल्या २,९२५ लोकांचीं नांवें ह्या कचेरीच्या नोंदणी खात्यावर नोंदलेलीं आहेत.

१३ : समाज कल्याण

समाज कल्याण विभागाद्वारे ज्या योजना कार्यान्वित होतात त्याचें स्वरूप मुख्यतः खालीलप्रमाणें आहे—

(अ) मागासलेल्या जातींचा विकास—शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक.
(ब) अस्पृष्यता-निवारण कार्य.
(क) स्त्रियां व मुलांचें कल्याण.
(ड) शारीरिक कल्याण कार्य.

मागासलेल्या जातींचा विकास.—भंडारा जिल्हयांत ज्या मागासलेल्या जाती व जमाती आहेत त्यांत प्रामुख्यानें अस्पृश्य, आदिवासी जाती व जमातींचा समावेश होतो. या जाती व जमातीच्या सर्वांगीण विकासासाठीं राज्य सरकारनें ज्या योजना आखल्या आहेत व ज्या प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यात येत आहेत त्यांचा आढावा खाली दिला आहे :—

अस्पृश्य व आदिवासी जातींच्या सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना शिक्षण मोफत मिळूं शकेल अशी तरतूद करण्यांत आली आहे. त्यानुसार या विद्यार्थ्यांची शालेय फी (प्रवेश फी व शालेय इतर फी) परीक्षेसाठी आकारण्यांत आलेली फी सर्व शैक्षणिक संस्थांना शासनाकडून दिली जातें. त्याशिवाय अस्पृश्य व आदिवासी हुशार, होतकरू व गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीहि दिली जाते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनाकाळांत समाज सेवा विभाग, भंडारा जिल्हा, यांचें मार्फत झालेला खर्च व त्याद्वारें किती विद्यार्थ्यांनीं या सवलतींचा फायदा घेतला त्याची माहिती येणेप्रमाणें—

शिक्षण

शालेय फी	अस्पृश्य विद्यार्थ्यां-करितां	आदिवासी विद्यार्थ्यांकरितां (१९५९-६० व १९६०-६१)
	रुपये	रुपये
शालेय फी आणि परीक्षा फी ...	३,३६२	१,१२८
शिष्यवृत्ति	६००	७००

त्याशिवाय सरकारनें घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णयानुसार ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचें, वडिलांचें वार्षिक उत्पन्न १,२०० रुपयांवर नसेल अशा विद्यार्थ्यांना सर्व स्तरावरील शिक्षण मोफत दिलें जातें. त्यावर भंडारा जिल्हयांत जो खर्च झाला आहे व ज्या विद्यार्थ्यांनीं या योजनेचा फायदा घेतला आहे त्याची माहिती खाली दिली आहे—

वरील योजनेचा किती विद्यार्थ्यांनीं फायदा घेतला	यावर शासनानें किती खर्च केला (१९५९-६० व १९६०-६१)
	रुपये
३,०६७	२,३०,४१,४७६

महाराष्ट्र राज्य शासनानें नुकताच अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ज्या अस्पृश्यांनीं बौद्ध धर्माची दीक्षा घेतली आहे, अशांच्या मुलांना अस्पृश्याप्रमाणेंच सर्व शैक्षणिक व आर्थिक स्वरूपाच्या सवलती दिनांक १ मे १९५९ पासून देण्यांत येत आहे

मागासलेल्या जातींची एकूण १३ वसतिगृहें या जिल्ह्यांत कार्य करीत आहेत. १३ वसतिगृहांपैकीं ९ वसतीगृहें अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठीं व ४ वसतीगृहें आदिवांसी विद्यार्थ्यांसाठी आहेत. भंडारा जिल्ह्यांतील अशा वसतिगृहांतील किती विद्यार्थ्यांच्या संख्यावर किती अनुदान मिळाले, खालील आंकड्यावरून दिसून येईल—

मागासलेल्या जातीचे वसतीगृहांना अनुदान

मान्यता प्राप्त झालेली एकूण वसतिगृहें			अनुदान मिळण्यास मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांचीं संख्या	द्वितीय पंचवर्षिक योजना-काळांत शासनाकडून मिळालेलें अनुदान
				रुपये
(१) अस्पृश्य विद्यार्थ्यांचीं वसतिगृहें—९	...	...	८३२	१,१८,७७१
(२) आदिवासी विद्यार्थ्यांचीं वसतिगृहें—४	...	...	३१२	४१,३९,८५६

लाखणी येथे हरिजन व सवर्ण हिंदु व इतर जातींचे बालकाकरितां शासनांद्वारें ब्रलवाडी १९५८-५९ पासून सुरू करण्यांत आलीं आहेत. या बालवाडींतील शिक्षण मॉंटेसरी पद्धतीनुसार दिलें जातें व बालमनांवर चांगले संस्कार घडविण्याचे प्रयत्न केले जातात. या बालवाडींत १९५८-५९ पासून असलेल्या बालकांची संख्या व त्यावर आलेला खर्च खाली दिला आहे :—

बालवाडी.

वर्ष				बालकांची संख्या	खर्च
					रुपये
१९५८-५९	...	...	...	५०	२,०००
१९५९-६०	...	...	...	४५	२,०००
१९६०-६१ जुलैपर्यंत		...	...	४५	७५०

अस्पृश्यता निवारणाच्या कार्यास खेडे विभागांतील स्त्रियांपासून चालना मिळावी या उद्देशाने वर्ठी येथील नवप्रभात शिक्षण संस्थेनें चालविलेल्या स्त्रियांच्या संस्कार केंद्रास १९५९-६० सालीं समाज सेवा विभागाकडून रुपये २,१६२ अनुदान देण्यांत आले आहे.

अस्पृश्यांच्या आर्थिक विकासाचें दृष्टीनें खालील योजनां आखण्यांत आल्या आहेत. त्यापैकीं बहुतेक योजना १९५८-५९ व १९५९-६० पासून प्रथमच विदर्भ विभागांत लागू करण्यांत आल्या आहेत :—

घरगुती उद्योगधंदे चालविण्यास किंवा नवीन सुरूं करण्यास आर्थिक साहाय्य.—या योजनेनुसार १९५९-६० यावर्षी व १९६०-६१ मध्यें (जुलैपर्यंत) एकूण २५ अस्पृश्य इसमांना मदत देण्यांत आली, त्यावर झालेला खर्च असा—

अस्पृश्यासाठीं					रुपये
कर्ज ...	...	...	...		८,०३१
अनुदान	...	...	...	...	२,६७७
			एकूण	...	१०,७०८

(२) **दुभाळू गाई, म्हशी विकत घेण्यास साहाय्य.**—या योजनेद्वारें १९५९-६० या वर्षी व १९६०-६१ (जुलैपर्यंत) मध्यें एकूण ११ अस्पृश्य इसमांना खाली दिल्याप्रमाणें आर्थिक मदत देण्यांत आली :—

अस्पृश्यासाठीं		रुपये
कर्ज	... ...	१,५३३
अनुदान	... ...	१,५३३
	एकूण ...	३,०६६

आदिवासींच्या आर्थिक विकासासाठीं योजना १९६०-६१ वर्षापासूनच सुरू करण्यांत आल्या आहेत. खालील योजनांवर जुलै १९६० पर्यंत झालेला खर्च व मदत मिळणाऱ्या इसमांची संख्या खालीलप्रमाणें आहे :—

योजना	मदत मिळणाऱ्या इसमांची संख्या	अनुदानाची रक्कम
		रुपये
(१) आदिवासी इसमांना कोंबडया व शेळ्या विकत घेण्यास मदत	२५	५००
(२) आदिवासीनां शेतकी कामांत बैलजोडया विकत घेण्यास मदत	५	१,५००
(३) आदिवासी कास्तकारांना बीं-बियाणें घेण्यास मदत ...	२२	७००
(४) आदिवासी कास्तकारांना शेतकी अवजारें विकत घेण्यास मदत	४५	७००
(५) आदिवासींना दुभाळू गाई व म्हशी घेण्यास मदत (अनुदान रु. ९००.०० व कर्ज रु. ९००.००).	६	१,८००
(६) आदिवासींना घरगुती उद्योगधंद्यासाठीं मदत (कर्ज रु. १,१२५ व अनुदान रु. ३७५).	५	१,५००

घरें व आरोग्यविषयक इतर योजना

नवीन घरें बांधणें.—केन्द्र सरकारच्या व राज्यसरकारच्या मदतीनें अस्पृश्यासाठीं नवीन घरें बांधण्याची योजना १९५८ पासून भंडारा जिल्ह्यात समाज सेवा विभागाद्वारें कार्यान्वित करण्यांत आली आहे. त्यानुसार अस्पृश्यासाठीं ५९ घरें बांधण्यांत आलीं व त्यांवर ४४,२५०.०० रुपये खर्च करण्यांत आला; १९६० मध्यें एकूण ४४ घरें बांधण्यांत आलीं असून त्यावर ३३,०००.०० रुपये खर्च होणार आहेत.

विहिरी बांधणें.—१९५८-५९ व १९५९-६० या वर्षी अस्पृश्याच्या सोयीसाठीं एकूण १२ विहिरी बांधण्यांत आल्या असून त्यांवर २४,०००.०० रुपये खर्च झाला. १९६०-६१ मध्ये विहिरी बांधण्यांसाठीं १७,५००.०० रुपयांची तरतूद करण्यांत आली असून त्यांत १० विहिरी बांधण्यांत येतील.

पाऊस, वारा, पूर आदिपासून इमारतींना झालेल्या मोडतोडीस अस्पृश्य व आदिवासींना मदत:—अस्पृश्यासाठीं ही योजना १९५९-६० सालापासून व आदिवासीसाठीं १९६०-६१ पासून लागू करण्यांत आली. त्यावर झालेला खर्च असा :—

—	किती लोकांना मदत दिली	खर्च
		रुपये
अस्पृश्यांसाठीं	५६	५,४५८.००
आदिवासीसाठी (जुलैपर्यंत) ...	६	५८३.००

घरें बांधण्यास अस्पृश्यासाठीं खेडें विभागांत जागा विकत घेऊन देणें.--ही योजना १९५८ सालापासून विदर्भ विभागास लागू करण्यांत आली. १९५८-५९ व १९५९-६० या वर्षी भंडारा जिल्ह्यांत एकूण ५० प्लाट्स विकत घेण्यांत आले, त्यावर रुपये १०,१००.०० खर्च झाला. १९६०-६१ वर्षी एकूण रुपये ४,७००.०० ची तरतूद करण्यांत आली असून एकूण २४ प्लाट्स विकत घेण्यांत येतील.

नवीन वसाहती स्थापन करणें.--१९५९-६० या वर्षी गणेशपूर येथे २५ घराचे वसतीसाठी एकूण रुपये १८,६५०.०० मंजूर करण्यांत आले व त्यानुसार कामास सुरूवात झाली. १९६०-६१ या वर्षी पुन्हा २५ घरांचें वसतीसाठी रुपये १८,८८०.०० मंजूर करण्यांत आले आहेत.

अस्पृश्यता निवारण कार्य

सवर्ण हिंदु घरमालकानें हरिजनास घर किरायानें दिल्याबद्दल त्यांना शासनाकडून १९५९-६० मध्यें आठ घरमालकांना रुपये ४०० अनुदान देण्यांत आले. १९६०-६१ मध्यें यासाठी २०० रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

मुलें व स्त्रियांकरितां कल्याण कार्य

स्त्रियां व मुलाचें कल्याणकार्याचें स्वरूप व क्षेत्र असें आहे--

(१) अपंगासाठीं संस्था.

(२) अस्पृश्य निराधार परित्यक्ता इत्यादि स्त्रियांसाठी संस्था.

(३) स्त्रियां व मुलें यांच्या कल्याणासाठीं काम करण्याऱ्या संस्थाना आर्थिक मदत.

अपंग मुलांसाठीं संस्था.--भंडारा येथें शासनाकडून आंधळ्या मुलांची शाळा चालविण्यांत येते. या शाळेंत ३० मुलें असून त्यांच्या राहण्यावर, खाण्यापिण्यावर व इतर विकासासाठी शासनाकडून खर्च होतो. भंडारा येथें नुकतीच अंधविद्यालयासाठीं मोठी इमारतहि बांधण्यांत आली आहे. या शाळेंत नेवार विणणें, दोरीचें काम, संगीत व इतर शिक्षणाची सोय आहे.

अस्पृश्य निराधार परित्यक्ता इत्यादि स्त्रियांसाठीं संस्था.--अशा स्त्रियासाठीं भंडारा येथें १९५८-५९ पासून समाज कल्याण विभागाद्वारें आश्रयगृह चालविण्यांत येत आहे. या आश्रयगृहातील स्त्रियांना स्वतःच्या पायावर उभें राहण्यास पात्र करण्यासाठी धंदेशिक्षण दिलें जाते. सध्या या आश्रयगृहांत २१ स्त्रियां व १५ मुलांची सोय आहे.

स्त्रियां व मुलाकरितां असलेल्या संस्थांना समाज कल्याण विभागाकडून अनुदान दिलें जातें. द्वितीय पंचवार्षिक योजनाकाळांत एकूण ३ संस्थांना ५,५००.०० रुपये अनुदान मिळालें आहे.

शारीरिक कल्याण कार्य.--खेडे विभाग व शहर विभागांतील प्रौढांत व्यायामासंबंधी आवड निमार्ण करावी या दृष्टीनें समाज कल्याण विभागाकडून भंडारा जिल्ह्यांत कांही योजना कार्यान्वित केल्या जातात. त्यानुसार ग्रामपंचायतीला आखाडा सुरू करण्यास ४३५.०० रुपये अनुदान दिलें जातें. द्वितीय पंचवार्षिक योजनाकाळांत ३५ ग्रामपंचायतींना एकूण १५,२२५.०० रुपये अनुदान दिलें गेलें. व ३५ आखाडे, खेडे विभागांत स्थापन करण्यांत आले.

नवीन आखाडे उघडण्यास अनुदान देण्यांत येणाऱ्या ग्रामपंचायतींना आखाड्यासाठी दरवर्षी ५०.०० रुपयांप्रमाणें नवीन साहित्य विकत घेण्यांस अनुदान दिलें जातें. द्वितीय पंचवार्षिक योजनाकाळांत ३० ग्रामपंचायतींना एकूण २,२५०.०० रुपये अनुदान दिलें गेलें.

शारीरिक कल्याण संस्थाना अनुदान.--शारीरिक कल्याणकार्य करणाऱ्या ५ संस्थांना द्वितीय पंचवार्षिक योजनाकाळात एकूण ४,८००.०० रुपये अनुदान देण्यांत आलें आहे.

१४ : प्रसिद्ध स्थळें

अडचाळ

भंडारा तहसिलींतील हे एक मोठे गांव असून शहराच्या दक्षिणेस १४ मैलांवर पौनी रोडवर वसलेलें आहे. या गांवांत श्री हनुमानाचें एक पुरातन मंदिर असून त्यांतील मूर्ति स्वयंभू आहे. कांहीं वर्षांपूर्वी या गांवांत इमारतीचा पाया खोदतांना जैन धर्मीय देवता पारीसनाथाची एक मूर्ति सांपडली होती. ह्या गांवांत गांडली जातीच्या लोकांची वस्ती मोठ्या प्रमांणात आहे. येथें पांच तलाव असून मराठी शाळा, पोष्ट ऑफिस व डाकबंगला आहे. रेशमी कपडा, बुरडीकामें येथें चांगली होतात. येथें मोठा आठवडी बाजार भरतो. येथील शेत-मजूर भात-शेती करण्यात पटाईत आहेत. भात पेरणीच्या वेळी ते दूर दूर ठिकाणी जातात. यांना रोवण्याच्या वेळी इतर ठिकाणी जास्त मजुरी मिळत असल्यामुळें हे सर्व मजूर लोक दुसरीकडे तुमसर, बालाघाट इत्यादि ठिकाणीं जातात.

आंबागडचा पहाड

आंबागडची श्रेणी म्हणजे सातपुड्याचे लहान लहान फाटे होत. डोंगरावरील उंचवट्यावर आंबागडचा जुना किल्ला आहे. वैनगंगा, बावनथडी नद्यांच्या संगमाजवळ या डोंगराच्या भागावर चांदपूर गांव व तेथील मोडकळीस आलेला किल्ला आहे. या डोंगराची उंची फार नाहीं परंतु त्यावरील नैसर्गिक देखावा उत्तम आहे. याच डोंगराच्या पश्चिमेकडील टोकावर नागपूर जिल्ह्यांतील रामटेकडी व रामटेकचीं प्रसिद्ध देवळें आहेत. आंबागड गांव भंडाऱ्यापासून १८ मैलांवर आहे. बख्तबुलंद नांवाच्या गोंड राजाच्या वेळीं त्याच्या पठाण सुभेदाराने आंबागडचा किल्ला इ. स. १७०० च्या सुमारास बांधला. भोसल्याच्या वेळी हा किल्ला तुरुंगाप्रमाणें उपयोगांत आणला जात असे. आंबागडच्या किल्ल्यांत व गावांच्या आसपास बरीच आंब्याचीं झाडें होतीं म्हणून त्यास आंबागड असें नांव पडलें असावें.

आमगांव

आमगांवच्या जमीनदारीचें सदर ठिकाण राहिलेले हे गांव भंडाऱ्यापासून सुमारे ६० मैलांवर वायव्य दिशेस गोंदिया तहसिलींत आहे. या गांवांपासून बाघ नदी दोन मैलांवर आहे. येथे सध्या मोठी पाटबंधाऱ्याची योजना सुरू आहे. बाघ नदीचें पाणी अडवून सिंचाई करण्याकरितां पाण्याचा उपयोग करण्यात येणार आहे. आमगांवपासून जवळ असलेल्या पदमपूर गांवीं मोठमोठ्या दगडी इमारतीचे काहीं भाग आहेत. आमगांवचा गुरांचा बाजार प्रसिद्ध आहे. येथें लांबलांबची गुरें, ढोरें विक्रीकरितां येतात.

आमगांव येथें नोव्हेम्बर, डिसेंबर महिन्यांत एक यात्रा भरत असते. येथें एक पाटबंधाऱ्याचा मोठा तलाव पहिल्या योजनेंत पूर्ण झालेला आहे. पोष्ट ऑफिस, शाळा, डाकबंगला इत्यादि सोयी ह्या ठिकाणीं उपलब्ध आहेत.

आंधळगांव

आंधळगांव, भंडारा तहसिलींत उत्तरेस १६ मैलांवर आहे. येथील रेशमी काठाच्या साड्या (लुगडी) फार प्रसिद्ध आहेत. बाजार दर आठवडी भरतो.

भंडारा

भंडारा शहरांत जुनीं देवळें पुष्कळ ठिकाणीं आहेत. मेंढा नांवाच्या वार्डांत मारोती व गणपती यांच्या दोन मोठ्या मूर्ती आहेत. भंडाऱ्याजवळ पिंगलाई नावांच्या गांवांत पिंगलाई देवीचें हेमाडपंथी देऊळ आहे. इ. स. १८२० पासून भंडारा हे जिल्ह्याचें सदर ठिकाण करण्यांत आलें. त्यापूर्वी येथील व्यवस्था लांजीवरून होत होती. भंडारा शहरांतून पितळेची भांडी विषेश करून गुंड व गंज चांगली तयार होतात. ह्यांचे अनेक कारखाने गांवांत आहेत.

बोंडगांव

हे गाव साकोली तहसिलींत साकोलीपासून १३ मैलांवर आहे. येथून चुळबन्न नदी जवळ आहे. येथे देवीचें मंदिर असून दर वर्षी चैत्र महिन्यांत देवीची मोठी यात्रा भरते.

चांदपूर

भंडारा तहसिलींत जिल्ह्याच्या ठिकाणापासून २८ मैलांवर असलेला गांव. येथें पूर्वी कमाविसदाराचे सदर ठिकाण होते. गांवांत जुना किल्ला बांधलेला आहे. येथे गवळी लोक पुष्कळ राहत होते. चांदपूर येथें मँगनिजच्या खदानी व एक सरकारी तलाव आहे. ह्या तलावाच्या आसपास असलेली सृष्टिशोभा पाहण्यासारखी आहे.

दरेकसा

गोंदिया तहसिलींत एक लहान जंगली गांव आहे. दरेकसा रेल्वे स्टेशन भंडाऱ्यापासून ७३ मैलांवर आहे. दरेकसाजवळील चांदसुरज नावांच्या पहाडावर एक आश्चर्यकारक गुहा आहे. त्यास कजागड किंवा लोखंडी किल्ला असे म्हणतात.

ढिवरा

वैनगंगेच्या कांठीं गोंदिया तहसिलींत असलेले हें गांव. येथील वैनगंगेच्या तीरावर नरसिंहाचे देऊळ आहे. येथें दर कार्तिक महिन्यांत यात्रा भरते.

गायमुख

हें भंडारा तहसिलींतील लहानसें गांव आहे. तें भंडाऱ्यापासून उत्तरेस २० मैलावर असून आंबागडपासून २ मैलांवर आहे. पहाडांतील पाण्याचा झरा येथें निघाल्यामुळें या गांवास गायमुख हें नांव पडलें. दर शिवरात्रीस येथें मोठी यात्रा भरत असते व ती १५ दिवस राहते. दूरदूरचे लोक ह्या ठिकाणीं महादेवाच्या यात्रेला येतात.

कर्डी

कर्डी हें गांव भंडारा तहसिलींत असून येथें सुती कापड व काचेच्या बांगड्या तयार होतात.

काटी

काटी हें गांव गोंदिया तहसिलींत असून गोंदिया-जबलपूर रेल्वे लाईनवर बिरसोला नांवाचे स्टेशन ह्या गांवाच्या हद्दीत आहे. येथें दर आठवड्याला गुरांचा मोठा बाजार भरतो.

लाखनी

हें गांव साकोली तहसिलींत भंडाऱ्यापासून १५ मैलांवर आहे. तें धानाच्या व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. आसपासचें धान येथें गोळा करण्यांत येतें व विक्रीकरितां माल बाहेर गांवीं पाठविलें जातो. येथें आठवडी बाजार भरत असून धानाची मोठी व्यापारपेठ आहे.

नवेगांव बांध

हा साकोली तहसिलींत असून येथें भंडारा जिल्ह्यांतील प्रसिद्ध असा सर्वांत मोठा तलाव आहे. तलावाच्या सभोवती आठ टेकड्या आहेत. हा तलाव कोठू पाटलाने बांधला असून त्याच्याच मालकीचा होता. तलावाच्या पाळीवर एक मारुतीचें देऊळ आहे व मध्यभागी मालडोंगरी नांवाचें बेट आहे. गांवांत एक दगडी खांब आहे. त्यास बालाजीचा खांब असेहि म्हणतात. ह्या खांबावर देवाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. हा तलाव सध्या सरकारच्या ताब्यांत असून पाटबंधाऱ्याची सोय करण्यांत आली आहे.

सिवनी बांध

हा साकोलीपासून ६ मैलांवर असून येथील तलाव सिवनी बांध या नांवानें प्रसिद्ध आहे. सुमारे ३०० वर्षांपूर्वी हा तलाव दादू पाटील, कोहळी, याने बांधला होता. तलावाच्या तीन बाजूस टेकड्या आहेत. ह्या तलावांतून शेतीकरितां पाणी देण्यांत येते. हा तलाव सध्या सरकारच्या ताब्यांत असून याचें पाणी अडवून कालव्यांची सोय करण्यांत आलेली आहे.

जिल्ह्यांतील प्रमुख यात्रेचीं ठिकाणें

(१) भंडारा तहसील—चांदपुर (मारोतीची), गायमुख (महादेवाची), माडगी (नरसिंग देव), पौनी (मुरलीधर), अड्याळ (घोड्याची), आंभोरा (शंभूची). अंभोरा हे तीर्थक्षेत्र भंडारा व नागपूर जिल्ह्याच्या सीमेवर आहे.

(२) गोंदिया तहसील—आमगांव, सुकळी (भूतांची).

(३) साकोली तहसील—प्रतापगड (महादेवाची), बोंडगांव (देवीची), कुंभली (दुर्गामाईची).

गायमुख (आंबागडजवळ).— भंडारा तालुक्यांतील ह्या गांवीं महादेवाची मोठी यात्रा भरतें. शिवरात्रीच्या वेळी ही यात्रा १५ दिवसपर्यंत चालते.

प्रतापगड.— यात्रा शिवरात्रीचें वेळीच भरते. डाकराम-सुकळी व बोंडगांव येथे चैत्रांत देवीची यात्रा भरतें. सुकळी यात्रेस हजारो भूतबाधेचे लोक (विशेषतः स्त्रिया) येतात, व बरे होऊन जातात. सुकळीच्या यात्रेंत महानुभाव पंथाच्या लोकांचा मोठा जमाव असतो. देवहाडा (देव्हाळा) आणि माडगी ह्या दोन गांवांतील वैनगंगा नदीच्या मध्यभागीं असलेल्या बेटावरील नरसिहांच्या देवळांत कार्तिक महिन्यांत १५ दिवसपर्यंत यात्रा भरते.

१९ः भंडारा जिल्हयाची आकडेवारी : सर्वसाधारण माहिती

सरासरी पाऊस	१,५९६ मिलीमिटर्स.
जास्तीत जास्त उष्णतामान	४५ सी.
कमीत कमी उष्णतामान	९.२ सी.
क्षेत्रफळ	३,६२३ वर्गमैल.
जंगलानें व्यापलेलें क्षेत्र	१,४५० वर्गमल.
लोकसंख्या १९६१ च्या शिरगणतीनुसार	१,२४८,५१९
लोकसंख्या १९५१च्या शिरगणतीनुसार	१,०७१,६५७
(१) पुरुष	५,३४,५८९
(२) स्त्रिया	५,३७,०६८
(३) खेडयांतील लोकसंख्या	९,७९,६९२
(४) शहरांतील लोकसंख्या	९१,९६५
(५) दर वर्ग मैलास	२८६
एकंदर खेडयांची संख्या	१,४९१
एकंदर शहरें	४
खेडयांतील सरासरी लोकसंख्या	७१९
खेडयांतील कुटुंबें	२२९,७७२
शहरांतील कुटुंबें	१९,५५६
लागवडीखालील क्षेत्र	१,२३६,४०१
पिकांचें क्षेत्र	९२७,१७२
प्रायमरी शाळांची संख्या	७६०
दुय्यम शाळा	४३
बेसीक शाळा	३
विद्यार्थ्यांची संख्या	८१,८६०
विद्यार्थिनींची संख्या	२५,५४६
मास्तरांची संख्या	३,४२६
इस्पीतळें	१७
खाटांची सोय	२५७
जन्म प्रमाण	२८.११
मृत्यु प्रमाण	२०.९०
पोस्ट ऑफिस	११
विकास गट	१३
प्रथमावस्था	६
द्वितियावस्था	३
पूर्वविस्तार गट	४
रेल्वेची लांबी	१८० मैल.
सडकांची लांबी	३२२.३१७ मैल.

१६ : कोणाकडे कशाची चौकशी करावी?

योजनेचें नांव	संबंधित अधिकारी
१. लागवडीकरितां जमीन, तगाई कर्ज, लोखंड, सिमेन्ट.	जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा विकास मंडळ, भंडारा व तहसिलीच्या पातळीवरील त्या त्या विभागांचे ग्रामसेवक, ग्रुप सेक्रेटरी, कृषि-साहाय्यक.
२. शेतीच्या सुधारलेल्या पद्धति, रासायनिक खतें, सुधारलेलीं बी-बियाणीं व अवजारें आणि कीटक नाशक औषधें व शेतीकरितां आर्थिक सवलती.	जिल्हा शेती अधिकारी, भंडारा. अथवा त्या त्या विभागाचे संवर्ग विकास अधिकारी, व ग्रामसेवक.
३. भात–शेतीच्या सुधारलेल्या पद्धति, बियाणें, अवजारें व खतांसंबंधी.	भात विशेषज्ञ, शेती संशोधन केंद्र, भंडारा (पॅडी पायलट विभाग, भंडारा), ग्रामसेवक व ॲग्रिकलचरल एक्स्टेन्शन ऑफिसर.
४. सुधारलेल्या जातींच्या फळझाडांची लागवड	शेतकी अधिकारी, भंडारा व संवर्ग विकास अधिकारी व ग्रामसेवक.
५. शेतकी शिक्षणक्रम, शेतकी शाळेंत प्रवेश व त्या संबंधीची माहिती.	जिल्हा शेतकी अधिकारी, भंडारा.
६. पीक-स्पर्धा व प्रदर्शनें ...	जिल्हा विकास मंडळ, भंडारा.
७. जपानी भात शेती व त्या संबंधीची माहिती.	शेती अधिकारी (जपानी भात शेती पद्धति), भंडारा.
८. सहकारी संस्थांची स्थापना, कार्यपद्धति व सहकारी चळवळीसंबंधीची माहिती.	डेप्युटी रजिस्ट्रार, सहकारी संस्था, भंडारा, तहसिलीच्या पातळीवरील विकास योजना क्षेत्रांतील सहकारी खात्याचे अधिकारी.
९. शिक्षण संस्थांची स्थापना, कार्य आणि त्या संबंधीची माहिती.	जिल्हा शिक्षण अधिकारी, भंडारा.
१०. आर्थिक दृष्टीनें मागासलेल्या वर्गातील जनतेस मिळणाऱ्या शैक्षणिक सवलतीसंबंधी.	जिल्हा समाज कल्याण अधिकारी, भंडारा.
११. रस्ते, पूल आणि पाटबंधाऱ्यांचें बांधकाम, दुरुस्ती व तत्संबंधीची माहिती.	एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअर, सार्वजनिक बांधकाम खातें, भंडारा.

योजनेचें नांव	संबंधित अधिकारी
१२. ग्रामीण विभागांतील लहान उद्योगधंदे, त्यांना मिळणारें सरकारी साहाय्य व मार्गदर्शन आणि वैयक्तिक कलाकारास धंद्याकरितां मिळणाऱ्या साहाय्यासंबंधी माहिती.	डिस्ट्रिक्ट कॉटेज इंडस्ट्रिज ऑफिसर, भंडारा किंवा औद्योगिक निरीक्षक, भंडारा.
१३. जनावरांचें संगोपन, त्यांच्या रोगांवरील उपाय-योजना आणि कोंबडीपालन.	डिस्ट्रिक्ट व्हेटरनरी ऑफिसर, भंडारा व तहसिलींतील जनावरांच्या दवाखान्यांतील अधिकारी.
१४. प्रवासी लोकांची विश्राम स्थानें व त्यांत जागा राखून ठेवण्यासाठीं.	एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअर, सार्वजनिक बांधकाम खातें, भंडारा.
१५. ग्रामीण विभागांतील ग्रामपंचायती, सहकारी संस्थांतून सामुदायिक श्रवणासाठीं रेडिओ बसविणें व त्या संबंधीची माहिती.	टेक्निशिअन-इन-चार्ज, ग्रामीण रेडिओ विभाग, भंडारा.
१६. मत्स्यसंवर्धन संस्था, त्यांची कार्यपद्धति आणि त्यांस मिळणारें सरकारी साहाय्य व वैयक्तिक कोळयास मिळणारे साहाय्य, मार्गदर्शनासाठीं.	सुपरिंटेन्डेन्ट, मत्स्यसंवर्धन क्षेत्र विभाग, भंडारा.
१७. अस्पृश्य व मागासलेल्या वर्गांतील जनतेला मिळणाऱ्या सरकारी सवलती, साहाय्य व सुखसोयी यासंबंधीची माहिती.	जिल्हा समाज कल्याण अधिकारी, भंडारा.
१८. सार्वजनिक आरोग्य संवर्धन आणि उपचार व्यवस्था व सांथीचे रोग प्रतिबंधक उपाय योजनेसंबंधी.	जिल्हा आरोग्य अधिकारी, भंडारा.
१९. मलेरिया निर्मूलन व डी.डी.टी. फवारण्यासंबंधीं	मलेरिया ऑफिसर (मलेरिया निर्मूलन केंद्र), भंडारा.
२०. स्थानिक विकास कार्यक्रमांन्वयें विहिरी, तलाव, रस्ते, शाळागृहें, आदींच्या बांधकामासंबंधीं.	जिल्हा विकास मंडळ, भंडारा.
२१. विकास गट क्षेत्रांतील विकास कामें, त्याची कार्यपद्धति व त्यांस मिळणाऱ्या साहाय्यासंबंधीं.	संबंधीत संवर्ग विकास अधिकारी.
२२. महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळांतर्फे होणाऱ्या वीज-पुरवठा संबंधीच्या योजनेबद्दल माहिती.	साहाय्यक इंजिनिअर, महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळ, तुमसर.
२३. जिल्ह्यांतील पोलीस यंत्रणा व तत्संबंधीची माहिती.	जिल्हा पोलिस अधिक्षक, भंडारा.

योजनेचें नांव	संबंधित अधिकारी
२४. जंगलाचें संरक्षण व संवर्धन आणि तत्संबंधींचे नियम व माहिती.	डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर, भंडारा आणि गोंदिया.
२५. गांवांत डाकघर सुरू करणें, टपालाची व तारेची व्यवस्था करणें व त्यांच्या कार्याबद्दलची व खात्याबद्दलची माहिती मिळविणें.	सुपरिंटेन्डेन्ट, पोष्ट ऑफिसेस, मुंबई; व पी.एम.जी. पोष्ट ऑफिस, नागपूर पोष्ट ऑफिस.
२६. पी.टी.एस. व सी.पी.टी.एस. चे मार्ग, त्यांची कार्यपद्धति व तत्संबंधींची माहिती.	डिव्हिजनल मॅनेजर, प्रॉव्हीन्सीअल ट्रान्सपोर्ट व सेंन्ट्रल प्रॉव्हिन्सीअल ट्रान्सपोर्ट, नागपूर विभाग, नागपूर.
२७. हौशी प्रवाश्यांचीं आकर्षणें व तत्संबंधींची माहिती तसेंच जिल्ह्यांतील विविध विभागांच्या योजनांची माहिती व त्यासंबंधीची प्रगति.	जिल्हा प्रसिद्धि अधिकारी, भंडारा.
२८. ग्रामीण भागांत रस्ते, आरोग्य व पाणी पुरवण्यासंबंधी.	तहसिलीच्या पातळीवरील संबंधित जनपद सभा व ग्रामपंचायत.
२९. नोकरी मिळविणाऱ्यांच्या नांवनोंदणी संबंधीं.	जिल्हा एम्प्लॉयमेन्ट अधिकारी, भंडारा.
३०. माजी सैनिकांच्या, त्यांच्या मुलाबाळांच्या व कुटुंबियांच्या प्रश्नासंबंधी.	जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा माजी सैनिक मंडळ, भंडारा.
३१. अल्प बचत योजना व तत्संबंधीच्या कार्यपद्धतीची माहिती.	स्मॉल सेव्हिंग सुपरवाईजर, जिल्हाधिकारी कचेरी, भंडारा.
३२. जिल्ह्यांतील विकास कामें व तत्संबंधीची माहिती.	जिल्हा विकास मंडळ, भंडारा.

GPN—J-130—RPON—21-11-61—5,000.

4599

J-130—5-B.

भंडारा जिल्हा

